

१२५८
म. ग्रं. मं. ठाणे
विषय चरित्र
ग्रं. नं. ७४८
REFBK-0008904

# पुरंधर

ब. मो. पुरंदरे

शिवचरित्रमाला : पुष्प पांचवें

# पुरंधर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१००१ विः
क्रमांक नोः दिः

: लेखक :

ब. मो. पुरंदरे

REFBK-0008904

राजहंस प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
सौ. **निर्मलाबाई पुरंदरे,**
२४ पर्वती, पुरंदरे वाडा, पुणें २.

★ ★

प्रमुख विक्रेते :
**साहित्य प्रसार केंद्र**
१९६ / ३५ सदाशिव पेठ, पुणें २,

★ ★

प्रथमावृत्ति :
विजयादशमी
ऑक्टोबर १९५६

★ ★

सर्वाधिकार :
प्रकाशकाकडे सुरक्षित

★ ★

मुखपृष्ठ :
**व्ही. एस्. पाथरकर**
३०७ सदाशिव, पुणें २.

★ ★

मुद्रक :
**चिं. ग. वझे,**
साधना प्रेस, ३७४, शनवार, पुणें २.

# निवेदन

शिवचरित्रमालेंतील हें पांचवें पुष्प वाचकांपुढें ठेवतांना विलंब झाल्याची जाणीव मनाला बोंचत आहे. पण उदार वाचक क्षमा करतील, अशी खात्री वाटते.

लेखकाची ही माला लिहिण्यामागील भूमिका पहिल्या चारहि भागांच्या प्रस्तावनांत वेळोवेळीं प्रकट झालीच आहे. विद्यार्थ्यांमध्यें व ज्ञानेच्छू प्रौढ वाचकांमध्यें ही शिवकथा दिवसेंदिवस वाढती लोकप्रियता संपादन करीत आहे, हें भाग्यच आहे. सत्य इतिहासच मनोरंजक करून सांगितला तर ज्ञानाबरोबर स्फूर्तीहि त्यांतून घेतां येते, हें या शिवकथेनें चांगलेंच प्रत्ययास आणलें आहे. सुहृद्-वाचकांचें प्रोत्साहन असेंच वाढत गेलें तर ही शिवकथा लवकरच शेवटपर्यंत आणून ठेवतां येईल.

परंतु भावी संकल्पापेक्षां वर्तमान सिद्धीच महत्त्वाची असल्यानें या नवीन पुष्पाच्या सिद्धीस कारणीभूत झालेल्या असंख्य सुहृदांचे व हितचिंतकांचे आभार मानणें अगत्याचें आहे.

**लेखक-प्रकाशक**

## सूचना

(१) प्रकरणांचे आधार पुस्तकाच्या शेवटी एकत्र दिले आहेत.

(२) अवघड फारसी संभाषणांचें मराठी भाषांतरहि आधाराबरोबरच जोडलें आहे. फारसी वाक्यांवरील क्रमांक पहावा.

८८०४

# १ : : शाएस्ताखान

" आगे बढो ! कोंढाणा ! कोंढाणा ! "

शाएस्ताखानानें करड्या सुरांत हुकूम सोडला.

खानानें हुकूम सोडतांच त्याचे हजारों हशम, शुत्तरस्वार, फीलनाळा, शुत्तरनाळा आणि घोडेस्वार कोंडाण्याच्या रोखानें मावळ वेशींतून बाहेर पडूं लागले. खान हत्तीवर हौद्यांत बसला होता. तो फार चिडलेला होता. त्याला शिवाजी हवा होता. शिवाजी त्याच्या जिव्हारीं झोंबत होता. कोणाच्याहि फुंकरीनें त्याची झोंबती जखम निवणारी नव्हती.

खानाचा उजवा हात जखमेमुळें भयंकर झणझणत होता. आग आग होत होती. वस्त्रानें जखम बांधलेली होती. क्षणाक्षणाला त्याला रात्रीच्या भयंकर प्रकाराची आठवण होत होती. खानच काय पण त्याची ती अफाट फौजसुद्धां रात्रीच्या प्रकारानें भेदरून गेली होती.

कालची चैत्र शुद्ध अष्टमीची मध्यरात्र. पुण्यांतल्या लालमहालाभंवतीं सव्वालाख मोंगली फौजेचा पसारा पसरलेला होता. लालमहालाची सायसंगीन चिरेबंदी हवेली पिठूळ चांदण्यांत न्हात होती. शाएस्ताखान महालांत होता. भंवतीं गस्ती होत्या, पहारे होते, सारं कांहीं होतं. तरीहि महाराज आपल्या साथीदारांसह उंदरासारखे गुपचुप लालमहालांत घुसले. अगदीं अकस्मात् ! बाहेरची सव्वा लाख फौज राहिली बाहेरच अन् बिचारा खान अगदीं सह-कुटुंब सहपरिवार महाराजांच्या तडाख्यांत सांपडला. बायका-पोरें किंकाळूं लागलीं. महाराज आणि त्यांचे लोक लालमहालांत थैमान घालीत होते. महाराजांनीं खानाच्या प्रत्यक्ष मुलाचंच मुंडकं उडवलं. बायकांनीं दिवे विझवल्यामुळें व इतरत्र आधींचाच अंधार असल्यामुळें तरवारी अंधारांत फिरूं लागल्या. ईश्वराची इच्छा होती ते ते सुखरूप मरण पावले. परंतु खानावर ईश्वराचा बराच रोष असावा. बिचारा खिडकींतून निसटता निसटता महाराजांच्या तडाख्यांत सांपडला. पूर्ण बचावला असता किंवा पूर्ण मेला असता तरी बरं झालं असतं. पण भवानीच्या फटकाऱ्याखालीं खाडकन त्याच्या उजव्या हाताचीं तीन बोटेंच तुटलीं. काय ही फजिती ! हात लांडा-

धरणीचं अंग अंग पोळून निघत होतं. पर्जन्यराजाची ती अहोरात्र वाट पाहात होती. तिचं हृदय करचळत होतं. विकल होऊन तिनें अंग टाकलं होतं. ती दमली. ती रुसली.

अन् एके दिवशीं ढगामागून लपत छपत पर्जन्य आला. वाट पाहून पाहून रुसलेल्या धरणीवर मोठ्यानें हंसून त्यानें पाण्याची पहिली ओंजळ शिंपडली. तिनें एकदम वर पाहिलं. हंसली. आपण रुसलों, रागावलों होतों, हें ती विसरलीच. तिच्या श्वासोछ्वासाचा सुगंध दाही दिशांत भरला. पर्जन्यानें तिला चिंब भिजवून काढलं. तिचं शरीर निवलं.

धरणी संतुष्ट झाली. तिच्या अंगाअंगावर धवधवीत कांति विलसूं लागली. पर्जन्यानें तिला हिरवीगार चोळी-पैठणी दिली. गिरिशिखरांचे कुंभ तिच्या मस्तकावरून हिन्काकाळून वाहूं लागले. रंगीबेरंगी फुलांच्या वेण्या, गजरे, बाजूबंद, कमरपट्टे तिच्या अंगाखांद्यावर शोभूं लागले.

धरणी भारावली !

चार महिने पर्जन्यराजानें धरणीला हंसवलं, खेळवलं, सगळे लाड पुरविले. अन् एक दिवशीं इंद्रधनुष्याची अंगठी त्या भोळ्या-भाबड्या मुलीच्या बोटांत घालून पर्जन्यराजा दुष्यंतासारखा निघून गेला.

पावसाळा संपला. झेंडूचे गेंद अन् तिळाचीं फुलं फुलून दसऱ्याची वाट पाहूं लागलीं. महाराजांची मावळपट्टी दाणावैरणीनं गच्च भरली.

नवरात्र बसल. प्रतापगडावरची महाराजांची तुळजाभवानी नऊ रात्र जागत होती महाराजांच्या हृदयस्थानीं तिनें जागरण मांडलें होतें. प्रेरणा तेथून होती. शक्ति तेथें होती. यश तेथें होतं. स्वराज्याच्या कार्यसिद्धीच्या चिंतनाची झांज-संबळ महाराजांच्या डोक्यांत नऊ रात्र सारखी वाजत होती. जगदंबेच्या शेजारींच महाराजांची यशदायिनी समशेर नऊ रात्र उभी होती.

रोज सौंगड्यांच्या बैठकींत पुढच्या राजकारणाचीं खलबतें चालू होतीं.

दसरा उगवला. महाराजांनीं जगदंबेच्या पायावर मस्तक ठेवलं. उदयोस्तु म्हटलं. शेजारींच उभी ठेवलेली समशेर उचलली. तिचं पातं भाळीं लावलं.

## ४ : त्र्यंबकेश्वर

बहिर्जी राजगडावर मोठ्या उत्साहानें धांवत दौडत येऊन पोहोंचला.

महाराजांना सुरतेतल्या साखरबातम्या सांगायला तो अधीर झाला होता. त्याहूनहि त्या ऐकायला महाराज अधीर झाले होते.

महाराजांच्या हेरांचं जाणंहि गुपचुप आणि येणंहि गुपचुप. बोभाटा नाहीं. इतरांना कधींच हेरांच्या हालचालींचा पत्ता लागायचा नाहीं. बहिर्जी आंतून आनंदानें उकळत होता; पण चेहरा नेहमींसारखाच साधा भोळा. तो गडावर आला, महाराजांपुढें गेला आणि त्यानें मुजरा केला. महाराजांच्या मुद्रेवर स्मित उमटून गेलें. किंचित् पण अत्यंत उत्सुकतेनें त्यांच्या भिवया प्रश्नार्थक वर चढल्या.

“ हं काय ? आलांत मुलीच्या बापाला भेटून ? ” महाराजांनीं सरळ विचारलं, पण सारा मिस्किलपणा त्यांच्या डोळ्यांत होता.

“ व्हय् महाराज ! मुलीचा बाप लई साजरा गोजरा मनुक्ष हाये ! ” तितक्याच खट्याळ शब्दांत बहिर्जी उत्तरला.

“ पण लग्न मुलीशीं करायचंय् ! कीं बापाशींच ठरवून आलांत ? महाराज हंसले.

“ पोरगी तर नामी ! अक्षी इष्णू नारायेनाची कारभारीन सोभल ! सही सही लक्षिमी ! ”

“ हं ! मग गरुडावर बसूनच निघायला हवं ! काय पंत ? ”

“ वऱ्हाड तयार आहे ! ” मोरोपंतांनीं चटकन् उत्तर दिलं.

“ व्हय् महाराज ! बामणाला इचारून पंचांगणांत म्होरूत्त बघायचा आन निघायचंच लग्गीच ! ”

महाराज हंसले. मोरोपंत हंसले. अण्णाजी दत्तो हंसले.

लगेच एकांतांत सारे गेले. महाराजांनीं गंभीरपणें बहिर्जीला विचारलं, “ काय खबर आहे ? ”

बहिर्जीनं अगदीं खडान् खडा सुरतेची पोथी वाचली.

मुंडा झाला. आतां पराभव जन्मभर तळहातावर वागवायची पाळी आली. जेवतांना प्रत्येक घासाला आतां शिवाजीची आठवण ! खानाच्या बायकोच्या देखत महाराजांनीं त्याच्यावर झडप घातली. अशी ही दैना. धांवपळ अन् फजिती झालेली कोणा नवऱ्याच्या अस्सल बायकोला पाहवेल बरं ! ती फार विव्हळ झाली. एवढी अफाट फौज तिन्ही त्रिकाळ ' ह्यांच्या ' आंवतीं भंवतीं चरती आहे. पण झाला का कांहीं ऐन घटकेला उपयोग ? असंच असतं बरं जगांत ! म्हणतात ना, खायला सगळे जमतील, पण वेळ आली कीं कुण्णी कुण्णाचं नव्हे बरं, कुण्णी कुण्णाचं नव्हे ! !

रात्रीं खरोखरच लालमहालांत प्रलय उडाला. अंधारांत महाराजांचे दोस्त तलवारींनींच जणूं आंधळी कोशिंबीर खेळत होते. इतकं सगळं करून महाराज बिनबोभाट कोंडाण्याकडे आपल्या त्या बिलंदर साथीदारांसह पसार झाले. खानाच्या छावणींत आश्चर्य, गोंधळ आणि घाबरगुंडी उडाली. आम्हां कोणालाहि पत्ता लागूं न देतां हा शिवाजी वाड्यांत गेलाच कसा ?

महाराजांनीं ह्या सर्वांना विचारून जायला हवं होतं ! बेसनदशीर कुठले !

खानावरच्या हल्ल्यानंतर थोड्याच वेळांत पुण्याच्या दक्षिणेस कात्रजच्या डोंगर घाटांत मशालींचे ठिपके पळतांना दिसूं लागले. खानाला वाटलं, शिवाजीच पळतोय्. पकडा, पळा, धांवा, पाठलाग करा, म्हणून हुकूम करीत खानानें मशालींमागें फौज सोडली. फौज जीव खाऊन दौडत गेली. तिनें मशालींना गांठलें. पण—! एकदम सर्वांचीं तोंडं आंबट्ट झालीं. मशाल-वाले लोक शिवाजीचेच होते. परंतु सगळे चार पायवाले अन् शिंग-शेपटंवाले ! बैल !

खानाचा तुटका हात आतां जास्तच झणाणूं लागला. संतापाच्या भरांत खानानें फौजेला सज्ज होण्याचा हुकूम दिला. छावणींत कूचाची नौबत झडूं लागली. उंटावरतीं हिरवे झेंडे चढले. फौज जय्यत तयार झाली. खानाच्या खाशा हत्तीवर हौदा चढला. हत्ती लालमहालापुढें आणून माहुतानें बसविला. खान हौद्यांत चढला. त्याचे ओठ संतापानें थरथरत होते. डोळे लाल झाले होते. भोंवतालचे मोंगल सरदार भीत भीत चोरट्या नजरेनें त्याच्याकडे पहात होते व कुर्निसात करीत होते.

माहुतानें हत्तीला अंकुश टोंचला. तो प्रचंड हत्ती उभा राहूं लागला.

हौद्याला हेलकावे बसत असतानांच खानानें डाव्या हाताची इशारत कोंडाण्याच्या रोखानें केली आणि करड्या आवाजांत तो गरजला, " आगे बढो ! कोंढाना ! कोंढाना ! " मोंगली लष्कर कोंडाण्याच्या रोखानें दौडूं लागलें. मुठा नदीच्या कांठाकांठानें लष्कराचा लोंढा वाहूं लागला. स्वारांच्या टापांखालीं जंगलाच्या पाचोळ्याची तंबाखू होऊं लागली.

रात्रीच्या, लालमहालांतील धाडसी धुडगुसानें खानाची फौज थक्कच झाली होती. सर्वांची खात्री झाली होती कीं, हा शिवाजी सैतानच असला पाहिजे. जो तो ह्या भुताच्या भयानें काळजावला होता. शिवाजीचा भयंकर धाक मनांत वागवीत चिंतातुर निरुत्साहानें सारेजण कोंडाण्याकडे चालले होते. त्यांची मनांतल्या मनांत चोरटी चर्चा चालली होती. शिवाजीला चेटुक येतं ! त्याला गुप्त होतां येतं ! त्याला कुठेंहि प्रकट होतां येतं !

महाराज कोंडाण्यावर होते. रात्रीं खानाची कशी गम्मत केली या खोडकर आनंदांत बापूजी नऱ्हेकर, चांदजी जेधे, चिमणाजी नऱ्हेकर, बाजी सर्जेराव, नेताजी पालकर, तान्हाजी वगैरे महाराजांचे सौंगडी दंग होते. खानाची केवढी आडदांड थट्टा केली. जो तो खानाची आणि कात्रजच्या घाटांतील बैलांची आठवण करकरून हंसत होता. महाराजहि त्यांत सामील होऊन म्हणत होते, " खानाचें नांव सार्थ झालें ! शास्ताखान ! बरी शास्त केली ! "

एवढ्यांत खानाच्या येत असलेल्या स्वारीची खबर हेरांनीं गडावर आणली. मग तर मजाच. घर बसल्या करमणूक चालून आली. लगेच गडाचा बंदोबस्त कडक झाला. जो तो तटावर खानाची वाट पहात टपून बसला. या वेळीं गडावर प्रत्यक्ष महाराज, मोरोपंत आणि वरील इतर मंडळी होती. अशी ही भयंकर भुतावळ महाराजांच्या भोंवतीं गडावर हजर होती. आतां या मोंगलांचं होणार तरी कसं ? खानाचं वय त्रेसष्ट पूर्ण होतं. कालच शंभर वर्षे पूर्ण होणार होतीं !

खानानें डोणजे ओलांडलें. डोणज्यापासून गडाचा पायथा फक्त एकच कोसावर. गडावरून खानाची फौज पांढऱ्या वाळवीसारखी दिसत होती.

फौज जों जों गडाच्या जवळ जवळ जाऊं लागली तों तों गडाचें प्रचंड स्वरूप छाती दडपवूं लागलें. खानाचा हत्ती पायथ्याशीं येऊन पोहोंचला.

गडाचा माथा अस्मानाला टेकला होता. गडाची चढण सव्वा कोसाची. एकच हल्ला चढवून खान कसा काय एवढा अवघड किल्ला जिंकणार होता देव जाणे! नुसतं निर्धास्तपणें चढून वर जायचं म्हटलं तरी छाती फुटायची वेळ येते. त्यांतून उन्ह चढलेलं; खानाची फौज डोंगर न चढण्यांत अत्यंत तरबेज; अन् गडावर तीं अनेक महाभूतं खायला टपून बसलेलीं; गडावरून खानाचा प्रचंड हत्ती म्हशीच्या पारडाएवढा दिसत होता.

महाराज गडाच्या तटावर एका तोफेपाशीं उभे होते.

खान पायथ्याशीं पोहोंचला. त्यानें आपल्या फौजेला गडावर चालून जाण्याचा हुकूम दिला. कोंडाण्याचं खोरं गोंगाटानें भरून गेलं. हजारों हशम गड चढूं लागले. चैत्राचं उन्ह, कोंडाण्यासारखा गड आणि मोंगलां-सारखे चढणारे. पहिली दोनशें पावलांची चढण कशीबशी त्यांनीं काटली. दम लागून अन् तहान लागून बिचारे कासावीस झाले सारे. गडाला ठरलेली वाट एकच होती. ह्या वाटेव्यतिरिक्त वर चढणं अशक्यच. पण मोंगलांचे हजारों हशम नसलेल्या वाटा नव्यानें वहिवाटीस आणण्याच्या उद्योगांत होते. एक पाल तीन वीत वर जाते अन् साडे तीन वीत माघारीं येते, तर तिला 'वर' पोहोंचायला किती वेळ लागेल? ह्या गणिताचं उत्तर जणूं ते प्रयोगांनीं काढीत होते! आता हे वर जाणार, वरच्या भुतावळीशीं लढणार आणि मग महाराजांना घट्ट पकडून कैद करणार! तरी अद्याप गडावरून प्रतिकार सुरू झालेला नव्हताच. अन् मग तो सुरू झाल्यावर?

आणि झालाच! गडावरून बंदुकीच्या गोळ्यांचा कडकडाट सुरू झाला. खानाची फौज एक टेकाड वर चढून जाते न जाते तोंच वरून आग सांडूं लागली. तोफांचे गोळे गुंगत गर्जूं लागले. गडावरील मंडळी खानावर अक्षता टाकायला आतुरली होतीच. महाराजांनीं इशारत करतांच त्यांनीं दणका सुरू केला. स्वतः महाराजच एका तोफेवर उभे होते.

खाली मोंगलांची त्रेधा उडूं लागली. गोंगाट आधींपासूनच होता, आतां गोंधळ सुरू झाला. आकाशांतून सूर्य आग ओकीत होता. त्याच्या जोडीला मराठे गडावरून निखारा पाखडूं लागले. मोगलांना पुढें पाऊल टाकणं अशक्य होऊन बसलं. खान चवताळला. हत्तीवरून तुटक्या हातानें हातवारे करीत फौजेला वर चालून जाण्यास तो चेतावणी देत होता. माणसं पटापटा

भरत होतीं. रक्ताच्या धारा डोंगरावर सांडत होत्या. मोंगलांना हें कळून चुकलं कीं, ह्या शिवाजीला पकडणं म्हणजे उडत्या पांखराची सावली पकडायला धावण्यासारखं आहे. पण खानाला शिवाजी हवाच होता, तो रात्रीचा शिवाजी हवा होता.

गडावरच्या माऱ्यामुळें खानाची फौज विस्कटली. तिच्यांत गोंधळ व पळापळ सुरू झाली. लोक डोंगरावरून घसरूं लागले, गडबडूं लागले. धूळ उसळत होती. खान त्वेषानें फौजेवर ओरडत होता. त्याचे सरदारहि धापा टाकीत फौजेवर खेंकसत होते. जन्मांत कधीं असले अवाढव्य पर्वत न पाहिलेले ते सैनिक; बिचाऱ्यांवर रक्त ओकायची वेळ आली.

आणि एवढ्यांत कडाडकन् उल्का तुटावी असा तोफेचा एक लालबुंद गोळा गडावरच्या फटाकडींतून सुटला अन् धाडकन् धडकला तो नेमका खानाच्या धिप्पाड हत्तीवरच. हत्तीनें सोंड उंचावून भयंकर चीत्कार केला. माहुतानें कर्कश किंकाळी फोडली. त्याच्या हातांतला अंकुश गळून पडला आणि तो ओरडला, " सरकार दगा ऽ दगाऽ ! "

खानानें एकदम कपाळावर हात मारला. " या अल्ला ! यह तुमने क्या किया ! "

हत्ती धाडकन् कोसळला. हौद्यांतून गडगडत खान जमिनीवर आला. लोक सांवरण्यासाठीं धांवले. हत्तीचं धूड रक्तांत आणि धुळींत शेवटची धडपड करीत पडलं.

खानाच्या फौजेंत ह्या प्रकारामुळें हलकल्लोळ उडाला. लोकांचा दम आणि धीर साफ उखडला गेला. ते तोंड फिरवून माघारीं धांवत सुटले. खानाच्या डोळ्यादेखत ! आतां ह्या फौजेला सावरणं अशक्य होतं. खानानें हतबुद्ध होऊन डोकं धरलं. त्याची उमेद एकदम खचली. तो चिडला, चरफडला, वैतागला.

गडावर मजा चालली होती. खानाचं पळत सुटलेलं लष्कर वाऱ्यानें उडणाऱ्या चुरमुऱ्यांसारखं वरून दिसत होतं.

साफ धुव्वा उडाला. नाकीं नऊ आले. तीन तेरा झाले. बारा वाजले. पराभव झाला. खान हरला. त्यानें पुण्याकडे कूच केलें.

गडावर लोक विजयाच्या गर्जना करीत होते. फत्ते मुबारकीच्या तोफा दणाणत होत्या. दरवाजावरचे भगवे झेंडे जास्तच जोरानें फडफडत होते.

खानानें फारच दहशत खाल्ली. शिवाजीपासून जास्तींत जास्त लवकर आणि जास्तींत जास्त दूर निघून जाण्यासाठीं त्यानें पुण्याहून औरंगाबादेकडे ताबडतोब कूच केलें. औरंगजेबाचा हा मामा आपल्या कबिल्यांसह पुण्यांतून निघून गेला. औरंगजेबाची मावशी हीहि खानाबरोबर पुण्यांत होती. तीहि गेली. मामा, मावशी आणि मामी गोकुळांत आले होते. पळून गेले. ह्या दिवशीं तारीख होती, ६ एप्रिल १६६३ आणि तिथि होती चैत्र शुद्ध नवमी.

* * *

## २ : : खानाची बडतर्फी

ज्ञानेश्वरांच्या दारींचा सोन्याचा पिंपळ आनंदानें डोलला.

आज चैत्र शुद्ध नवमी होती. रामनवमीचा दिवस. दशरथाच्या अयोध्येंतहि इतका आनंद उसळला नसेल, इतका पुणें प्रांतांत उसळला. पवना, भीमा, मुळा, मुठा, इंद्रायणी, कऱ्हा आणि निरा ह्या नद्यांच्या दोन्ही काठां किनाऱ्यांवर स्वराज्यांत नांदणाऱ्या पुणें प्रांताला गेलीं तीन वर्षें सतावणारा शाएस्ताखान रक्त गाळीत पळून गेला. खान-इ-खानान् अमीर उल् उमरा नबाबे आझम मिर्झा अबू तालीब शाएस्ताखान मामांची आज महाराजांनीं कायमची पाठवणी केली.

खानानें पुणें प्रांताची पार धुळधाण उडवून दिली होती. घरादारांचा, संसारांचा, देवा-देवळांचा पुरता विस्फोट केला होता. जेवढं जेवढं चांगलं तेवढं तेवढं भंगलं होतं. मुलखाची दिवेलागण मोडली होती. साऱ्या प्रजेची अफरातफर झाली होती.

आज तीन वर्षांनंतर पुन्हां टाळ-वीणा-मृदंगांच्या निनादांत रामजन्मोत्सव पुणें प्रांतांत गाजत होता. कौसल्येच्या प्रसूतिवेदना संपल्या होत्या.

ह्याच वेळीं बादशहा औरंगजेबाचा मुक्काम काश्मीरांत होता. थंड थंड वायुलहरी आणि मोहक सुगंधांच्या फवाऱ्यांत औरंगजेब विश्रांति घेत होता. पण त्याचें लक्ष काश्मीरी गुलाबांत, सुगंधी गुलाबपाण्यांत वा शीतल वायु-

अनुक्रमांक २७००१ दि. ५/२/११
५७५ नोंद दि. २५/१२/५५

लहरींत रमतच नव्हतं. त्याचं लक्ष काश्मीरपासून सहाशें कोस दूर असलेल्या पुण्यावर खिळलं होतं. पुण्यांत त्याचा खासा मामा शाएस्ताखान अमाप फौज आणि अफाट युद्धसाहित्य घेऊन खुद्द महाराजांच्या वाड्यांतच तळ ठोकून बसला होता. म्हणजे अगदीं, अगदीं शिवाजीच्या छातीवरच ! औरंगजेबानं खानाला माणसं, पैसा, दारूगोळा आणि इतर युद्धसाहित्य पुरविण्याच्या बाबतींत थोडीहि काटकसर केलेली नव्हती. आतां औरंगजेब फक्त वाट पहात होता कीं, खान मामांनीं शिवाजीला पकडल्याची, ठार केल्याची किंवा साफ बुडविल्याची खबर पुण्याहून येते केव्हां ! पुण्याची गोड बातमी मिळते केव्हां !

—आणि आली ! पुण्याची बातमी आली ! तारीख ८ मे १६६३ ह्या दिवशीं पुण्याची अख्बारथैली घेऊन सांडणीस्वार दौडत काश्मीरांत आला. औरंगजेबाची अधीर नजर थैलीवर गेली. त्याच्या दरबारी मुन्शीनें थैली उघडली. ती गोड बातमी मुन्शी वाचूं लागला ! ऐकतो तों एकेक अक्षर भयंकर ! औरंगजेबाची मुद्रा बिघडली. आग भडकली.

“बस्स्. बस्स् ! बंद करो !” चिडून औरंगजेब ओरडला.

आपला हाडवैरी ठार झाला नाहीं तरी निदान पराभूत तरी झाला असेल, निदान त्याचे किल्ले आणि मुलूख काबीज झाले असतील, असं त्याला वाटत होतं. पण छेः ! सारं गेलं ढगांत ! उलट मामासाहेबच मार खाऊन पळत सुटल्याची इत्थंभूत हकीकत त्या थैलींत लिहिली होती.

ती हकीकत ऐकून औरंगजेब अतिशयच भडकला. शाएस्ताखानावर त्याचा अतोनात रोष झाला. एवढी अफाट फौज आणि साठ महशूर सरदार दिमतीला देऊनहि असं झालं ! काय बोलावं आणि अन् काय लिहावं हेंच त्याला समजेना. तें पुण्याचं पत्र तिखटासारखं त्याच्या डोळ्यांस झोंबूं लागलं.

शिवाजीनें म्हणे आमचीं बोटेंच तोडलीं ! त्याला म्हणे गुतच होता येतं ! मूर्ख, बेअक्कल, बुद्दू, बैल ! शिवाजीचे बैल सुद्धां आमच्या सरदारांपेक्षां खास बुद्धिवान् ! खास हुशार ! आम्हांला बैलांनींच फसवलं म्हणे ! सव्वा लाख फौज दिली होती शिवाजीला जिंकायला ! काय, केलं काय इतके दिवस ह्या फौजेनं ? लाखों रुपये नासले, हजारों लोक मेले. तीन वर्षं वाया गेलीं. मूठभर डोंगरी उंदरांच्या टोळक्यानें म्हणे आमच्यावर हल्ला केला आणि आम्ही पळून गेलों ! रडा लेकांनो !

औरंगजेबाचा तिळपापड उडाला. भर काश्मीरांत त्याच्या अंगाची आग होऊं लागली. प्रकरण तापलं. सारे काश्मिरी गुलाब एकदम चुलींत गेले. त्यानें शाएस्ताखानाला तडकाफडकी फर्मान पाठविलं कीं, ताबडतोब औरंगाबादेहून बंगालच्या सुभ्यावर दाखल व्हावें ! पुरें झालं !

अन् दख्खनच्या सुभ्यावर त्यानें आपला शहाजादा मोअज्झम याची नेमणूक केली.

शाएस्ताखानाला आपल्या बंगालवरच्या बदलीचं फर्मान औरंगाबाद येथें मिळालं. त्याला फार फार दुःख झालं. ज्याची बंगालवर नेमणूक झाली त्याच्यावर बादशहाची इतराजी झाली आहे, असें समजत असत. अन् तें खरंहि होतं. दुःखी खान तारीख १ डिसेंबर १६६३ ह्या दिवशीं मान खालीं घालून मुकाट्यानें बंगालकडे रवाना झाला. शहाजादा मोअज्झम औरंगाबादेंत येऊन दाखल झाला. हे चिरंजीव म्हणजे रंगेल रंगरावच होते. खाना. पीना, मजा करना, शिकार मारना और सो जाना असा यांचा जबरदस्त व जोरदार कार्यक्रम होता.

महाराजांना मात्र आतां उसंत नव्हती. शाएस्ताखानानें केलेली स्वराज्याची नुकसानी त्यांना बेचैन करीत होती. ती कशी भरून काढायची ह्या चिंतेंत ते व्यग्र होते. राजगडच्या तटावरून त्यांची नजर पश्चिम क्षितिजाच्या पलीकडे जात होती. कोंकणच्या किनाऱ्यावर कडवाडपासून दमणगंगेपर्यंत आपली आनिर्बंध हुकुमत असली पाहिजे ह्यासाठीं ते तगमगत होते. त्यासाठीं जबरदस्त जंजिरे आणि बलाढ्य आरमार असायला हवं होतं. पण हें उभं करायचं म्हणजे कणगीभर मोहरा हव्या होत्या. कोटी रुपयांची रास ओतल्याशिवाय जंजिऱ्याची भिंत उभी राहूं शकणार नव्हती. पंचवीस हजारांचा तोडा झेलत झेलत खर्चिल्याशिवाय नवीन लढाऊ गलबत बांधतां येत नव्हतं. पण महाराजांच्या खजिन्यांत एवढा पैसा होता कुठं ?

वैशाखाचं उन्ह जमीन आणि डोंगर भाजून काढीत होतं. नव्या आकांक्षांना मोहर येण्यासाठीं पैशाचा ओलावा हवा होता. महाराज राजगडच्या तटावर चिंतामग्न अवस्थेंत शतपावली करीत होते.

* * *

**पुरंधरावरून** उघड्या डोळ्यांनीं मुरारबाजीला वज्रगडचं मरण पहावं लागलं. माचीपर्यंत येऊन ठेपलेल्या मोगलांना चिवट प्रतिकारानें त्यानें रोखून धरलं. पण त्याला सारखी यशवंतराव व बाबाजीची आठवण होऊं लागली.

दिलेरखानाची मात्र कळी खुलली. तो वज्रगडावर गेला. तेथून पुरंधरची शिकार करण्याचा विचार करून त्यानें तेथें तोफा व दारूगोळा चढविला. आतां मुरारबाजीचें काम अवघड झालें. शेजारच्या वज्रगडावरून माचीवर तोफा धडकणार होत्या. शिवाय खालून माचीवर हल्ला होणार हेंहि स्पष्ट होतं.

तसंच झालं. खानानें तोफा डागल्या. शिवाय खालून मोंगली फौज पुरंधरवर चालून निघाली. पूर्वांगानें वज्रगडच्या डोंगरावरून आणि सर्वांगानें खालून पुरंधरावर मारा सुरू झाला. मृत्यूला हुलकावण्या देत देत कोळी व रामोशी लढूं लागले. माचींतल्या बालेकिल्ल्याचा मात्र अद्याप ओरखडाहि निघाला नव्हता.

असा दुहेरी हल्ला होत असूनहि मुरारबाजीनें चार दिवसपर्यंत मोंगलांना थोडीसुद्धां दाद दिली नाहीं. पांचव्या दिवशीं दिलेरखानानें एकवटून माचीवर हल्ला चढविला. हा मात्र भयंकर होता. आतां माची राखणें कठीण आहे असें पाहून मुरारबाजीनें आपल्या सर्व लोकांना बालेकिल्ल्यावर जाण्याचा हुकूम दिला व स्वतः तोहि गेला.

माचींत मोंगल घुसले. मुरारबाजीचें मस्तक अक्षरशः भणाणून गेलें होतें. तो अतोनात चिडला होता. ह्या वेळीं खान पुरंधरच्या खालीं छावणींत होता. माचीवर हिरवें निशाण फडकलेलें दिसतांच तो आनंदानें बेहोष झाला. आता राहिला फक्त पुरंदरचा बालेकिल्ला...खान नव्या हल्ल्याची तयारी करूं लागला

मुरारबाजीनें एक भयंकरच बेत योजला. खालीं माचीवर मोंगल फौज इतस्ततः विखुरली होती. तेथें असलेल्या घरांत आणि सरकारी इमारतींत लूट करण्याकरितां मोंगल घुसत होते. मुरारबाजीनें वरून तें पाहिलं. त्यानें आपल्या सैन्यापैकीं पांचशें वीरांना घेतलें आणि बालेकिल्ल्यावरून खालीं थेट

दसरा संपला तरी खलबतं चालूच होतीं. जो तो उत्साहानें आणि कुतूहलानें नव्या मोहिमेकडे डोळ लावून बसला होता.

— आणि खलबतांत बेत ठरला.

महाराजांनीं हंसून बहिर्जीकडे बोट केलं.

" पहिली कामगिरी बहिर्जींची ! "

तो तगड्या तब्यतीचा तरुण मुजरा करीत उठलाच. नवी कामगिरी. ह्या आनंदाला सर कशाची ? महाराजांच्या सर्व ईर्षा–इशारती समजावून घेऊन बहिर्जी निघाला. निघण्यापूर्वीं जिजाबाई आईसाहेबांच्या पायावर डोकं ठेवून त्यांना मुजरा केला.

"सारं कांहीं जपून हं ?" पाठीवरून हात फिरवीत आईसाहेबांनीं बजावलं.

" आणि सारं कांहीं बेमालूम हं ! " महाराजांनीं म्हटलं.

"खडान्‌खडा, महाराज ! अक्षी कुलपामागं दडलेली खबर आणून व्हातों पायावर ! " बहिर्जीनें म्हटलं.

बहिर्जी सर सर सर गड उतरला.

बहिर्जी नाइकावर महाराजांनीं आज मोठीच कामागिरी सोपविली होती. नव्या मोहिमेचा पहिला नारळ फोडायचा मान महाराजांनीं बहिर्जीला दिला होता. एका मोठ्या कामगिरीचा टिळा आपल्या भाळीं लागला ह्या आनंदांत तो धुंद होता. पण जबाबदारीची जाणीवहि त्याला होती. परंतु काळजी मात्र वाटत नव्हती. तो काळजी करीत नसे. काळजीनें वागत असे.

बहिर्जी म्हणजे हजार गुणांचा खंडोबा. सोंगं आणि बतावण्या तो इतक्या बेमालूमपणें करीत असें कीं, पिढ्यानपिढ्यांच्या धंदेवाईक बहुरुप्यांनींहि फसावं अन् हंसावं. सांगाल त्याचं सोंग अगदीं चालण्या-बोलण्यासहित तो सही सही वठवीत असे. मोठा हुन्नरबाज. हजरजबाबी. पक्का बनेल. वासुदेव होईल. गोंधळी बनेल. कडकलक्ष्मीचा आसूड उडवीत घुमेल. कासार होईल. लुंगीवाला फकीर होईल. जरूर पडली तर लुगडंसुद्धां सफाईनें नेसून जत्रे-यात्रेच्या फडांत फिरून येईल. बुरखा घेऊन बेगम होणं तर त्याच्या हातचा मळ. पण हें सारं स्वराज्याकरितां. सारं कांहीं महाराजांकरितां. महाराजांच्या अलीकडे त्याची कुणावर माय। नव्हती अन् महाराजांच्या पलीकडे त्याच्यावर कुणाची छाया नव्हती. एकच देव,—महाराज ! पूर्वी

अनेक प्रसंगीं बिनतोड हेरगिरी करून बहिर्जीनें महाराजांकडून दोन्ही दोन्ही हातांची शाबासकी मिळविली होती.

आज नव्या कामगिरीचा नारळ फोडायला बहिर्जी निघाला होता. हा नारळ वाकडातिकडा फुटतां कामा नये अन् नासका तर निघतांच कामा नये, ही जबाबदारी त्याच्या माथीं होती. कामगिरीसाठीं जायचं होतं तरी कित्ती दूर? राजगडापासून दीडशें कोस उत्तरेला. औरंगजेबाच्या क्रूर आणि बलाढ्य सत्तेच्या ऐन उजव्या दंडावर. पश्चिम किनाऱ्यावर. तिथें वसलेल्या एका अति प्रचंड, अत्यंत श्रीमंत आणि अत्यंत संरक्षित शहराची खडान्-खडा माहिती हेरगिरी करून चोरून आणण्याची ही कामगिरी होती. तें शहर म्हणजे औरंगजेबाची लंका होती—सुरत! सुरत!

सुरत हें पश्चिम किनाऱ्यावरचं व्यापाराचं नाक होतं. पश्चिमेकडच्या जगाशीं सुरतेच्या बंदरांतूनच व्यापार चालत असे. मक्केचे यात्रेकरू येथूनच येत जात असत. औरंगजेबाच्या साम्राज्यांत दिल्लीच्या खालोखाल किंबहुना दिल्लीच्या तोडीचं हेंच एकमेव वैभवशाली शहर होतं. येथें बळकट भुईकोट किल्ला होता. शहराला वेशी होत्या. औरंगजेबाचे पांच हजार स्वार येथें कायमचे सज्ज असत. एक सुभेदार व एक किल्लेदार सुरतेच्या रक्षणार्थ उभे असत. जगांतल्या व्यापाराच्या मोठ्यांतल्या मोठ्या घडामोडी येथें चालत. टोपीवाले इंग्रज, वलंदेज, आर्मेनी, फरांसीस, युनानी, फिरंगी वगैरे गोरे व्यापारी येथून मालाची ने-आण करीत. कांहींनीं तर वखारीच थाटल्या होत्या. शिवाय इराणी, तुराणी, अरबी, हबशी, बोहरी, खोजा, यहुदी, अफगाणी, मोंगली, बलुची इत्यादि परदेशीय व्यापारी व्यापार करून गलबतें भरभरून पैसा नेत होते. ह्या सर्व लोकांनीं सुरतेची पेठ गजबलेली होती. गोऱ्या व्यापाऱ्यांकडून मोंगलांना तोफा, बंदुका व दारूगोळा मुबलक मिळत असे. औरंगजेबाला कराच्या रूपानें कोट्यवधि रुपये मिळत असत. सुरत म्हणजे औरंगजेबाच्या दारांतील, पारड्र मेलेली, दुभती म्हैसच होती. सुरतेची वस्ती दोन लाख होती व सुरतेंतील घरांची संख्या सुमारें सात हजार होती.

महाराजांचं लक्ष इतक्या लांब गेलं. त्यांना सुरतेंतील संपत्ति हवी होती. स्वराज्यासाठीं हवी होती. औरंगजेबाच्या फौजांनीं स्वराज्याचीं तीन वर्षें रानडुकरासारखी नासाडी केली, त्याची सबंध भरपाई म्हणून महाराजांना

सुरतेची तीन मुठी संपत्ति हवी होती. शत्रूकडून झालेल्या नुकसानीची भरपाई मागून मिळत नसते. अर्ज, विनंत्या व विनवण्या करूनहि मिळत नसते. जे सारं स्वराज्यच गिळायला बसले ते असं कुठं कांहीं मागून देतील काय ? म्हणून उघड उघड सूड घेऊन, छापा घालून दुष्मनाची दौलत लुटून आणावयाचा बेत महाराजांनीं मांडला.

पुण्यापासून सुरतेपर्यंतचा सर्व प्रदेश मोंगली सत्तेखालीं होता. म्हणजे शत्रूच्या मुलुखांत दीडशें कोस आंत मुसंडी मारून सुरतेवर पोहोंचायचं होतं. केवढा विलक्षण धाडसी बेत होता हा ! वाटेंत मोंगलांचे किल्ले, लष्करी ठाणीं, अवघड वाटा, नद्या, डोंगर आडवे होते. तरीहि महाराजांना सुरतेची सूरत हवी होती.

एखादी मोहीम हातीं घेतली कीं महाराज तिची योजनाबद्ध, शिस्तबद्ध आणि कांटेकोर पूर्वतयारी केल्याशिवाय पुढचें पाऊल टाकीत नसत. याच-साठीं इतक्या दूरच्या धाडसाला आधीं पूर्णपणें सुरतेची माहिती असणं जरूर होतं. बहिर्जी तेवढ्यासाठीं निघाला होता.

वेष पालटून बहिर्जी सुरतेच्या मार्गाला लागला.

## सुरत

सुरतेच्या दक्षिण वेशीचं नांव होतं, ‘ बऱ्हाणपूर दरवाजा. ’ भव्य अन् भक्कम. दख्खनचा राजरस्ता यांतूनच वहात होता. शहराजवळूनच तापी नदी समुद्राला येऊन मिळाली होती. ह्याच नदीच्या कांठीं पण शहराच्या अंगास टोपीकर इंग्रजांची वखार होती. तिला थोडीशी तटबंदी होती. वखारीच्या जवळच हाजी सय्यद बेग नांवाच्या कोट्यधीश व्यापाऱ्याचा टोलेजंग वाडा होता. इंग्रजांच्या वखारीपासून थोड्याशाच दूरवर वलंदेजांची कोटबंद वखार होती. वलंदेज म्हणजे डच. ह्या वखारीच्या जवळच बहरजी बोहरा नांवाच्या एका लक्षाधीशाची टोलेजंग इमारत होती.

सबंध सुरत शहर मोठमोठ्या बादशाही हवेल्यांनीं गजबजलेलें होतें. प्रवाशांसाठीं वा व्यापारासाठीं येणाऱ्या लोकांसाठीं मोठमोठ्या सराया बांध-लेल्या होत्या. नक्षीदार कमानींच्या खिडक्या, प्रशस्त सज्जे, मिनार आणि मेघडंबऱ्या बसवून सजविलेल्या गच्च्या, मोठ्या मोठ्या शोभिवंत दरवाजाच्या

हवेल्या आणि उंच उंच जोत्यांवर मधून मधून दिसणारे मोंगली महाल यामुळें सुरत म्हणजे राजधानीच शोभत होती. अन् व्यापाऱ्यांची ती राजधानीच होती. बहरजी बोहरा, हाजी सय्यद बेग, हाजी कासम, सय्यद झहीद बेग, मुल्ला अब्दुल जाफर वगैरे लक्षाधीश व कोट्यधीश व्यापारी म्हणजे सुरतेंतील बादशहाच होते.

सुरतेंतील रस्ते पहांटेपासून रात्रीचा पहिला प्रहर उलटेपर्यंत गजबजलेले असत. उंची उंची पोषाख घालून हिंडणारे अमीर, लगबगीनें पावलं टाकणारे व्यापारी, घाम गाळीत ओझीं वाहणारे हमाल, पालख्या-मेणे वाहून नेतां नेतां आंत बसलेल्या मालकांच्या निमूटपणें शिव्या खाणारे गुलाम, कानावर लेखण्या आणि हातांत तांबड्या वेष्टणाच्या हिशेबी चोपड्या घेऊन गंभीर चेहऱ्यानं बाजारपेठेकडे जात असलेले कारकून, विडे चघळत चकाट्या पिटणारे रंगेल जवान अन् हाजच्या यात्रेसाठीं शहरांत आलेले श्रद्धावंत यात्रेकरू ह्या रहदारींतल्या विविधतेंत सामील असत.

कबुतरांचे थवेच्या थवे चौकाचौकांतून दाणे टिपतांना दिसत. श्रीमंतांनीं ठेवलेल्या सार्वजनिक पाणपोयांवर सतत पाण्याची धार दिसे; तर फकिरांचे कटोरे धनधान्यानें उतू जातांना दिसत.

हमरस्त्यावर तर प्रत्येक देशाचं अन् वेषाचं दर्शन होत असे. तांबड्या रंगानें दाढी मिशा रंगवलेले गोरेपान अरब व्यापारी अंगावरचीं काळीं डगलीं सांवरीत सांवरीत कुजबूज करीत चाललेले असत. नाकाखालच्या मिशा काढून टाकून फक्त टोकावरच मिशा व सबंध दाढी राखणारे मोंगल मुसाफीर मालकीच्या तोऱ्यानें फिरत. नखशिखान्त पांढरे कपडे घालून 'केम् छे, केम् छे' करणारे संजाणी पारशी सर्वांशींच गोड गोड बोलतांना दिसत. फक्त हनुवटीखालीं कुंच्यासारखी दाढी ठेवणारे बोहरी गुजराथी भाषेंत बोलून आपण मूळचे कोण हें दाखवून देत. धोतराचा पोकळ अन् तोहि उलटा कासोटा घालून आणि पुढचा सोगा उजव्या हातीं धरून डाव्या हाताचे हातवारे करीत मोठमोठ्यानें गप्पा मारीत जाणारे लोक कोण असावेत, हे सांगावंहि लागत नसे. दहा जणांना पुरेल एवढं कापड एकट्याच्याच घोळदार लेंग्याला वापरून वर ढगळ सदरा व मखमलीचं जाकीट घातलेले अन् गळ्यांत चांदीच्या चौकोनी ताइतांचे पेंडे घालून कर्र कर्र चढाव वाजवीत चालणारे

अगडबंब देहाचे पठाण बदाम-पिस्ते चघळतांना दिसत. वेणीचे दोन पेड घालून ते पुढें वक्षःस्थलावर सोडणाऱ्या अन् डोक्याला चौकोनी रंगीत रुमाल बांधून निर्भय अन् निःसंकोचपणें हिंडणाऱ्या बलुची युवती तर अनेक दिसत. रंगानें गोरे गोरे पान अन् घारे घारे डोळे असलेले टोपीवाले इंग्रज तंग विजारी आणि गळ्याभंवतीं मोठी थोरली झालर लावलेलें खमीस घालून, पायांतलं न्यारंच पायताण टाकटुक टाकटुक वाजवीत जातांना अधून मधून दिसत. हे टोपीवाले तर मोठे गुलहौशी. काम धाम नसलं कीं हे लोक आपल्या बायलीला संगतीं घेऊन रस्त्यांतून हिंडायचे ! अन् त्या बाया पण बिनलाजेच्या-खुशाल भररस्त्यांत आपल्या कारभाऱ्याचा हात धरून चालायच्या. असे कित्तीतरी निरनिराळ्या रंगांचे, रक्ताचे, आकारांचे अन् विकारांचे लोक सुरतेंत वावरतांना दिसायचे.

शिवाय रस्त्यांतून घोडे, गाड्या, उंट, हत्ती, उंटावरच्या अंबाऱ्या, इंग्रजी चारचाकी फलटणी अन् मेण-पालख्या लगबगीनें धांवतांना दिसत. श्रीमंतांचे मेणे मोठे शानदार असत. चंदनावर हस्तिदंताचें नक्षीकाम केलेले मेणे आणि पालख्या आपल्या सुवासानें आणि सौंदर्यानें लोकांचें लक्ष वेधून घेत.

सुरतेची बाजारपेठ म्हणजे इंद्राचं भांडार होतं. शेंकडों दुकानें शेंकडो तऱ्हेच्या मालानें गच्च भरलेलीं होतीं. डोळे दिपून जात. हिऱ्या-मोत्यांचे व्यापारी अनेक होते. त्यांचीं दुकानें नवतेजानें नवरंगांत सदैव झगमगत असत. एका मोतीवाल्या व्यापाऱ्याच्या दुकानांत अठ्ठावीस शेर वजनाच्या, एका, मोठ्या, आकाराच्या घवघवीत लडी होत्या. बहरजी बोहऱ्याच्या जवळ सहा पिपें भरून जवाहीर होतें. एका व्यापाऱ्यापाशीं तीस पिपं सोन्यानें तुडुंब भरलेलीं होतीं. इतर मालांचा व्यापार करणारांचीं दुकानें व तिजोऱ्या संपत्तीनें ठेचून भरल्या होत्या. एका व्यापाऱ्यापाशीं आठ कोटी रुपये रोख होते. मुल्ला अब्दुल जाफरचीं एकोणीस गलबतें ह्या वेळीं मालानें टांचून भरलेलीं बंदरांत उभीं होतीं. कापडचोपड, मसाल्याचे पदार्थ, केशर, कस्तुरी, चंदन, अत्तर, रेशीम, जरीचें कापड, हस्तिदंताच्या वस्तु, मिन्याचीं नक्षीदार भांडीं, गालिचे इत्यादि नाजूक साजूक मालानें कोठारें भरलेलीं होतीं. शिवाय सुंदर सुंदर बायकांच्या खरेदीविक्रीचा अन् निर्यातीचा मोठा व्यापार होता. गुलामांचा व्यापार तेजींत होता.

पण महाराजांना यांतलं कांहींहि नको होतं. त्यांना फक्त सोनं, चांदी, हिरे, माणिकमोती, पाचू रत्नें–बस्स. दुसऱ्या गोष्टींकडे ते ढुंकूनहि बघणार नव्हते.

ह्या वेळीं जॉर्ज ऑक्झेंडन, व्हाल्कार्ड इव्हर्सन, हेन्री गॅरी, अँथनी स्मिथ, निकोलस कॅलेस्ट्रॉ, हे प्रमुख युरोपियन व्यापारी किंवा व्यापारी कुंपण्यांचे प्रमुख अधिकारी सुरतेंत होते.

सुरतेंत बहिर्जी येऊन केव्हांच दाखल झाला होता. चौकाचौकांतून, बाजारपेठांतून दुकानादुकानांतून, व्यापाऱ्यांच्या अड्ड्याअड्ड्यांतून, जकात-चौक्यांतून, बंदरावरून तो तीक्ष्ण नजर टाकीत आणि तिखट कान टवकारून फिरत होता. जास्तींत जास्त लग्गा कुठें हातीं लागेल, कोणत्या भागांत किती लोक प्रथम घुसायला हवेत, कोणत्या भागांत जाण्याचेंहि कारण नाहीं, पक्क्या चिरेबंदी इमारती कोणत्या, त्यांत घुसायला वाटा कोणत्या, तेलांचे व्यापारी कुठें राहतात, त्यांच्यापाशीं तेल पुरेसें,–आपल्याला पुरेसें–आहे कीं नाहीं, लूट कुठें गोळा करणें सोयीचें जाईल इत्यादि हजार गोष्टींची तो निरखणी करीत होता. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीपासून तों सर्वांत गडगंज धनवानांच्या मानगुट्या कशा पकडतां येतील येथपर्यंतच्या सर्व गोष्टींचा डाव तो मनांत मांडीत होता.

बहिर्जीनें किल्ल्याची आणि शहरांतल्या कोतवालीची टेहळणी केली. या वेळीं सुरतेंत एक हजार घोडेस्वार होते. वास्तविक पांच हजार मोंगल फौज असणार अशी महाराजांची व बहिर्जीची कल्पना होती. पण प्रत्यक्षांत फक्त एकच हजार फौज होती. मग बाकीची चार हजार फौज गेली कुठें? तर ती सुरतेच्या सुभेदाराच्या पोटांत गेली! म्हणजे? म्हणजे असं कीं, सुभेदारसाहेब बादशहाकडून पांच हजार फौजेचा तनखा मिळवीत अन् प्रत्यक्षांत एक हजार फौज ठेवीत. बाकीचा तनखा पोटांत! सुभेदारसाहेब मोठे हुशार होते. सुरतेच्या एका दिशेला अथांग समुद्र आणि तीनहि इतर दिशांना शेंकडों कोस आपलंच मोंगली साम्राज्य परलेलं असल्यावर सुरतेकडे कोण वाकड्या नजरेनं बघतो?

—शिवाजी बघतो! त्याचा तिसरा डोळा आत्तांच फिरत होता सुरतेमधून.

किल्ल्याचे तट व बुरूज उंच व बळकट होते. किल्ल्याला स्वतंत्र किल्लेदार होता. पण सुरतेचा सर्व अंमल सुभेदाराच्या हातीं होता. सुभेदार अगदींच

गाफील व दिखाऊ कर्तबगारीचा होता. जसा तो तशीच त्याची फौज होती. ह्या सुभेदाराचं नांव होतं इनायतखान. सुरतेंत लक्ष्मी रहात होती. हा खान तिचा सख्खा भाऊ होता! शंख!!

बहिर्जीला जें जें दिसत होतं अन् समजत होतं, तें अगदीं फायद्याचंच होतं. सर्व श्रीमंत लोक, त्यांचे वाडे, दुकानं आणि कोठारं किल्ल्याच्या बाहेर शहरांत होतीं. ही केवढी सोयीची गोष्ट होती! सुभेदारापाशीं तोफा होत्या, पण सर्व किल्ल्याच्या तटावर होत्या.

समुद्रकिनाऱ्याचे दोन भाग होते. एक खुद्द सुरतेचें जंगी बंदर व दुसरा म्हणजे नदीपलीकडची स्वालीची गोदी. सुरतेच्या बंदरांत इनायतखानाचं वा दुसऱ्या कोणाचंहि एकहि लढाऊ गलबत नव्हतं.

इंग्रज व वलंदेज यांच्या वखारींना तटबंदी होती व किरकोळ चार-दोन तोफांचीं तोंडेंहि वरून डोकावतांना दिसत. ह्या दोन्ही गोऱ्या टोपीवाल्यां-पाशीं सैन्य असं मुळींच नव्हतं. त्यांचे व्यापारीच एकूण संख्येनें सुमारें शंभर-सव्वाशें होते. त्यांत आणखी दीडशें एक काळे शिपाई त्यांनीं नोकरीस ठेवलेले होते. सुरतेंत जर टणक खडक कुठें भेटेल तर तो ह्या गोऱ्या टोपीवाल्यांच्या वखारीशींच भेटेल, अशी बहिर्जीची खात्री झाली. त्यांतल्या त्यांत इंग्रज जास्त चिवट. तेव्हां जर ह्यांच्या वखारी लुटायच्याच ठरलं तर ह्यांच्याशीं दोन हात करावेच लागतील. पण आपल्याला हवं असलेलं सोनंनाणं ह्यांच्यापाशीं कितीक असणार? पण निब्बर माणसं इथंच फक्त भेटतील हें बहिर्जीनें जाणलं.

एकूण सुरतेची सम्पत्ती रावणाच्या लंकेसारखी आणि परिस्थिति धनगरा-च्या मोकाट कळपासारखी होती. बहिर्जीनें सुरतेची खडान्‌खडा माहिती हेरली, चोरली आणि तो तडक हंसऱ्या मुखानें राजगडच्या वाटेला लागला. पण ही माहिती मिळवितांना बहिर्जीनें केलेली वेषभूषा आणि वापरलेल्या युक्त्या इतक्या सावधपणें त्यानें हाताळल्या कीं, त्याची नेमकी हकीकत इतिहासालाहि त्यानें कळूं दिली नाहीं!! ह्याला म्हणतात गुप्त हेर!!!

★ ★ ★

" महाराज, सुरतेंत मोहरा-मोत्यांच्या कढया भरल्यांत! रावनाची लंका! आपला छापा गेल्यास बख्खळ दौलत हाताशीं यील!"

खरं होतं बहिर्जीचं बोलणं. सुरत म्हणजे रावणाची लंकाच. फक्त ह्या लंकेंतला रावण रहात होता पांचशें कोस लांब अन् पहाऱ्यावर सध्यां होता कुंभकर्ण!

महाराज आपल्या सहकाऱ्यांसह खलबतास बसले. एक दिवस अन् अनेक दिवस. आणि सुरतेचा बेत ठरला.

महाराजांनीं आईसाहेबांस सुरतेच्या स्वारीचा बेत सांगितला. प्रत्येक गोष्टच ते आईसाहेबांस सांगत व विचारीत.

" लाखाचा मनसुबा हा, शिवबा! फत्ते झालाच पाहिजे!" आईसाहेब आनंदून म्हणाल्या.

" निघणारच लौकर!"

" शिवबा, पण माघारीहि लौकरच यायचं हं!"

" संक्रांत संपल्यावर–"

" इतक्या दिवसांनीं?" संक्रांतीला एक महिना अवधि होता अजून.

" इतका वेळ लागणारच! नाहीं का? दूरची मजल!"

" आतां आमचीहि मजल फार थोडी राहिली आहे, शिवबा!" अन् आईसाहेब हंसल्या.

" आईसाहेब!" महाराज एकदम दचकून उद्गारले.

" शिवबा, अरे तसं नाहीं! पण म्हातारी नाहीं का झालें मी? एक दिवशीं जायचंच आतां! पण भरल्या चुड्याकुंकवानं अखेर साधायची. सूर्य मावळायच्या आंत आपलीं माझीं पांखरं घरीं यावींत असं वाटतं, एवढंच." शिवबाच्या पाठीवरून हात फिरवीत आईसाहेब म्हणाल्या.

" आईसाहेब, असं बोलूंच नका. मी जातच नाहीं!" महाराजांचं कोमल पुत्रहृदय हिन्काळलं गेलं होतं.

" वा! वेडा! हेंच शिकवलं मीं तुला? तूं कर्तव्याला चुकलास तर पापी ठरेन मी. शिवबा, अरे सहज बोललें. जा. तुला गेलंच पाहिजे. यशस्वीच होशील. अरे, पतिव्रतेला जसा पतिधर्माशिवाय दुसरा धर्म नाहीं, जसा तिला मुलांनातवंडांपेक्षां आणि लेकीसुनांपेक्षां पतिधर्म श्रेष्ठ असतो, तसाच

क्षत्रियाला क्षात्रधर्म श्रेष्ठ आहे. तिथें आईची आणि बहिणींची माया चालणार नाहीं. घेतलेलं व्रत अर्धवट सोडणं ह्यासारखं पाप नाहीं.

" तसाच पुत्राचाहि पुत्रधर्म ! तिथें राज्याची अन् धनदौलतीची माया चालणार नाहीं ! "

" तूं मला बोलण्यांत हरणार होय ! पण एवढं खास कीं, जिजाऊच्या पुत्राचा पुत्रधर्म आपल्या एका आईपुरताच मर्यादित नाहीं. खरं ना ? " आईसाहेबांनीं हंसून विचारलं.

" हां आईसाहेब ! " महाराजांनीं आईसाहेबांच्या पावलाला हात लावला.

राजगडावर स्वारीसाठीं शिबंदी जय्यत तयार झाली.

हा महिना मार्गशीर्षाचा होता. पावसाळी चातुर्मास संपून लगीनसराइची हळद उधळूं लागली होती. मुंडावळ्या तयार होत्या. बहिर्जी मुलगी पाहून आला होता. मुलगी खूबसूरत होती. आतां देवाच्या पायां पडायचं अन् घोड्यावर बसायचं.

राजगडच्या नगारखान्याला इशारत झाली. दणदण नौबत दणाणूं लागली. शिंगें, ताशे कडाडूं लागले. पांच हजार निवडक स्वारांचं वऱ्हाड जमलं. कुठं जायचं, कुठलं गांव, काय नांव ? कुणालाच कांहीं ठाऊक नाहीं. कुणीहि कांहींहि पुसत नाहीं.

महाराजांनीं जगदंबेचं दर्शन घेतलं आणि आईसाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवलं.

" यश घेऊन या ! उदंड कीर्तीचे व्हा ! " आईसाहेबांनीं आशीर्वाद दिला.

हातावरचं दही मुखांत घालून महाराज निघाले. बहिर्जी नाईक, अण्णाजी दत्तो, प्रतापराव, नेताजी, मोरोपंत वगैरे मंडळी मुजरा करून निघाली. पांच हजार फौज गडावरून उतरली. प्रत्येक स्वाराबरोबर एकेक जादा रिकामा घोडा होता. सर्वच घोडे अत्यंत चपल व शरीरांनीं तयार होते.

महाराजांनीं त्र्यंबकेश्वराकडे लगाम खेचला. राजगडपासून त्र्यंबकेश्वर शंभर कोस.

मजल दरमजल महाराज पुढें जात होते. पण प्रत्येक मुक्कामावर महाराज व महाराजांचीं माणसं वावडी उडवून देत होतीं कीं, आमची फौज औरंगाबादेवर जाणार !

शिवरात्र नव्हती व पर्वणी नव्हती तरी त्र्यंबकेश्वराच्या मंदिराभोंवतीं पांच हजार सशस्त्र भक्तांचा गराडा पडला. महाराज त्र्यंबकेश्वराला पोहोंचले. त्र्यंबकेश्वराच्या पुजाऱ्याची धांवपळ उडाली. मोठमोठ्या चोपड्या घेऊन उपाध्ये मंडळी आशेनें आली.

महाराज घोड्यावरून उतरले.

" आमच्या परंपरागत क्षेत्रोपाध्यायांना बोलवा ! " महाराजांनीं पंतांना आज्ञा केली.

चौकशी झाली. वेदशास्त्रसंपन्न ढेरगेशास्त्री हे भोसल्यांचे उपाध्याय होते. पंतांनीं हात जोडून त्यांना महाराजांकडे चलण्याची विनंती केली.

शास्त्रीबुवा आले. महाराजांस आशीर्वाद दिला व विचारलं, " आपणांस क्षेत्रस्थानीं कोणकोणते विधि करावयाचे आहेत ? गंगास्नान ? प्रायश्चित्त-विधि ? देवाची महापूजा ? आणि— "

" गंगास्नान ! महापूजा ! " महाराज म्हणाले.

" आणि श्राद्धविधि वगैरे ? "

" छेः छेः–नाहीं नाहीं ! " महाराजांचं मातृपितृप्रेमी कोमल मन कालवलं गेलं.

" ठीक, महापूजेची सिद्धता करतों ! "

शास्त्रीबुवांनीं महापूजेची सिद्धता केली.

त्र्यंबकेश्वराचें आवार सशस्त्र भक्तांनीं गजबजून गेलें. मंदिरांतल्या घंटांचा घणघणाट आणि ' शंभो हर हर ' गर्जनांचे प्रतिध्वनि गाभाऱ्यांत घुमूं लागले. त्र्यंबकेश्वर म्हणजे बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक फार प्राचीन स्थान. हेमाडपंती सुंदर मंदिर. गाभाऱ्यांत काळोख, पण सारं वातावरण अत्यंत शांत, शीतल आणि सुगंधी.

महाराज स्नान करून आले. सभामंडपांतील गर्दी मागें मागें हटली. गाभाऱ्यांतल्या नंदादीपांच्या सर्व ज्योति फुलल्या. वाती पुढें सरकल्या. त्र्यंबकेश्वराच्या स्वयंभू ज्योतिर्लिंगावर कांहींसा स्पष्ट उजेड पडूं लागला. लांबलचक सांखळी बांधलेलें अभिषेकपात्र हळूंहळूं हेलकावत होतें. सुगंधी फुलांची आणि बेलाची ओंजळ लिंगावर वाहिलेली होती. गाभाऱ्यांत रुद्राचे वेदध्वनि उमटत होते.

ठण् ठण्ण्ण ! घंटेचे निनाद घुमले.

“ जय शंभो हर हर ! जय त्र्यंबकेश्वर ! ”

महाराजांनीं नेत्र मिटून, मस्तक लववून, हात जोडले. महाराजांबरोबर सरदार मंडळी होती.

महाराज काय मागत होते देवापाशीं ?–तें देवाला कळलं होतं, कळत होतं. दानवांनाहि कळून चुकलं होतं. पण महाराज ज्या समाजासाठीं हें मागणं मागत होते, त्या समाजाला मात्र कळूनहि वळत नव्हतं.

षोडशोपचारपूर्वक त्र्यंबकेश्वराची महापूजा महाराजांनीं केली. दानधर्म केला. उपाध्याय वेदोनारायण ढेरगेशास्त्री यांचीहि योग्य संभावना केली. ह्या दिवशीं तारीख होती ३१ डिसेंबर १६६३.

महाराज औरंगाबादेवर चालून जाणार ही हूल सर्वत्र पसरत गेली. थेट औरंगाबाद परगण्यापर्यंत. त्या बाजूला लोकांची धांवपळ उडाली. यामुळें मोंगलांच्या औरंगाबाद छावणींतले लोक प्रतिकाराला सज्ज राहिले. कोणीहि तेथून हालला नाहीं. महाराजांना आडवायला सुरतेच्या वाटेवर कोणीहि आडवा आला नाहीं. कारण महाराज औरंगाबादेवरच येणार ही खात्री. ते सुरतेवर जातील, ही कल्पना कोणाला स्वप्नांतहि सुचली नाहीं.

महाराजांनीं फौजेसह यात्रा पार पाडली.

यात्रा पार पडली आणि महाराजांनीं फौजेस हुकूम सोडला. घटकेच्या आंत त्र्यंबकेश्वराचा परिसर रिकामा झाला.

आपल्याबरोबरचे जादा रिकामे घेतलेले घोडे घेऊन मराठी लष्कर बिन-बोभाट निघून गेलें. पण लोकांना मात्र एकच माहीत होतं कीं, महाराज औरंगाबादेकडे गेले !

महाराजांच्याहि पुढें बहिर्जी दौडत होता. त्याच्यामागोमाग सारे. तो वाटाड्या होता. अत्यंत वेगानें फौज चालली होती. कोणीकडे ? सुरतेकडे ! रात्रीं फक्त मोजका मुक्काम. लगेच पुढची मजल.

महाराजांनीं दमणगंगा ओलांडली.

गुजराथची सरहद्द लागली.

महाराजांची गति वाढली. आतां सुरत फक्त तीस कोस. आणि निघाल्या-

पासून पांचव्या दिवशीं रात्रीं महाराज घणदेवी येथें येऊन पोहोंचले. येथून सुरत फक्त एक मजल. ह्या दिवशीं तारीख होती ४ जानेवारी १६६४. सोमवार.

घणदेवींत गडबड उडाली. हें काय नवीन अरिष्ट आलं? पण महाराजांनीं घणदेवीला कांहींच तोशीस दिली नाहीं. पण लोकांची फारच घाबरगुंडी उडाली. महाराज ज्या ज्या गांवांवरून आले तिथले तिथले लोक दिङ्मूढ होऊन पहात होते. हा कोण धटिंगण?

तारीख ५ जानेवारी १६६४, मंगळवारीं सकाळपासूनच घाबरलेल्या लोकांची धांवपळ सुरू झाली. ह्या फौजेंत शिवाजी आहे, असें लोकांत कर्णोपकर्णीं पसरलें आणि मग तर त्यांच्या चिभा टाळ्याला चिकटल्या!

सुरत अगदीं नेहमींच्या व्यवहारांत मग्न होती. मोठी मोठी शेठमंडळी नेहमींच्या निर्धास्तपणानें सौदे करीत होतीं. रस्ते नेहमींप्रमाणेच गजबजलेले व मजेंत होते. बाजारपेठेंतल्या तागड्या रोजच्याप्रमाणेंच खालींवर जात होत्या. सराफ कट्ट्यावरच्या नाजूक तराजूंत लक्ष्मी हळूच आपलं पाऊल टाकीत होती.

वलंदेजांच्या वखारींतला माल अगदीं निर्धास्तपणें वखारीच्या बाहेर पडला होता. त्यावरचं रंगकाम चाललं होतं. रंगारी संथपणें काम करीत होते.

सरायांत नवे नवे पाहुणे आलेले होते. त्यांत ॲबिसिनियाच्या बादशहाकडून, औरंगजेबाकडे जाण्यासाठीं एक हबशी वकील येऊन उतरला होता. त्यानें औरंगजेबासाठीं मौल्यवान् उंची नजराणा आणलेला होता.

इनायतखान शहरांत आपल्या कोतवालींत होता. त्याचें घोडदळ तेथेंच होतें. त्याच्या कांहींहि ध्यानींमनीं नव्हतें.

घणदेवीस महाराजांनीं मुद्दामच लोकांस सांगावयास सुरुवात केली कीं, आम्ही औरंगजेबाचेच सरदार आहोंत व ही फौज घेऊन महाबतखानाच्या बोलावण्यावरून अहमदाबादेला व तेथून पट्टणचें बंड मोडण्यासाठी जाणार आहोंत. तेव्हां लोकांना जरा बरं वाटलं.

मंगळवारीं (५-१-६४) सकाळीं सुमारें दहा वाजतां सुरतेंत पहिली आरोळी येऊन धडकली! कांहीं लोकांनीं घाबऱ्या घाबऱ्या इनायतखानाच्या हवेलीकडे धांव घेतली व त्याची भेट घेऊन घाम पुशीत पुशीत त्याला पुण्याकडचा तो

भयंकर शिवाजी घणदेवीपाशीं फौज घेऊन आला आहे, अशी बातमी दिली. ही बातमी ऐकून इनायतखान मनसोक्त हंसला !

" कौन ? शिवाजी ? वो चुव्वा ? हमारे सामने आया है ? हॉ हॉ हॉ हॉ हॉ !" खानाला हंसूंच आवरेना.

शिवाजी इकडे इतक्या लांब येईल ही कल्पनाच त्याला हास्यास्पद वाटली !

एवढ्यांत रस्त्यावरून लोक कुजबुज कुजबुज करूं लागले !

महाराज घणदेवीहून फौजेसह निघाले व सुरतेच्या अलीकडे फक्त सव्वा-दोन कोसांवर असलेल्या उटना या गांवीं येऊन पोहोंचले.

आतां मात्र सुरतेच्या रस्त्यावरून लोक पिसाटासारखे ओरडत धांवत सुटले. शिवाजी आया ! आया !

" शिवाजी ? मारी ऽऽ बाप ! मरी गयो रे बालाजी ! " लोकांनीं डोळे पांढरे करून आरोळ्या ठोकल्या. शेठ आणि शेठाण्या पोरं कांखेला मारून पळत सुटल्या.

एकदम भयंकर वादळ सुटल्यासारखी स्थिति झाली. लोक बोचकीं गाठोडीं घेऊन पळत सुटले. ही धांवपळ उलट्या सुलट्या दिशांनीं आणि सर्व रस्त्यां-वर सुरू झाली. लोक पडत होते. टकरा होत होत्या.

तागड्याचं एक पारडं दणकन् आदळलं ! सुरतेच्या बाजारपेठेंत तर हाहाःकार उडाला. पोटं सावरीत मंडळी पळूं लागली. एवढी मोठी संपत्ति ! हाय रे ठाकूरजी !

या अल्ला ! या खुदा ! मुझे बचाव, बचाव !

मुल्ला अब्दुल जाफर, हाजी सय्यद बेग, हाजी कासम, बहरजी बोहरा धांवत सुटले. सुरतेच्या रस्त्यांत आरडाओरडा, किंकाळ्या, रडारड, पडापड यांनीं एकच गिल्ला उडाला. इनायतखानाला हें समजलें तेव्हां त्याची अगदीं किंचित् धुंदी उतरली. त्यानें महालांतून हें दृश्य पाहिलें. भेदरट लोकांचें हंसूं आलें व रागहि आला.

महाराज उटना येथें आलेच होते. पुढच्या योजनेंत ते व बहिर्जी मग्न होते.

एवढ्यांत इनायतखानाला बातमी आली कीं, शिवाजी-बिवाजी कोणीहि नाहीं. आपलाच एक मोंगल सरदार उटन्यापाशीं आला असून महाबत-खानाच्या बोलावण्यावरून अहमदाबादेकडे जाणार आहे ! मग तर इनायत-

खान खूपच हंसला. त्यानें ताबडतोब आपला एक स्वार उटन्याकडे पिटाळला. त्याजपाशीं त्यानें निरोप दिला कीं, तुम्ही सुरतेच्या जवळ येऊं नका ! लोकांत उगीचच घबराट उडाली असून लोक पळत सुटले आहेत, हें जर शहेनशाह जिह्ले इलाहि ( औरंगजेब ) हजरतींना कळलं तर ते तुमच्यावर अशानें फार रागावतील ! ! !

हा हास्यास्पद निरोप त्या बावळट निरोप्यानें महाराजांकडे येऊन सांगितला. महाराज एकदम ओरडले, गिरफदार करा ह्या हरामखोराला ! ”

ताबडतोब त्या निरोप्याची गठडी वळली गेली. त्याची तर बोबडीच वळली.

सुरतेंत वलंदेजांनीं आपला वखारीबाहेर पडलेला माल भराभरा वखारींत नेला. वलंदेजी गोरंदोरानें आपलीं दोन माणसें उटण्याकडे सहज टेहळणी-साठीं पाठविलीं. पाहूं तरी खरं काय आहे ! शिवाजीच आहे कीं-? शिवाजी कशाला येईल इकडं म्हणा !

वलंदेजांचे ते दोन हेर उटन्यापाशीं आले. पण त्यांनीं पहाणी करण्या-ऐवजीं त्यांचीच पहाणी झाली. मराठी ढालाइतांच्या नजरेला ते पडतांच त्यांनीं त्या हेरांना बांधून महाराजांपुढें नेलं ! महाराजांनीं त्यांच्याकडे पाहिलं. थोडा विचार केला आणि म्हटलं, “ द्या सोडून यांना ! ”

दोघेहि सुटले. ह्यापैकीं एकानें पूर्वीं राजापुरावर महाराजांनीं छापा घातला होता तेव्हां महाराजांस प्रत्यक्ष पाहिलेलें होतें. त्यानें महाराजांस एकदम ओळखलें ! सारं भविष्य त्याला दिसूं लागलं !

हे सुटलेले हेर शहरांत गेले. त्यांनीं बातमी पक्कीच आणली, “ शिवाजीच आला आहे ! शिवाजी ! शिवाजी ! ”

वलंदेजांनीं व इंग्रजांनीं जाम बंदोबस्त सुरू केला. इंग्रजांचा गोरंदोर जॉर्ज ऑक्झेंडन हा ताबडतोब इनायतखानाकडे गेला. त्यानें इनायतखानाला विनंती केली की, आमचा वखारींतील माल व माणसें आम्ही खालीच्या गोदीकडे हलवितों. तुमची परवानगी द्या.

यावर इनायतखान उफाळून म्हणाला, “ बुझदिल ! डर किस चीजका ! गर तुम्ही इस तरह शहर तर्क कर भाग जाओगे तो खल्क को हँसनेकी कोई वजह नहीं । ”

जॉर्ज ऑक्झेंडन लगेच वखारींत गेला. या वेळीं दुपारचे अडीच वाजलेले होते. जॉर्जनें स्वाली होलकडे माणूस पाठवून आपल्या लॉयल मर्चंट नांवाच्या गलबतावरच्या इंग्रज अधिकाऱ्यास कळविलें कीं, ताबडतोब हत्यारबंद माणसें सुरतेच्या वखारींत पाठवा. त्याप्रमाणें स्वाली होलहून दहा हत्यारबंद इंग्रेज वखारीकडे निघाले.

वलंदेजांनाहि सुभेदारानें असेंच दटावलें. तेव्हां वलंदेजांनींहि इंग्रजांप्रमाणेंच स्वसंरक्षणाची तयारी केली. दोघांच्याहि वखारींत खूप अंतर होतें. दोघांनींहि आपापल्या वखारींचे दरवाजे बंद करून आंतून माल रचला. तटावर तोफा चढवल्या. गार्डिंग सुरू केलें. इंग्रजांच्या वखारींत फक्त दोनशें इंग्रज व सुमारें पन्नास काळे शिपाई होते.

इनायतखानाच्या भोंवतीं हाजी कासम, सय्यद बेग, मुल्ला जाफर, झहीद बेग, बहरजी बोहरा वगैरे अनेक व्यापारी दीनवाणे होऊन गोळा झाले होते. ते विलक्षण घाबरले होते. घामाघूम झाले होते. ते खानापाशीं संरक्षण मागत होते. अद्यापहि इनायतखान आपल्याच घमेंडींत होता. फक्त आतां तो हंसत नव्हता.

एवढ्यांत महाराजांनीं उटऱ्याहून आपला एक वकील सुरतेंत इनायतखानाकडे धाडला. वकिलाबरोबर महाराजांनीं स्पष्ट व खणखणीत निरोप पाठविला.

वकील दौडत दौडत कांहीं स्वारांसह बऱ्हाणपूर दरवाजांतून शहरांत प्रवेशला. लोक घाबऱ्या मुद्रेनें त्याच्याकडे टक्‌टका पहात होते. तो वकील खानाच्या महालापुढें आला.

वकिलाला इनायतखानापुढें नेण्यांत आलें. वकिलानें महाराजांचें म्हणणें खानाला स्पष्टपणें सांगितलें व महाराजांचें पत्रहि खानास दिलें. वकील म्हणाला, " उद्यां बुधवारीं आमचे महाराज सुरतेंत दाखल होतील ! त्या वेळीं तुम्ही स्वतः आणि हाजी सय्यद बेग, बहरजी बोहरा व हाजी कासम ह्या सर्वश्रेष्ठ व्यापाऱ्यांनीं महाराजांस जातीनें भेटून महाराजांची खंडणी ठरवावी ! आणि ठरेल ती रक्कम भरण्याची तजवीज करावी ! हें तुमच्याकडून न झाल्यास शहराची लूट व जाळपोळ आम्हांस करावी लागेल. मग त्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं ! "

पत्रांतील मजकूर हाच होता व ह्या पत्राची एक एक प्रत वरील तिघां व्यापाऱ्यांच्या हातीं वकिलानें दिली.

त्या व्यापाऱ्यांची तर कंबरच खचली. शिवाजीपुढें जातीनें हजर रहायचं ? जिवंतपणीं ? नारे बापा !

खानानें अवसान आणून जबाब दिला, " ठीक ठीक. समजलं तुमचं म्हणणं ! आमचे जबाब आम्ही उद्यां सबेरे सबेरे पाठवून देऊं ! जा तुम्ही ! "

महाराजांचा वकील आपल्या साथीदारांसह महाराजांकडे आला.

सुरतेंतील धांवपळ चालूच होती. जेवढं कांहीं बांधून घेतां येईल, तेवढं घेऊन लोक बायकापोरांसह पळत होते. तरीहि अद्याप सुरतेंत निम्म्याहून जास्त लोक होतेच.

शिवाजीची निव्वळ दमदाटी आहे. तो डोंगऱ्या उंदीर काय करतो ? सुरतेला हात लावणं म्हणजे काय एखाद्याचीं बोटं तोडण्याइतकं किंवा एखाद्याचं पोट फाडण्याइतकं सोपं आहे काय ? ती भेकड दगेबाजी इतर खानांपुढें ! इनायतखानापुढें नाहीं चालणार हें ! !—इनायतखान अजूनहि असंच समजत होता.

* * *

## ४ : : बुधवार, ६ जानेवारी १६६४

सकाळींच महाराज पुढच्या चालीकरितां तयार झाले. इनायतखानाचा कांहींच निरोप आला नाहीं. अखेर महाराजांनीं फौजेसह सुरतेकडे कूच केलें.

उटऱ्याहून शिवाजी सुरतेकडे पुढें पुढें येत असल्याची खबर सुरतेंत उठली. मोठी थोरली फौज घेऊन तो येत आहे व सुरत लुटणार, ही बातमी पसरली. आणि मग सुरतेंत ' न भूतो न भविष्यति ' गोंधळ उडाला. भयंकर पळापळ सुरू झाली. पोरंबाळं बायकापुरुष चंबूगबाळीं घेऊन पळत होते. मधून घोडे दौडत होते. मधूनच उंट. त्यांतच मेण्यांची धांवपळ.

अनेकांना अद्याप आपल्या दणकट वाड्यांचा विश्वास वाटत होता. घरच्या धनाची माया सुटत नव्हती. पळून जाववत नव्हतं. त्या लोकांनीं धडाधड दरवाजे, माड्या, खिडक्या बंद केल्या. आंतून अडसर घातले. वाटा बंद केल्या आणि ते आंतल्या आंत खुदाचं वा देवाचं नांव घेत बसले.

सकाळीं इनायतखानानें आपला वकील महाराजांकडे रवाना केला. त्यानें दिलेल्या निरोपांत महाराजांस असा उद्धटासारखा सवाल होता कीं, ' तुम्हांस दंड पाहिजे काय ? काय दंड पाहिजे तुम्हांला ? ''

हा भयंकर जबाब महाराजांस मिळतांच महाराज भयंकर संतापले. त्यांनीं एकदम त्या वकिलास कैद करण्याचा हुकूम केला. वकील कैद झाला. महाराज आतां मात्र सुरतेकडे दौडत निघाले. ह्या वेळीं सकाळचे नऊ वाजले होते.

इनायतखानानें शहराच्या रक्षणाची कांहींहि व्यवस्था केली नव्हती. शिवाजी आपल्या धारिष्ट्यवान् खलित्यानेंच पळून जाईल, अशी खानाची समज होती ! पण शिवाजीनें आपल्या वकिलालाच कैद केलें असून, स्वतः फौजेसह सुरतेवर येतोय् हें खानाला समजतांच खानाची अकस्मात् घाबरगुंडी बुडाली ! धैर्याचा बुरूज एकदमच कोसळला ! सारे बडे बडे व्यापारी आपल्याला बचावण्याकरितां त्याची मनधरणी-पायधरणी करूं लागले. तेव्हां खान गोंधळला. शिवाजी महाराज सुरतेच्या अगदीं एका हप्त्यावर येऊन पोहोंचल्यामुळें शहरांत अक्षरशः हलकल्लोळ उडाला होता. खानाभंवतीं व्यापाऱ्यांचा कल्लोळ लागला होता. वाटेल तेवढे पैसे देतों पण आम्हांला वांचवा असें ते म्हणत होते. तेव्हां त्या नादान सुभेदारानें मोठमोठ्या रकमांचीं आश्वासनें घेऊन त्यांना सुरतेच्या किल्ल्यांत बायकापोरांसह आश्रय देण्याचं वचन दिलं ! केवढी कर्तव्यदक्षता ! व्यापारी निघून गेले व आपल्या बायकापोरांसह व शक्य तेवढ्या संपत्तीसह किल्ल्याच्या दरवाजाशीं जमा झाले. इतरहि हजारों लोक किल्ल्याच्या दरवाजापुढें गोळा झाले.

एवढ्यांत सुभेदार आपल्या हजार शूर घोडेस्वारांसह भर शहरांतून दौडत दौडत किल्ल्यापाशीं आला. लांच देणाऱ्या व्यापाऱ्यांनाच फक्त त्यानें आंत घेतलें व किल्ल्याचे दरवाजे बंद करून टाकले ! ॲबिसिनियाचा राजकीय वकील किल्ल्याच्या दरवाजापुढें खानाला विनवीत होता कीं, मला आंत

च्या. पण त्याला घेण्यांत आलें नाहीं. तो बिचारा पळत पळत माघारी आपल्या सराईत गेला. किल्ल्यांत हाजी कासम, बोहरा वगैरे सर्व होते.

इतक्यांत इंग्रजांच्या वखारीच्या बाजूनें टापांचे खाड्खाड् आवाज ऐकूं येऊं लागले. इंग्रज गोरंदोर जॉर्ज ऑक्झेंडन् यानें दोनशें इंग्रज व पन्नास नेटिव्ह शिपायांचा याच वेळीं शहरांतून रूटमार्च काढला. हजार स्वार असलेला सुभेदार शौर्याच्या गप्पा मारतां मारतां किल्ल्यांत पळून गेला होता व अडीचशें लोक असलेला एक गोरा व्यापारी रूटमार्च काढून आपल्या धैर्याचें प्रदर्शन करीत होता. रूटमार्च किल्ल्यावरून परत वखारीकडे गेला.

महाराज बऱ्हाणपूर दरवाजाच्या बाहेर येऊन दाखल झाले. ह्या वेळीं दुपारचे अकरा वाजले होते. शहरांतून कोणीच तहासाठीं येत नाहीं, हें पाहून महाराजांनीं आपल्या सरदारांस शहरांत घुसण्याचा हुकूम दिला.

मराठी स्वार शहरांत घुसले. शहरांतले सर्व रस्ते ओस पडलेले होते. रस्त्यावर कुत्रंसुद्धां फिरतांना दिसत नव्हतं. एरव्ही सदैव गजबजलेले असणारे रस्ते भकास दिसत होते. कागदाचे कपटे अन् गवताच्या कावड्या वाऱ्यानें उडत होत्या.

स्वारांच्या हातांत भर दिवसां मशाली धडाडत होत्या. मराठ्यांच्या टोळ्यांमागून टोळ्या शहरांत घुसत होत्या. एकएका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घराकडे तरवारीनें खूण करीत बहिर्जी पुढें दौडत होता. शहराच्या मध्यभागीं मराठ्यांनीं दणादण घाव घालून दरवाजांचीं कुसें मोडलीं. धडाडाडा आवाज करीत दरवाजे कोसळले. मशाली घेऊन मराठे आंत घुसले. आंतून किंकाळ्या उठत होत्या. खडाखड् खिडक्या उघडल्या जात होत्या. सोन्यामोत्यांच्या थैल्या खालीं टाकल्या जात होत्या. खालचे लोक त्या गोळा करीत होते.

सुरतेच्या वेशीबाहेर असलेल्या बागेंत महाराजांकरितां एक शामियाना उभारला होता. महाराज शामियान्यांत बसले होते. भोंवतीं मावळे मंडळी होतीच.

भयंकर दरडावण्या व आसुडाचे तडाखे घरांघरांतून ऐकूं येत होते. घराच्या श्रीमंत मालकांना मराठे मुकाट्यानें धन देण्याबद्दल सांगत होते. ' नाहीं धन !' ' संपलं !' ' एवढंच !' असं खोटं सांगूं लागले कीं आसुडाचे तडाखे, भाल्यांची टोंचणी अन् मशालीचे चटके बसलेच. मग भराभरा जडजवाहिरांचे डबे पुढें येत.

क्रमांक २१००१ वि. ... क्रमांक ७४९ नों दि. २८/१२/५

तिजोऱ्या धडाधड फुटत होत्या. मराठे थैल्याच्या थैल्या भरून महाराजांकडे नेत होते. महाराजांपुढें ढीग पडत होते. प्रत्येक क्षणाला ढीग चढत होते.

मराठ्यांच्या स्वारांच्या तडाख्यांत एक गोरा इंग्रज गवसला. त्याचें नांव ॲंथनी स्मिथ. स्वाली होलकडून हा इंग्रजांच्या वखारीकडे येत असतां मराठ्यांनीं त्याला पकडला. लगेच त्याला महाराजांकडे नेण्यांत आलें.

सरायांतून लोक उतरलेले होते. मराठ्यांनीं सरायांवर धाड घातली. पाहुणे मंडळींना साफ धुऊन काढण्यांत आलें. त्यांतच ॲबिसिनियाचा वकील सांपडला. वास्तविक तो लौकरच दिल्लीला जाणार होता. त्यानें नजराणाहि खूप मोठा आणला होता. मराठ्यांनीं त्याला पकडून महाराजांकडे नेलें. तेथें अनेक व्यापाऱ्यांस पकडून आणलेलें होतें. सम्पत्तीच्या ठेवी मिळविण्यासाठीं त्यांच्यावर साम-दंड-भेदाचे प्रयोग चालू होते. आसुडांनीं बडवण्यापासून तों हात तोडण्यापर्यंत सर्व प्रकार होते. ॲबिसिनियन वकिलानें महाराजांस पाहिलें. खळाखळा थैल्याच्या थैल्या त्यांच्यापुढें येऊन पडत होत्या. हा राजा औरंगजेबाचा कट्टा शत्रु आहे हें त्या वकिलानें जाणलें. त्यानें आपणांस सराईत परत घेऊन चलण्याची विनंती मराठ्यांना केली. तो सराईत परत आला व एका ठिकाणीं ठेवलेला औरंगजेबासाठीं हबशी बादशहानें दिलेला खास नजराणा त्यानें बरोबर घेतला व तो महाराजांकडे आला. महाराजांच्या पुढें जाऊन त्यानें तो नजराणा महाराजांसच देऊन टाकला!

त्याची महाराजांनीं ताबडतोब सुटका केली.

सुरतेच्या जकात-घरांत अगणित जकात जमा झालेली होती. एका तुकडीनें प्रथम जकात घरावर हल्ला चढविला. सारी जकात महाराजांपुढें आली. ह्याच जकातघरापुढें इंग्रजांचा माल पडला होता. त्यांत सोनें, मोती नव्हते तरी मराठ्यांनीं त्याचा फन्ना उडविला. बहुधा ह्यांत कापड, खोबरें, काजू इत्यादि माल असावा!

मराठी धाड एका फार मोठ्या घराकडे वळली. इंग्रजांच्या वखारीच्या जवळच हाजी सय्यद बेगचें टोलेजंग घर होतें. घरांत पैसा खूप होता. माणसं मात्र नव्हतीं. तीं किल्ल्यांत जाऊन बसलीं होतीं. मराठ्यांनीं हाजीच्या घराचा दरवाजा फोडला व घर साफ लुटलें. पण मराठे इंग्रजांच्या अजिबात वाटेला

गल नाहींत. लढून ताकद खर्च करण्यापेक्षां दुसरीकडे त्यांना रग्गड लौकर मिळत होतं.

पण महाराजांनीं मात्र खडा टाकून पाहिला. पकडून आणलेल्या अँथनी स्मिथला महाराजांनीं आपले स्वार बरोबर देऊन वखारींत धाडलं व निरोप दिला कीं, तीन लाख रुपये खंडणी आणून द्या.

स्मिथ वखारींत गेला. जॉर्ज ऑक्झेंडनची त्यानें भेट घेतली व महाराजांचा निरोप सांगितला. तेव्हां जॉर्जनें सांगितलें कीं, 'आम्ही व्यापारी लोक; आमच्यापाशीं रोख पैसा नसतो. मागत असाल तर मसाल्याचे पदार्थ देतों !'

ही इंग्रजांची लबाडी महाराज जाणत होते. पण जर ह्यांचा पैका काढायचा म्हटलं तर चिमूटभर पैक्याकरितां माणसं व महत्त्वाचा वेळ खर्चावा लागेल, हें महाराजांस दिसत होतें. इंग्रजांपाशीं सहा तोफा व अडीचशें बंदुका सज्ज होत्या. तीच गोष्ट वलंदेजांची. आपण लढायला आलेलों नाहीं; पैका न्यायला आलेलों आहोंत, हें जाणूनच महाराजांनीं ह्या गोऱ्या व्यापाऱ्यांच्या नादीं लागायचं नाहीं, असे आपल्या लोकांस हुकूम दिलेले होते. अँथनी स्मिथला मात्र महाराजांनीं सोडलें नाहीं.

मराठे आतां सबंध शहरभर पसरले होते. किल्ल्याच्या आंवतींभंवतीं ते खुशाल हिंडत होते. लूट आणीत होते. खान आंत लपून बसला होता. एका तुकडीनें तर किल्ल्यावरच बंदुका घेऊन हल्ला चढवला. ते माळा लावून तटावर चढले व आंतल्या लोकांवर गोळ्या झाडूं लागले. खानापुढें नवाच प्रश्न निर्माण झाला. तेव्हां खानानें खालून तोफांचा मारा सुरू केले, मराठे तर तटावरून पळूनच गेले. पण खानाच्या माऱ्यानें बाहेरची शहरांतील घरें मात्र बरींचशीं पडलीं ! हा तोफखाना खानानें रात्रभर चालू ठेवला होता ! मराठ्यांना याचा कांहींच त्रास झाला नाहीं.

आजच्या दिवसांत शहराच्या मध्यभागीं थोड्याशा आगी लागल्या. लूट मात्र खूप मिळाली. अनेकांना कैद करून ठेवलेलें होतें.

महाराजांचे लोक लूट करतांना स्त्रियांना, मुलांना, वृद्धांना, फकिरांना, गरिबांना, मशिदी, दर्गे, अग्याऱ्या, गाई वगैरेंना अजीबात उपसर्ग लागूं देत नव्हते.

वलंदेजांचे दोन गोरे इसम फकिराच्या वेषांत सबंध शहरभर हिंडले व महाराजांच्या तळावरहि जाऊन आले. त्यांना कोणीं धक्काहि लावला नाहीं. कारण ते फकीर बनले होते. त्यांनींच नंतर आपल्या वखारींत येऊन लुटीचें वर्णन केलें.

महाराजांच्या तळावर गर्दी खूप होती. लोक लूट आणीत होते. थैल्या भरल्या जात होत्या. महाराज कैद्यांकडून पैक्याच्या कबुल्या घेत होते. ते एका बाजूस उंच आसनावर बसले होते. शहाबेगम बागेपासून स्मशानापर्यंत मराठ्यांचा तळ पसरलेला होता. पण सबंध तळावर महाराजांच्या शामियान्याशिवाय एकहि तंबू नव्हता. सर्व लोक उघड्यावरच वावरत होते. महाराजांच्या शामियान्याला कनाती नव्हत्या.

महाराजांनीं प्रत्येक गोष्ट दक्षतापूर्वक आंखली होती. सुरतेच्या भोंवतालीं त्यांनीं आपले गुप्तहेर आल्याबरोबर पेरून ठेवले होते. जर मोंगलांची फौज येऊं लागली तर एक दिवस कमींत कमी आधीं खबर मिळाली पाहिजे.

पहिल्या लुटींत मोठाच लाभ झालेला होता. पण मराठ्यांना एक मोठेंच घबाड एकदम मिळालें. दोन व्यापारी तीस पिपें संपत्ति घेऊन तापी नदीच्या पलीकडे पळून जाण्याची खटपट करीत होते. हीं तीस पिपें संपत्ति म्हणजे निव्वळ सोनें होतें. एवढं अवजड धन नदीपलीकडे न्यायचं कसं, हा प्रश्नच त्यांच्यापुढें होता. पण हा प्रश्न ताबडतोब सुटला. मराठी स्वारांच्या तें नजरेस पडलें! तीस पिपें सोनं महाराजांपुढें येऊन दाखल झालं!

आणखी एक गोरा टोपीवाला सांपडला. हा युनानचा (ग्रीस) रहिवासी होता. निकोलस कॅलोस्ट्रॉ हें त्याचं नांव. महाराजांपुढें त्याला नेण्यांत आलं. महाराजांनीं त्याला वकील म्हणून पुन्हां एकदां इंग्रजांकडे पाठविलं. पण इंग्रजांनीं मुळींच दाद लागूं दिली नाहीं. अगदीं थोडीं माणसं असूनहि दुर्दम्य आत्मविश्वास, शिस्त आणि नेत्यावरची निष्ठा जगाला काय दाखवूं शकते याचं हें उदाहरण होतं. पण महाराज इंग्रजांना भ्याले अशीहि घमेंड इंग्रज इतिहासकारांनीं मारण्याचें कारण नाहीं. महाराज जर इंग्रजांवर खरोखरच चालून गेले असते तर इंग्रज तासभर तरी टिकले असते कीं नाहीं, ही शंकाच आहे. महाराजांचा हेतु महाराज साधीत होते. राजापूरच्या इंग्रजांची वखार कुदळीनें खणून काढून, नव्वद हजारांची लूट करून व एकूण एक इंग्रजांना

दोन वर्षें रायगडच्या तुरुंगांत डांबून ठेवणाऱ्या शिवाजी महाराजांना इंग्रज इतिहासकारांनीं ओळखावें.

रात्र झाली. मशाली पेटवून मराठे शहरांत धुमाकूळ घालीत होते. अहो-रात्र लुटीचें काम चालू होतें. ढोल, ताशे बडवीत शहरभर मराठ्यांचा धुमाकूळ चालू होता.

* * *

## ५ : : गुरुवार, ७ जानेवारी १६६४

गुरुवारीं ७ जानेवारीच्या सकाळीं मराठी टोळ्या नव्या उत्साहानें लुटीस गेल्या. आज पहिली झडप पडली बहरजी बोहराच्या राजेशाही प्रासदा-वर. वलंदेजांच्या वखारीजवळ बहरजीचा वाडा होता. बहरजीची संपत्ति ऐंशी लाख रुपयांची होती. बहरजी कालच किल्ल्यांत पळाला होता. मराठे बहरजीच्या वाड्यावर गेले. दरवाजा फोडून ते वाड्यांत घुसले. गडगंज दौलत मराठ्यांना मिळाली. त्यांत अठ्ठावीस शेर मोती मिळाले. ही लूट चालू असतांनाच महाराजांच्या शामियान्यांत एक विलक्षणच प्रकार घडला.

सकाळीं दहा वाजतां ही गोष्ट घडली.

महाराज लुटीच्या शामियान्यांत बसले होते. पुढें पडलेल्या लुटीची ढोबळ मानानें निवड चालली होती. कारकून याद्या करीत होते. चांदीच्या वस्तु, सोनं, हिरे, मोती व खिचडी अशा थैल्या भरण्यांत येत होत्या. नवीन भर आणून टाकणारे मराठे खळ्‌ळ् करीत थैल्या ओतीत होते. एका बाजूला कैद्यांच्या रांगा उभ्या होत्या. महाराजांच्या शेजारीं थोडें मागच्या बाजूस कांहीं मावळे तरवारी खांद्यावर धरून उभे होते. शामियान्याच्या पुढें मराठ्यांची गर्दी होती. धांवपळ, आरोळ्या चालूच होत्या.

एवढ्यांत तळानजीक दरबारी वकिलाचा भारदस्त पोषाख केलेला एक तरुण आला. त्याचं बोलणं, वागणं मोगली रुबाबाचं, प्रौढ आणि आकर्षक होतं. तो जवळ येतांच मराठी मंडळींनीं त्याला कोण, काय पाहिजे वगैरे

विचारलें. त्यानें दरबारी अदबीनें सांगितलें, "सूरत–सुभेदार इनायत-खाँसाहबने मुझे वकीलकी हैसियतसे शिवाजी राजाकी मुलाकातके लिये भेजा है। गर सुलहकी शर्तें समझकर राजासाहब खानसाहबकी बातोंपर गौर करेंगे तो खाँसाहब बहोत एहसानमंद होंगे।[1]

"आपल्याला काय हवंय् मग?"

"शिवाजी राजाकी मुलाकात लाजिमी है। मेरी इल्तिजा गर महाराजके कदमोंतक होगी तो इनायत होगी।"[2]

"ठीक, थांबा जरा. महाराजांची मर्जी विचारतों." मराठी सरदारांनीं आलेल्या हेजिबाची अर्जी महाराजांच्या कानांवर घातली.

"हेजीब? इनायनखानाकडून आला आहे? बोलवा आंत त्याला." महाराज म्हणाले.

"महाराज, सुभेदार इनायनखाँसाहबने आपकी तरफ वकालतके लिये भेजा है। खाँसाहेबने दी हुअी वकालतकी सनद मेरे साथ हाजिर है।" दोन्ही हात पोटाशीं धरून व अदबीनें मान नमवून हेजिबानें म्हटलें.

"काय सांगणं आहे आपल्या खानसाहेबांचं?" महाराजांनीं विचारलं.

"खाँसाहबने आपके लिये कुछ शर्तें पेश की हैं। गर आपने कबुल फर्माए तो खाँसाहब सुलहके लिये तैयार हैं।[3]

"हं? अरे वा! खानसाहेबच आम्हांला अटी घालूं लागले का?" महाराज उपहासानें म्हणाले.

"महाराजसे तनहाइमें खबरे-अहेमियत् कहनी हैं।" हेजीब हळू आवाजांत म्हणाला.[4]

"काय?" असे उद्‌गार महाराजांच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच हेजीब झटकन् चार पावलें पुढें आला आणि निमिषमात्रांत त्यानें घोळदार अंगरख्याचे आंत हात घालून कट्यार काढली व एकदम महा-राजांवर झडप टाकली.

त्याच्या कट्यारीचा वार महाराजांच्या छातींत घुसणार इतक्यांत मागें उभ्या असलेल्या महाराजांच्या माणसानें एकदम झपकन् वार करून त्या हेजिबाचा हातच छाटून टाकला.

हेजिबानें भयंकर किंकाळी फोडली. तो इतक्या जोरानें महाराजांच्या अंगावर झाप टाकणार होता कीं, त्याचा हात तुटला तरीहि तो त्याच्या वेगामुळें महाराजांच्या अंगावर जाऊन आदळला. तुटलेल्या हातांतून भळभळा वाहणारें रक्त महाराजांच्या अंगावर पडून ते रक्तमय झाले. महाराजहि हेजिबाच्या आघातानें बाजूला जमिनीवर कलंडून पडले. एका क्षणांत सबंध शामियान्यांत भयंकर गडबड उडाली. कारकून, शिलेदार, सरदार वगैरे सर्वजण एकदम महाराजांकडे धांवले. हेजिबाच्या ह्या दगाबाजीमुळें भयंकर क्रोध उसळला. ज्या मराठ्यानें हेजिबाचा सफाईनें हात उडविला त्या मराठ्यानेंच संतापून त्या हेजिबाला महाराजांपासून फराफरा बाजूला ओढलें आणि तरवारींचे खडाखड घाव घालून त्याच्या डोक्याच्या चिरफाळ्या उडवून लावल्या. हेजिबाचं प्रेत तुकडे तुकडे होऊन रक्तांत पडलं. महाराजांस अजीबात जखम झालेली नव्हती. पण ह्या दगाबाज मारेकऱ्याच्या रक्तांत ते न्हाऊन निघाले होते.

शामियान्यांतले मराठे फारच खवळले. त्यांनीं भराभर तेथें कैद करून आणलेल्या कैद्यांचींच मुंडकीं उडविण्यास सुरुवात केली. त्यामुळें आरडाओरडा, आर्त विनवण्या यांनीं शामियाना दणाणून गेला. अनेकांचे हात कापले गेले. महाराज एकदम ह्या आपल्या खवळलेल्या लोकांकडे धांवले व त्यांनीं ह्या कैद्यांची कत्तल थांबविली. अँथनी स्मिथहि या तडाख्यांत मरायचाच, पण नशिबानें वांचला.

इनायतखानानें हा दगलबाजीचा प्रकार केल्यामुळें महाराजांचे लोक सरसहा पिसाळून गेले. शेंकडों आणि हजारों मशाली पेटल्या आणि सुरतेच्या रस्त्यांतून हे मशालवाले मराठे आगी लावीत धांवत सुटले. गांधीलमाशांचे जणुं थवेच. घरांच्या खिडक्या–दारांतून घुसून ते घरें पेटवीत सुटले. कालच्यापेक्षांहि लूट आणि आग फुगत चालली. तेलाच्या व्यापाऱ्यांचीं दुकानें फोडण्यांत आलीं. बुधलेच्या बुधले तेल रस्त्यावरून घरांच्या आगींत फेकून आगी भयंकर भडकविण्यांत आल्या. शहरांत आगीचा डोंब उसळला. लोक एकमेकांना हांका मारीत घरें फोडीत होते, लुटीत होते व लगेच आग लावीत होते.

हाजी झहीद बेगचें घर साफ लुटून पेटवून देण्यांत आलें. शहरांतील मोठमोठीं घरें पेटूं लागलीं. इंग्रजांच्या वखारीपाशींच झहीदचें घर होतें. मराठे ढोल बडवीत होते.

शहरांत आतां आगीचं राज्य होतं. जिथं आग नव्हती, त्या घरांत मराठ्यांचं राज्य होतं. मराठे घराबाहेर पडतांच घरांत आग घुसत होती. सुरतेची स्थिति 'ट्रॉय' शहरासारखी झाली होती.

हाजीबेगचें घर इतकें भयंकर भडकलें कीं, आगीचे लोळ ढगाला भिडले. इंग्रजांची वखार शेजारींच होती. ते लोक मोठ्या धारिष्टानें आपल्या वखारीचें रक्षण मराठ्यांपासून करीत होते. पण एवढ्यांत वारा एकदम फोंफावला व ज्वाळा फरारत इंग्रजांकडे येऊं लागल्या. ह्या वेळीं इंग्रज अधिकारी जेवण करीत होते. ते उठतात न उठतात तोंच ह्या ज्वाळा 'आ' करून वाऱ्या-बरोबर वखारीकडे येत असल्याचें त्यांना दिसलें. शहराच्या पूर्व व उत्तर भागांत आगीनें अत्यंत उग्र अवतार धारण केला होता. मोठमोठ्या इमारतींचे मजले आधार सुटून कडाडा आवाज करीत कोसळत होते. इंग्रज गोरंदोर सर जॉर्ज ऑक्झेंडन घाबरला व त्यानें कागदपत्रांचीं दप्तरें तरी निदान वांचवावींत म्हणून बाहेर काढलीं. पण त्याचें तकदीर शिकंदर. वाऱ्यानें तोंड फिरविलें आणि वखार वांचली.

बहरजी बोहराचा वाडा वलंदेजांचे वखारीपाशीं होता, तोहि धडाधडा पेटला. हीच स्थिति वलंदेजांवर आली होती, पण तेहि अगदीं असेच बचावले. शहरभर धूरच धूर पसरला होता. रस्त्यावर मराठे स्वार कैद्यांना फटके मारीत नेत होते. ओरडत होते. मशाली घेऊन दौडत होते.

कांहीं फरांसीस किरिस्ताव पाद्री शहरांत होते. ते आधींच इंग्रजी वखारींत जाऊन बसले; पण एक गोरा फरांसीस पाद्री मराठ्यांना सांपडला. त्याला उपद्रव न देतां मराठ्यांनीं महाराजांकडे नेलें. महाराजांनीं त्याची चौकशी केली. परंतु त्याला कोणताहि उपद्रव न देतां सोडून दिलें. तो लगेच इंग्रजी वखारींत आला. ह्या पाद्र्यानें जॉर्जला सांगितलें कीं, शिवाजी तुमच्यावर फार रागावला आहे. यामुळें जॉर्जला कांळजी वाटूं लागली. पण तरीहि त्यानें धीर न सोडतां कणखरपणें संरक्षण कायम ठेवलें. अर्थात् मराठे त्यांच्या कधींच वाटेस गेले नाहींत.

शामियान्यांत कैद करून आणलेल्या नव्या-जुन्या प्रत्येकाकडून दंड व संपत्तीचा शोध मिळविण्याचा तडाखा चालूच होता. अँथनी स्मिथकडेहि महाराजांनीं दंडाची मागणी केली. तेव्हां दुसऱ्या एका अर्मेनियन व्यापारी कैद्यानें स्मिथबद्दल सांगितलें कीं, हा अगदींच सामान्य गरीब माणूस आहे. तेव्हां महाराजांनीं स्मिथकडे फक्त साडेतीनशें रुपयांची मागणी केली. ती स्मिथनें मान्य करून तेवढी रक्कम मुकाट्यानें भरली. तेव्हां त्याची सुटका झाली. ह्या स्मिथचे कपडे अगदींच दरिद्री दर्जाचे होते. गबाळ वेषभूषेचा असा फायदा होतो!

गुरुवारच्या रात्रीं आगीचें रूप फारच भयानक दिसत होतें. दिवसां धुरामुळें सुरतेंत रात्र झाल्यासारखें वाटत होतें; तर आगीमुळें रात्रीं दिवस उगवल्यासारखें वाटत होतें.

शुक्रवारींहि आगीचे लोळ नव्यानें उठूं लागले. लुटीला तर खंड नव्हता. लुटीच्या पहिल्या दिवसापासूनच थैल्या भरण्याचें काम सुरू झालें होतें. शुक्रवारींहि तें चालूच राहिलें. रात्रीं मात्र लुटीचें काम जवळ जवळ संपत आलें; तरीहि उरली सुरली लूट जमा होत होती व उरलीं सुरलीं सर्व मोठीं घरें-म्हणजे पैसेवाल्यांचीं घरें-पेटत होतीं.

लुटीच्या थैल्या व पडशा एकुण तीन हजार होत्या. यांत सोनं, चांदी हिरे, मोती, जडजवाहीरच फक्त होतें.

शुक्रवारच्या पहांटे महाराज सर्व सरदारांस आवरासावरीचे हुकूम देत होते. तेवढ्यांत, सुरतेच्या आसपासच्या प्रदेशांत पहिल्याच दिवशीं पिटाळलेले महाराजांचे हेर दौडत सुरतेंत आले व महाराजांपुढें दाखल झाले.

"काय खबर?"

"महाराज, मोंगलांचा सरदार महाबतखान मोठी थोरली फौज घेऊन निघाला आहे!"

"हं? ठीक!" — आणि महाराजांनीं ताबडतोब निघण्याची तयारी करण्यास सर्वांस फर्मावलें.

प्रत्येक मराठी स्वाराबरोबर एक एक रिकामा जादा घोडा होता. ते सर्व स्वार लुटीच्या पडशा रिकाम्या घोड्यांवर लादूं लागले. किती जड पडशी एक एक! पावलें टाकतांना प्रत्येक पाऊल जड पडत होतं त्या मराठ्यांचं.

सकाळीं सर्व लूट घेऊन फौज तयार झाली. महाराजांनीं फक्त पांचशें स्वार रक्षाणार्थ पिछाडीस ठेवले आणि ते सुरतेंतून फौजेसह निघाले.

उरलेल्या पांचशें स्वारांनीं एक वार शहरांत जाऊन सर्व रस्त्यांवरून दौड मारली. कोळसा, राख, धूर, पडलेलीं घरें, भयप्रद भगदाडें आणि स्मशानवत् शांतता सुरतेंत शिल्लक होती. एखाद्या सुंदर युवतीच्या अर्धवट जळलेल्या प्रेतासारखी सुरतेची स्थिति दिसत होती.

सुरतेंतून निघून जाण्यापूर्वीं त्या जळत असलेल्या नगरीकडे घोड्यावर बसून पहात महाराज म्हणाले —

" कोणाशींहि आमचं व्यक्तिगत वैर नव्हतं आणि नाहीं. आम्हीं सुरत लुटली ती औरंगजेबाची म्हणून लुटली. औरंगजेबानं आमच्या मुलखाची सतत तीन वर्षं बर्बादी केली. कत्तली केल्या. त्याचा सूड म्हणून आम्हीं सुरत लुटली. बरेच दिवसांची आमची मसलत आज पार पडली ! पण सुरतेस ही आमची शेवटचीच भेट मात्र नव्हे ! "

महाराजांनीं घोड्याला टांच मारली आणि मागोमाग मराठी लष्कर निघालें. सुरतेंत महाराजांचे गेलेले पांचशें संरक्षक स्वारहि मागोमाग दौडत निघाले.

* * *

महाराज सुरतेची लूट घेऊन निघाले. त्र्यंबकेश्वराहून सुरतेस जितक्या वेगानें ते आले, तेवढ्या वेगानें महाराजांस माघारी जातां येईना, कारण प्रत्येक स्वारापाशीं लुटीचं ओझं होतं. तरीहि जास्तींत जास्त वेगानें महाराज राजगडच्या रोखानें येत होते. पहिल्याच दिवशीं त्यांचा मुक्काम सुरतेपासून सहा कोसांवर पडला. त्यांना व फौजेला गेले चार दिवस अजीबात विश्रांति मिळालेली नव्हती. अहोरात्र लुटीची धांवपळ करून सर्वच जण फार थकलेले होते.

मराठे सुरतेंतून निघून गेले. प्रचंड वादळ आलें होतें तें गेलें पण अग्नि मात्र अद्याप सर्व ज्वालाग्राही गोष्टींची लूट करीतच होता. अजूनहि त्याचें पोट भरलें नव्हतें. आपल्या ज्वालांच्या जिभांनीं तो चाटून पुसून सर्व फस्त करीत होता. सुरतेच्या रस्त्यांवरून हिंडणें अशक्य होतें. दोन्ही बाजूंनीं घरांना आगी लागलेल्या होत्या, त्याची धग होरपळून काढीत होती. सुरतेच्या बाजूला पांखरूं फिरकेना. इतकी आग, आग!

इतकें भयंकर तांडव गेले तीन दिवस चाललें होतें तरी सुभेदार इनायतखानाचें किल्ल्याबाहेर पडण्याचें धारिष्ट्य झालें नाहीं. इतकेंच काय, पण महाराज निघून गेल्यानंतरहि त्याला किल्ल्याबाहेर येववेना वलंदेज वखारवाल्यांनीं मात्र धारिष्ट्यानें आपल्या वखारींचा बंदोबस्त करून रक्षण केलें. इनायतखानानेंहि आपल्या एक हजार घोडदळाचें शिवाजीपासून रक्षण केलें!!

तारीख १७ जानेवारी १६६४ ह्या दिवशीं, म्हणजे महाराज निघून गेल्यानंतर आठव्या दिवशीं, महाबतखानाच्या हुकमतीखालीं मोंगल फौज सुरतेंत येऊन दाखल झाली. महाबतखान सुरतेंत शिरला तेव्हां त्याला सुरतेचें स्वरूप इतकें भयानक दिसलें कीं, ही सुरत आहे हें ओळखणें अशक्य होतें. सुरत गेली होती. बदसुरत राहिली होती. बहुतेक मोठमोठे वैभवसम्पन्न वाडे राखेंत लुप्त झाले होते. उभीं राहिलेलीं भिंताडें धुरानें काळींठिक्कर,पडलीं होतीं. घोटीव दगडांचीं जोतीं व चौथरे उष्णतेनें तडकले होते. शहरांत घरेंच जाग्यावर नव्हतीं तर माणसें कोठून असणार? मराठे निघून गेल्यामुळें क्वचित् कुणी

लोक शहरांत आपलें घर शोधीत हिंडत होते. आगीनें सर्व खाऊन टाकून ढेकर दिला होता. आतां मधून अधून कुठें कुठें धूर निघत होता. क्वचित् कुठें लहानसहान ज्वाळा दिसत होत्या. आकंठ मेजवानीनंतर अग्नि आतां तांबडालाल विडा चघळीत आणि हुक्क्याचे झुरके मारीत होता.

महाबतखानाची फौज सुरतेकडे दौडतांना पाहून सुरतेंतून पळून गेलेले लोक सुरतेकडे धांवत आले. लोकांच्या झुंडी शहरांत येऊं लागल्या. ती आपल्या घरादारांची राख पाहून लोकांना भयंकर चीड आली.इनायतखानाची. ' ह्या नादान अंमलदारानें स्वतःचा जीव फक्त भेकडासारखा लपून छपून वांचविला आणि बाकीची प्रजा असहाय स्थितींत वाऱ्यावर सोडली. हरामखोर! दगलबाज! शिवाजी मागत होता ती खंडणी देऊन टाकून कां ही हानि ह्या नादानानं वांचविली नाहीं? शांतपणें खंडणी घेऊन शिवाजी माघारी जात होता, तें ह्या मूर्खानं केलं नाहीं. आणि कणखरपणें सुरतेच्या रक्षणाचा प्रयत्नहि केला नाहीं. उलट यानं एक दिवस शिवाजीवर मारेकरी पाठवून आग भडकविली. प्रतिकार न करतां स्वकीयांच्या कत्तली पहाणारे व जाळ-पोळी पहात बसणारे अंमलदार तोफेच्या तोंडीं देण्याच्या लायकीचेच.'— अशासारखे विचार लोकांच्या तोंडून बाहेर पडूं लागले. महाबतखानाचे स्वार शहराच्या रस्त्यारस्त्यावरून फिरून आले. इंग्रजांचा गोरंदोर सर जॉर्ज ऑक्झेंडननें लगेच वखारीचे दरवाजे उघडले. इंग्रजी निशाण वखारीवर फडकत होतें. जॉर्ज आपल्या सहकाऱ्यांसह महाबतखानाकडे भेटावयास निघाला.

शहरांत महाबतखानाची फौज आल्याची खात्री झाल्यावर सुभेदार इनायतखान सुरतेच्या किल्ल्यांतून बाहेर पडला. त्याच्याबरोबर त्याचे दुय्यम अधिकारी व त्याचा मुलगा हे होते. इनायतखानाला आतां तोंड दाखवायला जागा नव्हती. तो आपल्या शहरांतल्या कोतवालीकडे जाऊं लागला. लोकांनीं त्याला पाहिलें. लोक चिडलेलेच होते. लोक त्याला शिव्या देऊं लागले. थुंकूं लागले. तो निर्लज्जपणें पुढें चाललाच होता. त्याचा मुलगा मात्र हा प्रकार पाहून बेचैन झाला. त्याला हा आपल्या बापाचा होत असलेला पाणउतारा फारच झोंबला. इनायतखान आणखी पुढें गेला तों लोकांचा त्वेष जास्तच भडकला. लोकांनीं त्याच्यावर शेणाचे गोळे फेकावयास सुरुवात केली आतां मात्र खानाचा पोरगा चवताळला. त्या पोरानें आपलें धनुष्य

काढलें व बाण जोडून एकदम त्या लोकांवर जोरानें सोडला. लोकांतून एक आर्त किंकाळी उठली व एक गुजराथी माणूस उरांत घुसलेला बाण धरून जमिनीवर कोसळला. तो एक अगदीं निरपराध प्राणी होता. हा चिरंजीवांचा पराक्रम! लोकांत धांवपळ झाली.

महाबतखानाकडे इनायतखान व इंग्रज टोपीवाला सर जॉर्ज ऑक्झेंडन आले. इनायतला महाबतखान कांहींच बोलला नाहीं. परंतु त्यानें जॉर्जची मात्र मनःपूर्वक पाठ थोपटली. त्याचें फार कौतुक केलें. त्यानें लगेच एक उत्कृष्ट घोडा, उत्तम किंमतवान् पोषाख व एक अत्यंत मौल्यवान् तरवार जॉर्जला देण्यासाठीं आणविली. व्यक्तिगत गौरवाचा तो झगमगाट पाहून जॉर्जलाहि फार आनंद झाला. त्याची इंग्रजी छाती अभिमानानें फुगली. ती गौरवाची देणगी पुढें येतांच जॉर्जचें इंग्रजी रक्त मेंदूकडे झपाट्यानें वाहूं लागलें! टोपीवाल्यानें लगेच नम्रपणानें जमिनीवर एक गुडघा टेकवून, डोक्याची टोपी काढून मान वांकविली व अत्यंत गोड शब्दांत तो महाबतखानाला म्हणाला, "खानसाहेब! आपण माझा गौरव केलांत, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. आपण केलेल्या गौरवामुळें माझ्या कर्तव्यांत मला जास्तच उत्साह निर्माण झाला आहे. आपण मला देणगी म्हणून ह्या मौल्यवान् वस्तु देतां आहांत. ह्या आपल्या प्रेमामुळें माझें हृदय भरून आलें आहे. परंतु आपणांला माझी नम्र विनंती आहे कीं, आपणांस माझ्याकरितां जर कांहीं करण्याची इच्छा असेल तर मला स्वतःला हा मौल्यवान् नजराणा न देतां माझ्या देशाच्या ह्या व्यापारी कंपनीला आपण कांहीं तरी द्यावें. मला स्वतःला कांहींहि नको!"

हें त्याचें बोलणें ऐकून खान चकितच झाला. लांच खाऊन फितुरी करणारे हरामखोर त्यानें खूप पाहिले होते. पण प्रेमानें दिलेलें बक्षीसहि न घेतां देशाच्या व्यापारी कंपनीसाठीं कांहीं तरी मागणारा हा टोपीवाला म्हणजे......इनायतखानाच्या दृष्टीनें महामूर्ख अव्यवहारी!!

महाबतखान खूष होऊन म्हणाला, 'मुझसे किस उम्मीदकी तमन्ना रखते हो?'[१]

जॉर्जनें नम्रतापूर्वक सांगितलें कीं, त्याच्या देशाच्या व्यापारी कंपनीला जकातींची माफी असावी.

महाबतखान जरा गोंधळला. पण लगेच त्यानें उत्तर दिलें, " तिजारतके जकातकी मुआफी? हाँ!! लेकिन् यह मेरे हकसे बाहर है। खास तौरसे हजरत शहेनशाह आलमगीर बादशाहका हक है। लेकिन् मैं ये यकीन दिलाता हूँ, कि जकातकी मुआफी के लिये शहेनशाहसे मैं बाशख्सियत् कोशिश् बजा फर्माऊँगा।"[२]

जॉर्ज खूष झाला. त्यानें आभार मानले.

सुरतेच्या प्रचंड लुटीची खबर औरंगजेबास लाहोर येथें समजली. जानेवारीच्या सुरुवातीस नुकताच तो काश्मीरहून लाहोरास आला होता. सुरतेची राखरांगोळी झाली, सुरत साफ लुटली गेली व शहर आगीच्या भक्ष्यस्थानीं पडलें, हें त्याला समजलें. हें ऐकून औरंगजेबाच्या अंगाची आग आग झाली. काय करूं अन् काय नाहीं, हें त्याला समजेना. औरंगजेबाच्या मस्तकांतहि आग भडकली आणि तीहि भडकविली शिवाजीनेंच!

* * *

महाराज मात्र झपाट्याने घाट चढून देशावर आले. महाराजांस अडवावयास कोणीहि आला नाहीं. संपूर्ण लूट सुरक्षितपणें घाट चढली.

महाराज राजगडाकडे चालले होते. प्रत्येक स्वाराला ते गोड ओझं हलकं वाटत होतं. महाराज आतां आईसाहेबांस भेटावयास आतुरले होते. संक्रांतीचा सण उलटून गेला होता. सूर्य आपल्या रथाचे सातहि घोडे उधळीत भर वेगानें आकाशांत नवें संक्रमण करीत होता.

आतां राजगड फक्त दोन मजलींवर राहिला होता. महाराजांचा मुक्काम पडला होता. सैनिक ढाली काखेखालीं धरून गप्पागोष्टी करीत होते. कोणी लवंडले होते. कोणी फिरत होते. झाडाच्या फांद्या सळसळत होत्या. उन्हाचे कवडसे शिवाशिवी खेळत होते. सूर्य माथ्यावर आला होता. एवढ्यांत—एवढ्यांत वज्राघात झाला! महाराजांची छावणी थरकली. सर्वांचीं हंसरीं तोंडें एकदम उतरलीं. लवंडले होते ते दचकून उठले. घोड्यांनीं कान टवकारले. वारा थांबला. छावणींत सांडणीस्वाराकडून बातमी येऊन थडकली! भयंकर बातमी! ऐकवेना! ऐकली त्यांनीं डोळे विस्फारले. छातीवर हात ठेवला.—महाराजांचे वडील, तीर्थरूप महाराज शहाजीराजे कर्नाटकांत होदीगेरीच्या जंगलांत मरण पावले! ही बातमी छावणींत येऊन थडकली.

अवघड बातमी महाराजांच्या कानांवर गेली. कुऱ्हाडच कोसळली.

" महाराज, राजगडावर आईसाहेबांकडेहि खबर रवाना झाली आहे ! "

" आईसाहेबांना ? " महाराज दुःखानें ओरडले. त्यांचें भानच उडालें. ऊर फाटलें.

" आईसाहेबांना खबर रवाना झाली ? आईसाहेबांना ? आईसाहेबांना ? आई ऽऽऽ ! " महाराजांनीं कळवळून हंबरडा फोडला व तस्सेच तडक शामियान्यांतून आपल्या घोड्यकडे धांवले. सारी मंडळी गहिंवरली. महाराजांच्या मागोमाग धांवली. आईसाहेबांस बातमी कळली. आतां त्या नक्की नक्की सती जाणार, हें महाराजांस स्पष्ट दिसूं लागलें. आई चालली ! सारी पृथ्वी डळमळते आहे, भयंकर झंझावात सुटला आहे आणि आपण दूर अंधारांत फेकले जात जात आहोंत, असें महाराजांस वाटूं लागले.

" आई ! आलों. थांब. मला न भेटतांच जाऊं नकोस ! "

दुःखाच्या लाटा तांडव करूं लागल्या. महाराजांनीं घोड्यावर झेप घेतली आणि राजगडाकडे बेहाय घोडा दौडला. आई ! आई !

अडीचशें कोस दूर राहूनहि आपल्यावर मायेची सावली धरणारे वडील गेले आणि आईसाहेबहि चालल्या. वडिलांच्या स्मृति आणि आईसाहेबांचे शब्द महाराजांच्या काळजांत घुसळून उठले—

—" शिवबा, लौकर माघारीं यायचं हं ! आमची मजल फार थोडी राहिली आतां ! "

—" केव्हांतरी जायचंच आतां ! भरल्या कुंकवाचुड्यानिशीं अखेर साधायची ! "

—" सूर्य मावळायच्या आंत माझीं पाखरं आपलीं घरीं यावीं ! "

—" शिवबा, अरे पतिव्रतेला पतिधर्माशिवाय धर्म नाहीं ! "

—" मुलंबाळं, घरदार पतिधर्मापुढें तिला तुच्छ असतं. "

महाराज आवेगानें टांच मारीत होते. घोड्याच्या तोंडाला फेंस आला होता. महाराजांचं ऊर फुटायची वेळ आली होती. डोळ्यांतून अश्रु घंळाळत होते. माझी आई ! माझी आई ! वडील गेले आणि न भेटतां आईहि चालली ! नक्कीच जाणार ! मुलाबाळांचा मोह न धरतां ती निघून जाणार. मला न भेटतां, न भेटतां ?

—" महाराज, आपणांस कोणकोणते विधि करावयाचे आहेत ? गंगास्नान, महापूजा आणि — ? "

— " होय, गंगास्नान, महापूजा ! "

— " आणि पिंडदान, श्राद्ध वगैरे ? "

— " नाहीं, नाहीं, नाहीं ! ! ! "

महाराजांना आईसाहेबांशिवाय डोळ्यांपुढं कांहीं कांहीं दिसत नव्हतं. झाडं मागं मागं पळत होतीं. घोड्यांच्या टापा खडाडत होत्या. महाराजांच्या मागोमाग पंत, येसाजी वगैरे पंचवीस-तीस जण दौडत होते. राजगडचा डोंगर दूरवर अस्पष्ट दिसत होता. आई तिथें होती. अजून दोन-अडीच तास पोहोंचायला लागणार होते. महाराजांचा जीव आईच्या भेटीसाठीं तळमळत होता. आपण पोहोंचायच्या आंत आईसाहेबांनीं चितेंत उडी — ? नको !

असं वाटत होतं, नको परमेश्वरा अंत पाहूंस. उचल ह्या आईवेड्या मुलाला आणि ठेव एकदम नेऊन त्याच्या आईच्या मांडीवर ! पहा, काय बेहाय घोडा दौडतोय् तो ! भीति वाटतेय्, परमेश्वरा, जर ह्या घोड्याचा पाय कुठं गुंतला, अडखळला, घसरला तर — नको असलं अभद्र !

—पण त्याचा काय नेम ? शहाजीराजांचं असंच नाहीं का झालं ? आयुष्याचीं साठ वर्षं घोडा दौडणारे शहाजी राजे घोड्यावरून कोसळूनच—!

—कर्नाटकांत होदीगेरी ह्या ठिकाणीं शहाजी राजांचा मुक्काम होता. राजे आतां फार थकलेले होते. तरीहि हाडांतली चळवळ अद्याप शमलेली नव्हती. त्यांना शिकारीची फार तल्लफ आली. ह्या दिवशीं तारीख होती २३ जानेवारी १६६४. त्यांनीं शिकारीसाठीं निघण्याचा आपल्या खाशा मंडळीस हुकूम केला. राजे निघाले.

होदीगेरीच्या जंगलांत राजे शिरले. जंगलाच्या अंतर्भागांत शिकार टेहळीत घोड्यावरून ते हिंडत होते. त्यांच्या हातांत भाला होता. एवढ्यांत त्यांना एक ससा झरंकन् समोरून पळत जातांना दिसला. राजांनीं लगेच टांच मारून पाठलाग करण्यास सुरुवात केली. घोडा दौडत होता. राजांची नजर सशावर होती. एवढ्यांत एकदम घोड्याची टांच रानवेलीच्या जाळींत अडकली आणि घोडा अत्यंत वेगांत असतांनाच धाडकन् कोलमडला. राजे दणादिशी जमिनीवर आदळले गेले. भयंकर जखम झाली. राजे जागच्या जागीं बेशुद्ध झाले.

लोकांची हांकाहांक आणि धांवाधांव सुरू झाली. राजांना त्यांनीं लगेच उचलून नेलं. खूप औषधोपचार केले. चांगले चांगले अनुभवी वैद्य झटत होते. पण राजांची ती मृत्यूशींच झटापट चालू होती. राजांचे धाकटे चिरंजीव व्यंकोजी राजे शेजारीं होते. अखेर सर्व उपाय थकले आणि राजांनीं हें जग सोडलें.

व्यंकोजी राजांनीं सर्व क्रियाकर्मांतरें केलीं.

विजापूर, बंगळूर आणि राजगडला ही बातमी घेऊन सांडणीस्वार रवाना झाले.

—आणि राजगडावर ही बातमी आली !

राजगडावर जणुं विजेचा लोळच आकाशांतून कोसळला. राजवाड्यांत बातमी गेली. एकच रडारड सुरू झाली. किल्ला दुःखाच्या धुक्यांत लुप्त झाला आणि मग आईसाहेबांची स्थिति ? ती कशी सांगावी ? बातमी ऐकली आणि त्यांना भोंवळच आली. कारभारी, चिटणीस, सबनीस धांवले. आईसाहेबांच्या सुना भराभरा धांवत आल्या. वाडा एकदम दुःखांत बुडाला. साऱ्याच जणी रडत होत्या.

" आईसाहेब ! आईसाहेब ! " सुनांनीं कल्लोळ केला. छोटे संभाजी राजे रडत होते.

आईसाहेब शुद्धीवर आल्या. त्यांनीं डोळे उघडले. परंतु त्यांच्या मुद्रेवर विलक्षण गांभीर्य आणि कमालीची शांतता पसरली होती. त्यांच्या नेत्रांतून पाण्याचा तुषारहि येत नव्हता. पापण्या हलतहि नव्हत्या. आईसाहेबांची नजर शून्य आणि अत्यंत स्थिर झाली होती. भोंवतीं नातवासुनांची रडारड चालली होती. कारभारी मंडळी अश्रु ढाळीत चिंतातुर आणि दुःखातुर मुद्रेनें बाजूला उभी होती. पण आईसाहेबांच्या मुद्रेवर दुःखाची वा कोणत्याहि विकाराची यत्किंचितहि छटा नव्हती. विलक्षण गांभीर्य ! अत्यंत निश्चल नजरेनें त्या शून्यांत पाहत होत्या. एक शब्दहि त्यांच्या मुखांतून उमटत नव्हता. ओठांची, पापण्यांची वा मुद्रेवरील रेषेचीहि हालचाल होत नव्हती. सारे जण हुंदके आवरीत त्यांच्याकडे आश्चर्यानें व चिंतेनें पाहूं लागले. आईसाहेबांच्या डोळ्यांत कसल्या तरी निश्चयाची तिरीप उमटूं लागली. वाढूं लागली. विलक्षण तेज तें ! आईसाहेबांची नजर जणुं पोलादाहूनहि कणखर असा पडदा भेदीत

भेदीत जात होती—इतक्या त्या तीव्र व अविचल नजरेनें शून्यांत पाहत होत्या. कारभारी मंडळीहि बावरून गेली.

—आणि आईसाहेबांनीं एकदम कारभाऱ्यांकडे नजर फिरविली. त्याच क्षणीं जोडलेले हात पुढें करून कारभारी पुढें झुकले.

" पंत ! " आईसाहेब उद्गारल्या.

" आज्ञा आईसाहेब ! "

" आम्हीहि जाणार ! आमची सती जाण्याची तयारी करा ! " आईसाहेब निश्चयी स्वरांत उद्गारल्या.

आणि भोंवतीं एकदम दुःखाचा, रडारडीचा केवळ हलकल्लोळ उडाला. कारभारी मंडळी ओक्साबोक्शीं रडून आईसाहेबांच्या पुढें पदर पसरून म्हणूं लागली, " आईसाहेब, नका नका ! दया करा आम्हां लेकरांवर ! " कारभाऱ्यांनीं भुईवर मस्तकं टेकलीं.

शंभूराजांनीं आईसाहेबांच्या गळ्याला मिठी मारली. कुणी आईसाहेबांना हृदयाशीं धरून, तर कुणी आपलें मस्तक त्यांच्या मांडीवर ठेवून त्यांच्या सुना कळवळून रडूं लागल्या. वाड्यांत दुःखाचा डोंब उसळला. अवघा किल्ला वेड्यासारखा झाला.

" नाहीं ! आम्ही जाणार ! सतीचा धर्म ! आमची तयारी करा ! " आईसाहेबांनीं कठोर निश्चयानें आज्ञा केली. भोंवतीं मायेचा सागर थडाथड लाटा आपटीत होता. नातू, नाती आणि सुना बिलगल्या होत्या. तरीहि त्यांच्या मुद्रेवरती एकहि रेषा पालटली नव्हती. आईसाहेब जाणार !— चालल्या ! ! आणि महाराज गडावर नव्हते ! ! ! गडावर सर्वांचीच केविलवाणी धांवपळ चालली होती. कारभारी मंडळी बिचारी अक्षरशः भांबावून गेली होती.

" पंत राजोपाध्यायांना बोलवा ! " आईसाहेबांची आज्ञा.

" आईसाहेब, नका ! महाराज काय म्हणतील ? काय करतील ? पाय धरतों आम्ही तुमचे ! नका लोटूं दूर ! " लहान मुलांसारखी कारभाऱ्यांची स्थिति झाली.

" पंत, आतां शिवबाला तुम्हीं सांभाळायचं. आमचा पहारा संपला. चितेची तयारी करा. " आईसाहेब अगदीं शांतपणें म्हणाल्या.

भोंवताली एवढी करुण परिस्थिति प्रसरली होती तरी आईसाहेबांच्या नेत्रांत थेंब नव्हता. मुद्रेवर दुसरी छटा सुद्धां नव्हती. केवळ करार. सतीचा करार. आतां काय म्हणून रडायचं? ज्यांच्या वियोगामुळं रडायचं त्यांच्या-मागोमाग जायला आतुर असल्यावर कशाची माया? कसलीं बंधनं? मन तर केव्हांच तेथें पोहोंचलं आहे. आतां फक्त हा देह अग्निनारायणाच्या स्वाधीन केला कीं झाली शेवटची वाट मोकळी. ही सतीची समाधि. संवेदनांची सीमा केव्हांच पार झाली.

राजवाड्यांत सुवासिनींची गर्दी झाली. प्रभाकरभट्ट राजोपाध्ये आले. त्यांनींहि आईसाहेबांस फार फार विनविलं, "नका जाऊं. महाराज कोणाकडे बघतील?" पण नाहीं. आईसाहेबांचा निश्चय आणि गडावरचा अन् वाड्यांतला शोक जास्तच वाढत होता. अन् महाराज तेथें नव्हते.

"महाराजांना भेटल्याशिवाय आईसाहेब जाणार!"

"होय जाणार! माझ्या शिवबाला माझा आशीर्वाद सांगा!"

"आईसाहेब, नका कठोर होऊं. महाराज वासरासारखे हंबरून विचार-तील, माझी आई कुठंय्, आई कुठंय्? काय सांगावें आम्हीं त्यांना?" कारभारी गहिंवरून म्हणाले.

"पंत, तें आतां शक्य नाहीं. सतीचा धर्म तुम्ही जाणतां. सूर्यास्त व्हायच्या आंत — "

पति मृत्यु पावल्याचें समजतांच त्या दिवशीं सूर्योदयानंतर व सूर्यास्तापूर्वी म्हणजे आकाशांत सूर्य असतांनाच, सूर्याच्या साक्षीनें सतीनें पतीच्या शवा-बरोबर किंवा शव जवळ नसेल तर पतीच्या पादुकांबरोबर किंवा पतीच्या कोणत्याहि वस्तूबरोबर सती गेलं पाहिजे, हा धर्मनियम होता.

आईसाहेबांनीं केस सोडले! सतीचं सर्व साहित्य पुढं आलं. ढसढसा रडत असलेल्या सुवासिनी पुढें आल्या. आईसाहेबांच्या पाठवणीची तयारी!

कारभाऱ्यांचा आणि सर्वांचाच आत्मा दूर कुठेंतरी असलेल्या महा-राजांना हांका मारीत होता, "महाराज, लवकर या! तुमची आई तुम्हांला न विचारतां, न भेटतां चालली!"

सारेजण अश्रु पुशीत वेड्यासारखे बेचैन होऊन तटावरून महाराजांची वाट निरखीत होते.

क्र. १००४५१

सुवासिनींनीं आईसाहेबांस मळवट भरला !

आणि क्षितिजावर धुळीचे लोट उठलेले गडावरून दिसले. आशाळी नजरेनें गडावरची मंडळी तिकडे पाहूं लागली. डोळे पुसपुसून पाहूं लागली. धूळ पुढें पुढें सरकत होती. कोण येतंय् ? महाराज का ? जगदंबे, दया कर? आण त्यांना !

धुळीचे लोट पेटलेल्या दारूच्या डांबरबत्तीप्रमाणें सरसरसर गडाकडे सरकत होते. गडावरच्या मंडळींची दुःखी आतुरता वाढत होती.

आईसाहेबांनीं हिरवा चुडा हातीं भरला.

गडाच्या दरवाजावरचे मावळे एकदम ओरडले.

" महाराज आले, महाराज आले ! " ह्या भयंकर दुःखद स्थितींतहि विजेप्रमाणें क्षणार्धांत गडावर रडवं हास्य उजळून गेलं.

महाराज आले. एखाद्या वासरासारखे ते दौडत येत होते.

महाराजांचा घोडा गडाच्या दरवाजांतून आंत शिरला. चिटणीस, सबनीस वगैरे मंडळी शेल्यानें डोळे पुशीत पुढें आली.

" महाराज ! " दाटलेच्या गळ्यांतून हांक फुटली.

" आईसाहेब कुठं आहेत ?"

" वाड्यांत ! महाराज आईसाहेब सती निघाल्यांत हो ! ऐकत नाहींत ! त्यांनीं तयारी केली ! "

" आई ऽऽऽ ! " महाराज वाड्याकडे हरिणीच्या पाडसासारखे धांवले.

महाराज आल्याची खबर वाड्यांत आली. सर्व स्त्रिया भराभरा बाजूला झाल्या. महाराज आंत येतांच शोकाचा एकदम डोंब उसळला. आइसाहेबांनीं मळवट भरला होता. त्यांच्यापुढें सतीचं सर्व साहित्य तयार होतं.

" आईसाहेऽब ! " महाराजांनीं हंबरडा फोडून आईसाहेबांकडे धांव घेतली. आणि एकदम त्यांचीं पावलं घट्ट पकडून ढसढसां रडत महाराज म्हणाले, " आईसाहेब, हें काय करतां आहांत ? मला न भेटतां कुठं चालला होतां तुम्ही ? "

आईसाहेबांच्या मुद्रेवर निश्चलता कायम होती. प्रत्यक्ष एकुलत्या एक मुलाच्या हाकेनंहि त्या सतीची समाधि भंगली नाहीं.

" शिवबा ! " आईसाहेबांनीं अगदीं शांत नजरेनं महाराजांकडे पहात अगदीं संथ आवाजांत महाराजांस हांकारलें. आणि त्यांच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरविला. महाराज अतिशय शोकाकुल झाले होते.

" शिवबा, शोक करूं नकोस. सतीचा धर्म तूं जाणतोस."

" वडील निघून गेले. आतां तुम्हीहि चाललां. मी काय करूं एकटा इथं? कुणाच्या मांडीवर डोकं ठेवूं ? सारी मायाच आटली. "

" तूं तुझीं कर्तव्यं कर. आला प्राण रहात नाहीं. केव्हांतरी जायचाच. माझा धर्म सतीचा. माझ्या धर्ममार्गानें मला जाऊं दे ! "

" मासोळी पाण्याबाहेर कशी जगेल ? मीहि येणार. मला घेऊन चला. तुमच्यावांचून ह्या वाळवंटांत मी कसा जगूं सांगा ! माझं दैवत तुम्ही. दुःखाच्या आगींत लोटून जातां आहांत. त्यापेक्षां प्रत्यक्ष बरोबरच घेऊन चला."

" पतीमागून पतिव्रता गेली पाहिजे. "

" आईसाहेब, केवळ सती जाईल तीच पतिव्रता का ? " राजोपाध्ये म्हणाले, ' कुंती, कौसल्या, सुमित्राः ह्याहि थोर पतिव्रताच होत्या ना ? "

" होय, पण खरा सतीचा मार्ग—"

" पुत्राच्या कल्याणांत आणि ईश्वरसेवेंत आयुष्य कंठणं हाच राहील. धर्मानं स्पष्ट सांगितलं आहे तसं, आईसाहेब !" राजोपाध्ये म्हणाले.

" हे सारे पर्याय आहेत. शिवबा, शांत मनानं माझी पाठवणी कर. सूर्य ढळत चालला. "

महाराजांनीं आसवांचा अभिषेक मांडला होता. ते कळवळून म्हणाले, आईसाहेब, किती कठोर झालां हो ! "

" कठोर नाहीं तें कर्तव्य कसलं ? शिवबा, तुझं स्वराज्याचं कर्तव्य कर. माझा आशीर्वाद आहे ! "

" आईसाहेब, किती सांगूं ? पदर पसरतों. मी पाय सोडणार नाहीं. आई, माझी आई चालली. पंत सांगा काय करूं ? कशी अडवूं ? मला ओलांडून चालली. आई ! आई ! ! आई ! ! ! गुरुजी, धर्मशास्त्र मायलेकरांची ताटातूट करण्याइतकं निर्दय आहे का हो ? "

" नाहीं महाराज ! आईसाहेब, पुत्राला दुःखांत लोटून आपण जाऊं नका. पुत्रवती स्त्रीनं सती गेलंच पाहिजे, असा नियम धर्मशास्त्रांत नाहीं. ती

न गेली तरी तिळमात्रहि तिला दोष नाहीं!" प्रभाकरभट्टांनीं धर्मशास्त्र सांगितलं.

साऱ्याच मंडळींनीं आतां टाहो फोडला. पुत्र, सुना, नातू, राजपुरोहित व मोरोपंत वगैरे सर्वच कारभारी मंडळी आईसाहेबांस कळवळून विनवूं लागली. पण व्यर्थ!

"आईसाहेब, व्रतवैकल्यांत पतीमागून जीवन कंठणं हाहि शास्त्रमान्य सतीधर्मच आहे." राजोपाध्यायांनीं म्हटलं.

"आईसाहेब, तुम्हीं वडिलांकडे गेलेलं वडिलांनाच आवडणार नाहीं!" महाराज म्हणाले.

"शिवबा!–" आईसाहेबांनीं एकदम कठोर नजरेनं महाराजांकडे पाहिलं.

"होय आईसाहेब. खरंच बोलतोंय् मी. सतीच्या व्रताहूनहि घेतलेलं महान् थोर व्रत अर्धवट टाकून निघून आलेलं वडिलांना आवडेल का?"

"व्रत?"

"होय, महान् दिव्य व्रत! स्वराज्याचं व्रत. तें व्रत पूर्ण व्हावयाच्या आंतच तुम्ही निघून चाललांत! स्वतःच्या मांडीच्या सिंहासनावर मला खेळवतां खेळवतां स्वराज्याचं स्वतंत्र सार्वभौम सिंहासन निर्माण करण्याचं व्रत घेतलंत तुम्हीं. तें पूर्ण होण्याच्या आंतच–आईसाहेब, तुम्हांला जातां येणार नाहीं! व्रताची सांगता केल्याशिवाय जातां येणार नाहीं. घेतलेलं व्रत अर्धवट टाकणं–" आईसाहेबांना शिवबानें पेंचांत घट्ट पकडलं. त्या गोंधळल्या. महाराजांनीं त्यांचीं पावलें धरलीं होतीं.

"नाहीं! शिवबा, त्या व्रताची जोखीम तुझ्यावरच. मला स्वारींचे पाय पाहूं देत. उशीर होतोय्, मला जाऊं दे. गुरुजी—!" आईसाहेबांचा निर्धार ढळेना. त्या उठूं लागल्या.

निर्वाणीचा प्रसंग. महाराजांचा शोकसागर डहुळला. महाराज! एकच गलका उडाला.

"आई ऽ ऽ!" इंद्राचें वज्रहि भेदून जाणारी भयंकर आर्त हांक महाराजांनीं मारली आणि त्यांनीं एकदम आईसाहेबांच्या मांडीवरच बसून आईसाहेबांच्या गळ्याला मिठी मारली.

"मला ढकलूं नका! मला टाकून जाऊं नका. मी जगूं कसा? मी सोडणार नाहीं. माझी आई! माझी आई!" महाराजांनीं घट्ट गळामिठी मारून आकांत मांडला. त्या शोकाला सीमा नाहीं. आईसाहेबांचं हृदय हेलकावलं. त्यांच्या मुद्रेवर फरक पडत गेला. ओठ कंप पावूं लागले. मस्तक थरथरलं. खडकाचा टवका उडाला. आईसाहेबांनीं एकदम महाराजांना हृदयाशीं धरलं आणि त्यांनीं हंबरडा फोडला, "शिवबा!"

आईसाहेब ढसढसा रडूं लागल्या. मायलेकरं एकमेकांना आसवांखालीं न्हाऊन काढीत होतीं.

मोठ्या कष्टानं आईसाहेबांनीं भाळींचा मळवट पुसला. दुःखानें कोंडलेल्या त्यांच्या कंठांतून कसेबसे शब्द बाहेर पडले : "शिवबा, स्वराज्याची सांगता लवकर कर!"

* * *

## ८ : : मुधोळ

महाराजांनीं सुरत एवढी घुसळून काढून लुटली तरी औरंगाबादेंत शहाजादा मोअज्झमच्या हातांतला पेलाहि हिन्काळला नाहीं. मोंगल साम्राज्याची अब्रू मराठ्यांनीं फरफटत नेली, तरी मोअज्झमला किंचित् ओरखडाहि निघाल्यासारखं वाटलं नाहीं. ह्या शहाजाद्याची चैन आणि झोप अगदीं बिनधोक चालू होती. महाराजांनीं मात्र मोंगलांच्या ह्या गाफीलपणाचा, दुधातुपानें हात धुऊन, फायदा घेतला.

शहाजीराजे गेले. आईसाहेबांच्या भाळींचा सौभाग्यटिळा निघून गेल्या-मुळें एकदम त्यांची मुद्रा उदासवाणी दिसूं लागली. महाराजांनीं वडिलांचें श्राद्ध विधिपूर्वक पार पाडलं. विपुल दानधर्म केला.

शहाजीराजांचा सहवास महाराजांस वयाच्या दहाव्या वर्षांनंतर लाभलाच नाहीं. तरीहि राजांचं लक्ष आपल्या मुलाकडे सतत होतं. जें कार्य आपल्या

मराठी ग्रं. . . . ठाणे. ...
मुधोळ : अनुक्रम 27007 दि: 25/1/...
क्रमांक ........ नोंः दिः 26/1/...

हातून घडलं नाहीं, तें आपल्या मुलाच्या हातून साकार होत आहे, हें पाहून त्यांना फार धन्यता वाटे. वारंवार पत्रें व माणसें पाठवून आणि मौल्यवान् वस्त्रालंकार पाठवून ते मुलाचा आणि पत्नीचा समाचार घेत. अवघड प्रसंगीं इशाऱ्याचे सल्ले लिहीत. वडील गेले. आईसाहेबहि चालल्या होत्या. मोठ्या कष्टानं तें छत्र महाराजांनीं टिकवून धरलं.

महाराज कांहीं दिवस आईसाहेबांपासून हाललेच नाहींत. राजकारणें तटलीं होतीं. नव्या मसलती वाट पहात होत्या.

महाराजांनीं नेताजी पालकरला मोंगली मुलखांत धुडगूस घालण्यास पिटाळून दिलें. आरमार वाट पहात होतें. त्यांनीं दर्यासारंगास, पश्चिम समुद्रावर, शत्रूचं जहाज फिरकूं देऊं नका, साफ लुटून आणा, जाळून टाका, बुडवा, असे हुकूम पाठविले. ते स्वतः जातीनं फौज घेऊन स्वराज्याच्या उत्तर सरहद्दीवर येऊन दाखल झाले. आणि आतां मराठ्यांच्या भालातलवारींचीं पातीं मोंगल सल्तनतींत खोल घुसूं लागलीं. नेताजीनें मोंगल सरदारांना सतावून सोडलं. त्याला आवरणं मोंगलांच्या ताकदीबाहेर गेलं होतं. समुद्रावर भगव्या झेंड्याचीं जहाजं दिसलीं कीं शत्रूच्या जहाजांना कंप सुटूं लागे. तेथें दयामाया नव्हती. दर्यासारंगानें अरबस्तानाकडे जाणारीं जहाजं साफ लुटलीं.

स्वतः महाराज अहमदनगर प्रांतांत घुसले. त्यांनीं औरंगाबादेपर्यंत धडक मारली. मोंगलांचे हाल मोंगलांस माहीत. महाराजांच्या ह्या वायुगतीच्या भराऱ्या मोंगल सरदारांस सोसवत नव्हत्या. कितीहि पाठलाग करा, ठाण्यांचे कितीहि बंदोबस्त करा, कितीहि फौज असूं द्या, महाराजांनीं त्यावर झडप घालून डल्ला मारलाच म्हणून समजावं.

महाराजांनीं मोंगलांची ही दाणादाण चालूच ठेवली होती. औरंगजेबाला फुशारकीचीं पत्रं पाठवून स्वतःच्या पराभवाचीं टेंगळं झाकण्याचा हे मोंगल सरदार प्रयत्न करीत. महाराजांनीं याच वेळीं निळोजी प्रभु फारसनविस यांच्याकडून फारसी भाषेंत एक खरमरीत पत्र लिहून, दक्षिणेंत आलेल्या एका मोंगल सरदारांस पाठविलें. निळोजी प्रभु हा महाराजांचा खास विश्वासू फारसनविस होता. त्या फारसी पत्राचा सारांश असा होता—

“ आज तीन वर्षें बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा मुलूख काबीज करण्याकरितां चालून येत आहेत, हें तुम्हां सर्वांस माहीतच आहे.

औरंगजेब बादशहा तुम्हां लोकांस फर्मावतात, 'शिवाजीचे किल्ले व मुलुख काबीज करा!' तुम्ही लोक यावर जबाब पाठवितां, 'आम्ही लवकरच काबीज करतों!'

"आमच्या या डोंगरी मुलखांत नुसता कल्पनेचा घोडासुद्धां नाचविणें कठीण आहे. मग तो मुलूख काबीज करण्याची बात कशाला? भलत्याच खोट्या थापा बादशहाकडे लिहून पाठवितांना तुम्हांला शरम कशी वाटत नाहीं! आमचा मुलूख अवघड व डोंगराळ आहे. त्यांतून नदीनाले उतरून जाण्यास वाट नाहीं. अत्यंत मजबूत असे आमचे अनेक किल्ले आज तयार आहेत. बिचारा अफझुलखान गाफीलपणें जावळीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखीं पडला. दख्खनचा आमचा हा सर्व प्रकार तुम्ही तुमच्या बादशहास स्पष्टपणें कां कळवीत नाहीं? अमीर-उल-उमराव शाएस्ताखान आमच्या ह्या अस्मानचुंबी पहाडांत व पाताळांत पोंचणाऱ्या दऱ्यांत सतत तीन वर्षें खपत होता. 'मी शिवाजीचा पाडाव करून लवकरच त्याचा प्रदेश काबीज करतों,' असें बादशहाकडे लिहून लिहून तो थकला. या थापेबाजीचा परिणाम त्याला भोंवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. माझ्या भूमीचें संरक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे आणि तुम्हीं बादशहाकडे कितीहि खोटया बातम्या लिहून पाठविल्या तरी मी आपलें कर्तव्य बजावण्यास कधींहि चुकणार नाहीं."

महाराजांचें हें पत्र मोंगल सरदारांच्या हातीं पडलें. शिवाजी हें एक असाध्य दुखणें मोंगल सत्तेच्या पाठीशीं लागलें आहे, हें ते सरदार जाणूनच होते. पण बिचारे तलवारीचा खेळ महाराजांशीं खेळत होते आणि शब्दांचा खेळ औरंगजेबाशीं खेळत होते.

या वेळीं औरंगजेबानं आपला एक वकील विजापूरचा बादशहा आदिलशहा याजकडे पाठविला; त्याला कळविलें कीं, 'तुम्ही ताबडतोब शिवाजीवर चढाई करा. आम्हीहि आमचे सरदार पाठवीत आहोंत. आपण दोघे मिळून शिवाजीशीं लढून त्याचा फन्ना पाडूं. ही काफिरी सल्तनत हरउपायानें बुडविलीच पाहिजे.'

खास दिल्लीहून चेतावणी आल्यावर आदिलशहा पेटला. त्यानें आपला खासा वजीर खवासखान यास शिवाजीवर जाण्यास फर्माविलें. सिद्दी सरवर,

शहा हजरत, शेख मिरान अित्यादि सरदार वजिराच्या बरोबर दिले. बादशहानें याच वेळीं मुधोळचा बाजी घोरपडे यास फर्मान पाठवून खवासखानास सामील होण्यास कळविलें.

खवासखान कुडाळच्या रोखानें निघाला. कुडाळ हें सावंतवाडीच्या जवळ रत्नागिरी जिल्ह्यांत आहे. अत्यत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराजांचे प्रत्यक्ष सापत्नबंधु व्यंकोजीराजे हेहि वडिलांच्या मृत्यूचं दुःख विसरून आपल्या भावाविरुद्ध लढण्यासाठीं खवासखानाच्या फौजेंत सामील झाले.

कुडाळ सावंतवाडीच्या सावंतांच्या ताब्यांत होतं. हे सावंत म्हणजे महाराजांचे भाऊबंदच. ह्यांचा वंश भोसल्यांचाच. जसे मुधोळकर घोरपडे हे महाराजांचे भाऊबंद तसेच हे सावंत. तिघांचीं घराणीं एकच. रक्त एकच. पण घोरपडे आणि सावंत महाराजांचें मनःपूर्वक वैर करीत असत. वाडीच्या लखम सावंतानं महाराजांविरुद्ध लढण्याकरितां गोव्याच्या पोर्तुगीजांची आणि वेंगुर्ल्याच्या डचांची मदत मागितली. सावंत हे घोरपड्यांइतकेच विजापूर दरबारचे निष्ठावंत गुलाम होते.

खवासखान कुडाळवर चालून येत आहे, ही खबर महाराजांस लागतांच महाराज तडक दक्षिण कोंकणांत फौज घेऊन उतरले. खवासखान घाट उतरून अद्याप कुडाळकडे उतरलेला नव्हता. महाराजांस तेवढ्यांत खबर मिळाली कीं, मुधोळकर बाजी घोरपडे बादशहाच्या हुकुमावरून खवासखानास सामील होण्यासाठीं मुधोळहून निघत आहे. ही खबर महाराजांस कळतांच त्यांच्या तळपायाची आग मस्तकास पोहोंचली. बाजी घोरपडे! भोसल्यांच्या अवलादीचा असून भोसल्यांच्या आणि स्वराज्याच्या नाशाकरितां टपलेला हा एक भयंकर विषारी साप होता. डंख करण्याची संधि तो कधींहि दवडीत नसे. बाजीवर महाराजांचा व आईसाहेबांचा भयंकर दांत होता. शहाजीराजेहि बाजीचं नांव ऐकलं कीं चिडत असत. ह्या इसमाची करणीच तशी होती.

पूर्वीं शहाजीराजांना पकडून आणण्याकरितां हाच बाजी घोरपडे मोठ्या हिरीरीनें, मुस्तफाखान व अफझुलखान यांच्याबरोबर गेला होता. दगाबाजी करून ह्याच बाजीनं राजांवर छापा घातला व ते जखमी होऊन बेशुद्ध झाले असतांना त्यांच्या हातांत व पायांत यानें बेड्या ठोकल्या होत्या. राजे बाजी घोरपडे!—नव्हे राजे दगाबाज घोरपडे!

हा अपमान शहाजीराजांस आमरण झोंबत होता. बेशुद्ध झालों असतां बेड्या घालणारा बाजी, हातापायांत बेड्या असतांना भर विजापूर शहरांतून आपली अपमानास्पद मिरवणूक काढणारा अफझुलखान आणि कुराणावर हात ठेवून अखेर घात करणारा मुस्तफाखान हे जिवंत असलेले शहाजी-राजांस पाहवत नव्हते. या तिन्ही हाडवैऱ्यांना भोसल्यांच्या हातूनच मरण आलं पाहिजे, ही शहाजीराजांची तळमळीची इच्छा होती. अफझुलखानास महाराजांनीं प्रतापगडाखालीं जातीनं जाऊन फाडून काढलं. मुस्तफाखान वार्धक्यामुळें कर्नाटकांतच मरून गेला होता. पण उरला होता बाजी !

बाजी घोरपडे मुधोळहून निघण्यापूर्वींच आपण मुधोळ गांठायचं हा भयंकर कष्टाचा आणि तितकाच धाडसी विचार महाराजांनीं पक्का केला. वडिलांच्या हयातींतच ह्या हरामखोराचा मुडदा आपल्या हातून पडायला हवा होता. नाहीं जमलं तें. आतां !!!

महाराज एकदम मुधोळवर चालून निघाले. बाजीला याची गंधवार्ताहि नव्हती. महाराज मुधोळांत घुसले. गांवांत एकच गोंधळ उडाला. शिवाजी आल्याची ओरड बाजीला कळतांच तो सापासारखा उसळला. होती नव्हती तेवढी फौज घेऊन तो महाराजांवर चालून आला. महाराजांच्या हातांत भवानी तलवार व डाव्या हातीं ढाल होती. आज ते वारुळांतच घुसले होते. त्यांचा आवेश विलक्षण होता.

बाजी धांवून आला. समोरून महाराज धांवून येत होते. दोघेहि चवता-ळून एकमेकांवर धावून गेले. खडाड्कन् दोघांच्याहि समशेरी एकमेकींवर आदळल्या. दोन्ही फौजांत घनघोर युद्ध सुरू झालें. तरवारींच्या आघातांनीं ठिणग्या उडत होत्या, खडाखड् मुंडकीं उडत होतीं. घटकेपूर्वीं शांत असलेले मुधोळ रक्तांत न्हात होतं. महाराज आठवण देऊन देऊन बाजीवर घाव घालीत होते—

" राजे, पंधरा वर्षांपूर्वीं आमच्या तीर्थरूप शहाजी राजांवर दगाबाजीनें छापा घालून तुम्हीं त्यांना कैद केलंत. आठवतं ?, वडिलांच्या त्या अपमानाचा सूड उगविण्यासाठीं मी आलों आहें. "

" त्याच बेड्या तुझ्याहि हातांत पडतील !" बाजी चिडून म्हणाला. शब्दांच्या ठिणग्या आणि तलवारीच्या विजा कडाडत होत्या.

" राजे, तुम्ही तुमच्या मरणानं मरताहांत. परक्या बादशहाकरितां स्वतःच्या भावावर आघात करणारे तुम्ही ! "

" शहाणपणाचं पुराण बंद कर. शहाजीराजे माझे वैरीच होते. तूंहि वैरीच. भोसले आमचे वैरी ! "

" बादशहा तुमचे नातलग. अफझुलखान तुमचा नातलग. मग त्याच्या-कडेच जा. खानाला मींच पुढं रवाना केलंय्. तुम्हीहि तिकडेच जा. "

" पोरखेळ नव्हे ! तूं घोरपड्यांपुढें हत्यार धरतो आहेस. मेलों तरी तुझ्या हातून खास मरणार नाहीं. आणि जेव्हां मरेन तेव्हां मेल्यानंतरहि तुझ्या बापाशीं स्वर्गात वैर करीन. "

महाराजांच्या तरवारीचे घाव वज्राघातासारखे बाजीवर पडत होते. विलक्षण चपळाईनं दोघेहि जण घाव घालीत होते. महाराजांचे डोळे निखाऱ्या-सारखे फुलले होते. करकरून दांत खात ते लढत होते. भूमि लाल झाली होती. यमाच्या दरबारांत एक घटका पाण्यांत हेलकावे खात होती. कुणाची ? दोघांचाहि भडिमार भयंकर होता.

— एवढ्यांत खाड्कन् घाव बाजीवर पडला. घटका डळमळली. खसकन् तरवार काळजांत घुसली. आर्त आरोळी आकाश भेदीत गेली. हेलकावे खात खात घटका बुडाली. बाजी घोरपडे पडला. महाराजांची भवानी त्याच्या काळजांत घुसली. रक्ताचा पाट खळाळूं लागला. बाजीच्या काळजांत घुसलेली तलवार उपसून काढीत महाराज विस्फारलेल्या नजरेनं त्याच्याकडे पहात होते. शहाजीराजांचं आज खरं श्राद्ध पार पडत होतं. आज आईसाहेबांची एक हौस फिटत होती.

महाराजांनीं मुधोळ लुटून फस्त केलं. अमाप दौलत हातीं लागली. पंच-महाल मुधोळ आपलासा करून ते ताबडतोब कुडाळवर आले. बाजी मारला गेल्यामुळें महाराजांच्या मनाला फारच समाधान वाटत होतं फारा दिवसांचा सूड आज उगवला. अफझुलखान आणि बाजी घोरपडे–भोसल्यांशीं दगल-बाजी करणारे भोसल्यांचे आणि स्वराज्याचे हे हाडवैरी महाराजांनीं खास आपल्या हातांनीं ठार मारले. महाराज असे होते !

बाजीला मारून महाराज कुडाळवर चालून आले. खवासखान वझीर आपल्या अमाप फौजेसह कुडाळांत होता. त्यांत सिद्दी सरवर, शेख मिरान,

वाडीकर सावंत भोसले, इखलासखान, शहा हजरत वगैरे फौजबंद सरदार होते. त्यांतच महाराजांचे प्रत्यक्ष बंधु व्यंकोजी राजे भोसले हेहि होते. दोन्ही फौजांची गांठ पडली. समोर पहातात तों महाराजांना व्यंकोजी राजांची मूर्ति दिसली. वडिलांच्या मृत्यूनंतर भावांची पहिली भेट रणांगणावर ! वैरी म्हणून !

महाराष्ट्राला हा पिढ्यान्‌पिढ्यांचा शाप आहे.

महाराजांनीं कुडाळच्या डोंगराळ भागांत खवासखानाच्या फौजेला केंचींत पकडलें आणि कत्तल उडविण्यास सुरुवात केली. व्यंकोजी राजे महाराजां-विरुद्ध फारच बहाद्दुरीनें लढत होते. परंतु बाकीच्या फौजेची दाणादाण उडत होती. अखेर नेहमींप्रमाणें व्हायचं तेंच झालं आणि खवासखान मार खाऊन पळत सुटला. सर्वच जण रणांगण सोडून पसार झाले. व्यंकोजी राजे सुद्धां.

फार मोठा विजय महाराजांस मिळाला.

तेथून महाराज लगबगीनें मालवणला गेले.

ह्या सबंध वर्षांत महाराजांनीं अमाप संपत्ति मिळविली. पश्चिम किनाऱ्या-वर बळकट आरमार आणि अभेद्य जलदुर्ग बांधण्याचं स्वप्न गेलीं अनेक वर्षं महाराजांच्या डोळ्यांपुढं तरळत होतं. महाराज याच हेतूच्या पूर्तीकरितां मालवणला गेले. आणि महाराजांनीं मालवणच्या किनाऱ्यालगत असलेल्या एका विस्तीर्ण, कणखर बेटाची पहाणी केली. अन् तिथेंच जलदुर्ग बांध-ण्याचा आपला निश्चय कायम केला. मालवणच्याच स्थानिक उपाध्यायांस महाराजांनीं सन्मानपूर्वक बोलावून आणलं, आपला मनसुबा सांगून किल्ल्याचा पहिला चिरा बसविण्याकरितां त्यांस मुहूर्त विचारला. उपा-ध्यायांनीं या धर्मराज्याच्या धर्मराजाचें थोर मनोगत मनांत आणून ग्रहस्थितिनक्षत्रादींची अनुकूलता पाहून मुहूर्त सांगितला : मार्गशीर्ष वद्य द्वादशी.

मार्गशीर्ष वद्य द्वादशी शके १५८६ या दिवशीं तें बेट माणसांनीं फुलून गेलं. वाद्यं वाजत होतीं. पूजासाहित्य तयार होतं. महाराज पूजेस बसले. गवंड्यांनीं चुना व शिसं तयार ठेवलं होतं. महाराजांनीं स्वहस्तें भूमिपूजन केलं. उपाध्यायांनीं मंत्र सांगितले. वेदमंत्रांच्या आणि वाद्यांच्या निनादांत महाराजांनीं किल्ल्याचा पहिला चिरा बसविला. दक्षिणा दिल्या. वस्त्रें दिलीं.

जंजिरे सिंधुदुर्गाचें काम झपाट्यानें सुरू झालें. या दिवशीं तारीख होती—२५ नोव्हेंबर १६६४. लगेच महाराजांनीं असंख्य गलबतें व महागिऱ्या सिंधुदुर्गाच्या भोंवतीं आणून नांगरण्यास दर्यासारंगास आज्ञा केली.

महाराज सिंधुदुर्गाचें काम चालू करून प्रतापगडाकडे परतले. आई-साहेबांचा मुक्कामहि प्रतापगडावरच होता. त्यांचा अत्यंत आवडता किल्ला हा. पांच वर्षांपूर्वीं अफझुलखानाचा फन्ना येथेंच उडाला. आणि अफ-झुलखानाचा जिगरदोस्त बाजी घोरपडे याचा फन्ना उडवून महाराज येथेंच आले. महाराजांचे अत्यंत जुने, वृद्ध, विख्यात आणि महाराजांवर पुत्रवत् प्रेम करणारे कारभारी सोनोपंत डबीर हे गडावरच होते.

काळे ढग पूर्ण वितळले होते. सुवर्णाच्या तेजानं सृष्टि न्हात होती. स्वातंत्र्याचा सूर्य आतां अप्रतिबंध पराक्रमानं अस्मानांत तळपत होता. सूर्याचं तेज वाढत होतं.

परंतु पंचांगाचीं पानं फडफडलीं पौष महिन्याच्या अखेरीस, वद्य अमावास्येस सूर्यास ग्रहण लागणार, अशी नियंत्यानें नोंद केली होती.

* * *

# ९ : : सूर्यग्रहण

औरंगजेब आतांपर्यंत शिवाजी महाराजांवर चिडत असे, संतापत असे. परंतु आतां मात्र त्याला महाराजांची चिंता वाटूं लागली. मोठमोठ्या फौजा आणि गाजलेले सरदारहि शिवाजीच्या हातचा मार खाऊन येतात. करावं तरी काय? आतां पाठवावं तरी कोणाला? स्वतःच जावं का? नको! एखादे वेळीं एकदमच बाजार खलास व्हायचा! मग काय करावं? शिवाजींचा नाश करणं तर दूर राहिलं; पण मोंगल सत्तेची सरहद्द राखणंसुद्धां आमच्या सरदारांच्या हातून घडत नाहीं. दीड-दीडशें कोस आंत घुसून सुरतेसारखं श्रीमंत ठाणं लुटून नेतो तो! उद्यां कदाचित् तो वऱ्हाडांतलीं कारंज्यासारखीं ठाणींहि लुटील. बादशहाला चिंता जाळूं लागली. त्याच्या डोळ्यापुढें आतां दोनच प्रखर पराक्रमी सरदार उभे राहिले. एक मिर्झा राजे जयसिंग आणि दुसरा दिलेरखान. पण त्यालाच वाटलं कीं, मिर्झा राजांच्या हातून एवढे डोंगरी कष्ट होतील का? ते आतां म्हातारे झाले आहेत. पण मग दुसरा कोण? कोणीच नाहीं. मग बोलवा मिर्झा राजांनाच.

औरंगजेबानें मिर्झा राजांना तशरीफ फर्मावली. शाही गुर्झबारदार लाल किल्ल्यांतून मिर्झा राजांकडे रवाना झाला.

मिर्झा राजांचं वय ह्या वेळीं बरोबर साठ वर्षांचं होतं. वयाच्या बाराव्या वर्षांपासून ते मोंगल दरबारची सेवा करीत होते. गेलीं अठ्ठेचाळीस वर्षें ते सतत लढत होते. बापाला कैदेंत टाकून आणि भावांची लांडगेतोड करून दिल्लीचं तख्त काबीज करण्याच्या औरंगजेबाच्या पुण्यकार्यांत जर मिर्झा राजांनीं मदत केली नसती तर औरंगजेब दिल्लीचा बादशहा होऊंच शकला नसता.

मिर्झा राजांचं कर्तृत्व फार दांडगं! ते औरंगजेबाचे अत्यंत निष्ठावंत नोकर होते. शिवाय आपल्या मुलीबाळी बादशहाच्या घरांत देऊन त्याचे ते नातलगहि झाले होते. शिवाजीसारख्या नादान दरवडेखोराला एवढी स्वकल्याण साधायची अक्कल कोठून असणार? त्यानें मूर्खासारखी औरंगजेबासारख्या थोर पुण्यवताविरुद्ध तरवारच उपसली होती.

मिर्झा राजे मोठे मुत्सद्दी होते. त्यांना अनेक भाषा येत होत्या. फारसी, तुर्की, हिंदी व उर्दू ह्या भाषा त्यांच्या जिभेवर सफाईनें नाचत होत्या. राजे फार गोड बोलत, फार गोड हंसत. मोगलांच्या रीतिरिवाजांत तर ते इतके तरबेज होते कीं, लोकांना वाटावं हे मोंगलच आहेत, रजपूत नव्हे. दुर्दैवानें ते रजपूत घराण्यांत आणि त्यांतूनहि अति दुर्दैवानें ते प्रभु रामचंद्राच्या सूर्यवशांत जन्माला आले होते; पण तो दोष त्यांचा कसा म्हणतां येईल !

तरवारीच्या मुठीवर हात ठेवून मिर्झा राजे लाल किल्ल्यांत आले. रुमालानें हात बांधून अत्यंत अदबीनें ते औरंगजेबापुढें गेले व कुर्निसात करून उभे राहिले.

" आइये मिर्झा राजे ! सल्तनतकी मामुलीसी हरकत भी आप जैसे कदीम वफादार सिपहसालार के बगैर रुक रही है। आप जैसे जअीफ सरदारको तकलीफ देना बखुदा इल्जाम होगा ! " लाघवी भाषेंत औरंगजेब म्हणाला.[१]

" जिल्हल्ला आलमपनाह । मैं जअीफ हों गया हूँ यह सच है, लेकिन शहेन-शाहे खिदमते अकदस का सवाल आया कि मैं जवानसे भी जवान होता हूँ। आप अर्जेनाचीज के जानिब खिदमत फर्माइये। बंदा जवान है, बंदा हाजिर है। " कुर्निसात करीत राजे बोलले.[२]

" मिर्झा राजा, आजतक आपको तकलीफ देना मुमकिन न समझकर माबदौलत दिगर रुस्तुम बहादुरोंको इस कामपर मुकर्रर करते आये हैं। इसमें शक नहीं कि यह बात मामुलीसी है लेकिन सभी हार मान गये। "[३]

" जिल्हेइलाहि सुबहान अल्ला ! छोटी या बड़ी बंदा नाचीज़ उसे जरूर सुलझायेगा ! "[४]

" माबदौलत को पुरा इख्लास है। "[५]

" आलमपनाह, हुक्म कीजिये। "

" दख्खनका चूहा शिवाजी भोंसला आपके पैरोंतले कुचला जाय ! " औरंगजेबानें हात वर केला. त्याच्या हातांतील जपाची माळ सळसळली.[६]

" हुजूरकी जर्रा नवाज़ीका शुक्रिया ! " जमिनीला स्पर्श करीत राजांनीं औरंगजेबास बार बार कुर्निसात केला.[७]

तारीख ३० सप्टेंबर १६६४ रोजीं दिल्लीच्या लाल किल्ल्यांतील दिवाण-ई-खासमध्यें दरबार भरला. ह्या दिवशीं औरंगजेबाचा अठ्ठेचाळिसावा वाढदिवस होता. ह्या थाटाच्या दरबारांतच औरंगजेबानें मिर्झा राजांना शिरपाव आणि समशेर देऊन महाराजांचा नायनाट करण्याचें फर्मान दिलें. दिलेरखानासहि नांवाजून त्यानें हुकूम दिला. मिर्झा राजे जयसिंग आणि दिलेरखान यांना दख्खनवर नामजात केलेलें पाहून दरबारची कळी खुलली. दोघेहि शूर. दोघेहि शेर. एक इस्पंदीयार तर दुसरा रुस्तुम.

मिर्झा राजे आणि दिलेरखान यांचा तळ पडला. पेशखाने उभे राहिले. शिबंदी, रसद, तोफ-खाना, दारुदगोळी छावणींत प्रचंड जमा झाली. मोंगली झेंडे, डंका, नौबती आणि पंजे छावणींत उभे राहिले. दाऊदखान खुरेशी, राजा रायसिंग सिसोदिया, राजा सुजनसिंह बुंदेला, राजा नरसिंह गौड, पुरणमल बुंदेला आणि मिर्झा राजाचा धाकटा मुलगा कीरतसिंह हे सरदार फौजेंत सामील झाले होते. औरंगजेबाच्या हुकुमावरून ह्यांत आणखी कुतुबुद्दीनखान, उदयराज मुनशी, उग्रसेन कछवा, जानीबेग बक्षी, गाझी बेग वगैरे अनेक सरदार होते. शिवाय उत्तम तोफखाना आणि तोफखान्यावरचा मुख्य अधिकारी म्हणून एक प्रख्यात इटालियन सरदार मिर्झा राजांनीं बरोबर घेतला होता. ह्याचं नांव निकोलो मनुची. हा मोठा चाणाक्ष आणि चौकस माणूस होता. मोठा थोरला खजिना स्वारीबरोबर हवाच, आणि तोहि होता.

औरंगजेबास अखेरचा कुर्निसात करून मिर्झा राजे निघाले. दिलेरखान निघाले. दिलेरखानचं तंगडं आपल्या तंगडीशीं कां बांधलं आहे हें मिर्झा राजांना माहीत होतं. समजत होतं. पण असल्या क्षुल्लक गोष्टीमुळें ते औरंगजेबाच्या सेवेंत कसूर करायला वेडे नव्हते. फार दूरदर्शी! बादशहा व परमेश्वर यांत किंचित्‌हि फरक न करण्याइतक्या उच्च अन् उदात्त पातळीवर ते पोहोंचले होते. शिवाजीसारख्या कंटकांचं निर्दालन हेंच आतां ध्येय त्यांच्यापुढें होतं. मिर्झा राजांनीं व दिलेरखानानें दिल्ली सोडली.

* * *

हे राहु-केतु सूर्यास ग्रासावयास निघाले. महाराज प्रतापगडावर आले होते. पौष महिना होता. उपाध्यायांनीं वद्य अमावास्येस सूर्यास ग्रहण आहे, असं सांगितलं.

“ शिवबा, सूर्यास ग्रहण लागतं आहे अवसेला ! ”

" सूर्य नारायणालाहि अशा संकटांना तोंड द्यावंच लागतं म्हणायचं ! "

" बाबा, कर्मयोग असाच. तो आचरायचा म्हटलं कीं सत्कार्य करतांनाहि संकटं ठेवलेलीं. देवांनाहि सुटका नाहीं आणि मानवालाहि सुटका नाहीं. संकटांनाच पर्वणी मानायचं. "

" ग्रहण हीहि पर्वणीच ? "

" होय, आणि शिवबा ह्या पर्वणींत खूप दानधर्म करावा, अशी माझी इच्छा आहे. "

" आईसाहेब, सांगा किती दान करायचं आहे तें ? सारी दौलत उघडी करतों ? "

" संसार करतांना व्यवहार सोडून चालत नाहीं शिवबा ! " आईसाहेब हंसून म्हणाल्या.

" पण आईसाहेब— ! बस्स ठरलं. पृथ्वीच्या वजनाइतकं दान देण्याइतकी दौलत खजिन्यांत अजून यायची आहे. पण पृथ्वीइतक्याच थोर माझ्या आईच्या वजनाइतकी दौलत जगदंबेच्या कृपेनें आहे माझ्या ओंजळींत. उद्यांच्या ग्रहणाचा दानविधि पंचगंगेच्या उगमस्थानीं श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथें करायचा. होय ना पंत ? " महाराजांनीं सोनोपंत डबीरांस विचारलें.

थकून वांकून सुकून गेलेले पंत लटलटत्या मानेनं महाराजांकडे कौतुकानें पाहत म्हणाले, " राजा, कौसल्येचा राम तूं. बोलशील तें करशील. "

पंतांना आतां फारसं चालवतहि नव्हतं. दृष्टि आणि शक्ति पार विरघळली होती. दिव्यांतलं तेल आतां अगदीं संपत आलं होतं.

महाराजांनीं विपुल सोनं पेटाऱ्यांत भरून लगेच महाबळेश्वरावर रवाना केलं. महाबळेश्वर प्रतापगडावरून अगदीं जवळ. तीन कोस मधल्या वाटेनें. सर्व तऱ्हेचें पूजासाहित्य, धान्य, वस्त्रें वगैरे रवाना झालीं.

सूर्यग्रहण तारीख ६ जानेवारी १६६५ ह्या दिवशीं होतं. सारा लवाजमा बरोबर घेऊन व पालख्या–मेण्यांत वृद्ध मंडळीस घालून महाराज महाबळेश्वरास आले. सोनोपंतांनाहि आईसाहेबांबरोबर महाराजांनीं महाबळेश्वरास आणलें.

श्रीक्षेत्र महाबळेश्वर हें फार प्राचीन क्षेत्र आहे. स्वयंभू शिवलिंगें येथें आहेत. महापवित्र श्रीकृष्णा नदी येथेंच उगम पावते. एकट्याच कृष्णाबाईचं

हें माहेर नाहीं. ह्या पांचजणी बहिणी. कृष्णाबाई, कोयनाबाई, वेणाबाई, सावित्री आणि गायत्री.

वेदमूर्ति गोपाळभट्ट महाबळेश्वरकर म्हणजे महान् थोर सत्पुरुष. आई-साहेबांची गोपाळभट्टांवर फार श्रद्धा. आईसाहेबांनीं त्यांचा गुरूपदेश घेतला होता. गोपाळभट्टांची वस्ती श्रीक्षेत्रींच होती. केवळ पांचच नव्हे तर अनेक गंगा आज येथें जमा झाल्या होत्या.

सर्वांनीं स्नानें केलीं. श्रीमहाबळेश्वराच्या मंदिरापुढें मोठी थोरली तागडी उभी केली होती. आईसाहेबांस व सोनोपंतांस घेऊन महाराज देवळापुढें आले. सर्वांनीं दर्शनें घेतलीं. कारकुनांनीं सोन्याचे पेटारे उघडले. सोन्याच्या तेजानें लक्ष्मी प्रसन्न हंसत होती.

" आईसाहेब ! " महाराज आईसाहेबांपाशीं आले आणि त्यांच्या हाताला धरून म्हणाले, " चला. "

सर्वांनाच मोठं कौतुक वाटत होतं. महाराजांनीं आईसाहेबांस तागडीच्या एका पारड्यांत बसविलें. शास्त्री-पंडित तुलादानविधीचे मंत्र म्हणत होते. आईसाहेबांना ह्या सोहळ्यापेक्षां शिवबाचंच कौतुक वाटत होतं. माझा मुलगा! त्यांचा गळा दाटून आला होता. महाराजांनीं दुसऱ्या पारड्यांत दोन्हीं हातांनीं त्या पेटाऱ्यांतील होन, पुतळ्या, मोहरा टाकण्यास सुरुवात केली. आईसाहेबांचें पारडें वरवर जाऊं लागलें. सर्वांची नजर वरच्या कांट्याकडे होती. महाराज मात्र ओतीत होते. सोन्याचं पारडं भुईला टेकलं. धन्य, धन्य शिवबा, तूं आणि तुझी आई ! !

कारकुनानें पूजेचं तबक आईसाहेबांच्या पुढें धरलं. आईसाहेबांनीं त्यांतून एक तुळसीपत्र उचललं आणि त्या सोन्याच्या पारड्यांत टाकलं अन् नमस्कार केला. आईसाहेब पारड्यांतून उतरल्या. आईसांबाची सुवर्णतुला झाली. सोनें काढून खालीं ठेवण्यास महाराजांनीं सांगितलें. तागडीं रिकामीं झालीं. महाराज लगेच सोनोपंतांपाशीं गेले. तो जीर्ण देह डोळे ताणून ताणून हा समारंभ पाहत होता.

" पंत, चला ! " महाराज पंतांचा हात धरीत म्हणाले.

" कुठें ? अं ? "

" मी नेईन तिकडे! "

पंत उठले. महाराजांनीं हाताला धरून पंतांना सावकाश तागडीकडे नेलें. आईसाहेबांसह सर्वजण हंसऱ्या कौतुकानें पहात होते.

"बसायचं पंत!"

"काय? इथं?—राजा!" पंत गहिंवरले.

"अंहं! पंत, आज माझं ऐकायचं!"

पंत तागडींत बसले. महाराजांनीं दुसऱ्या पारड्यांत ओंजळीओंजळीनें सोनें टाकलें. सोनोपंत सोन्यानें तुळले गेले.

"पंत! आज आईची तुळा झाली. आमचे वडील गेले. आपण वडिलांसारखे. आजवर मला सांभाळलं, कौतुक केलं, शिकवलं, धीर दिला, रागा वलांतहि. आपणच आम्हांला तीर्थरूपांच्या जागीं आहांत!" महाराजांनीं नमस्कार केला.

"राजा-!" पंतांचे शब्द पंतांच्या गळ्यांतच थांबले.

* * *

## १० : : आरमारी स्वारी

मिर्झा राजे व दिलेरखान दख्खनवर निघाले.

तारीख ९ जानेवारी १६६५ रोजीं त्यांनीं नर्मदा ओलांडली. तारीख १९ जानेवारीस ते बऱ्हाणपुरास येऊन दाखल झाले.

मिर्झा राजे व दिलेरखान मोठी थोरली फौज घेऊन आपल्यावर येत असल्याच्या बातम्या महाराजांकडे येऊं लागल्या. त्यांना हें पूर्वींच्या अनुभवांवरून माहीत झालं होतं कीं, मोंगली फौज कधींहि वाघाच्या गतीनें येत नाहीं. अजगराच्या गतीनें येते. म्हणजे ह्या येत असलेल्या नव्या अजगरालाहि इथें येऊन पोहोंचायला अजून दोन महिने हवेत.

तोंपर्यंत महाराज आपल्या उद्योगांत खंड पडूं देणार नव्हते.

महाराज मालवणला गेले. सिंधुदुर्ग किल्ल्याचें बांधकाम झपाट्यानें चालू होतें. समुद्रांत स्वराज्याचं आरमार डोलत होतं. तीन मोठ्या सुसज लढाऊ

नौका व पंचायशी लढाऊ गलबतें उभीं होतीं. त्यांच्या डोलकाठ्यांवर चढवलेले भगवे झेंडे वाऱ्यानें मशालींसारखे फुरफुरत होते. नौकांच्या कंठड्यां-वर सांखळदंडांनीं बांधलेल्या तोफा मगरीसारख्या ‘ आ ’ करून बसल्या होत्या. महाराजांच्या मनांत नवीनच मोहीम घुमत होती.

तारीख ८ फेब्रुवारी १६६५ रोजीं महाराज आरमारावर चढले. शिंगांच्या आणि नौबतींच्या निनादांत दर्यासारंग आणि मायनाक भंडारी यांनीं महा-राजांस मुजरे केले. नाखव्यांनीं एकच कल्लोळ करून आरोळी ठोकली. सलामीची तोफ उडाली आणि दर्यासारंगानें शिडें सोडण्याचा हुकूम फर्मावला. सर्र सर्र सर्र शिडें सुटलीं व वाऱ्यानें फुगलीं. सुकाणूंचीं चाकें गरगरा फिरलीं. खलाशांचा जयघोष चालूच होता. महाराज आपल्या सरदारांसह नौकेवर उभे होते. वाऱ्यानें त्यांचे शेले–अंगरखे फर्फरत होते. लाटांचा झिम्मा चालू होता. महाराजांच्या युद्धनौकांनीं किनारा सोडला. पण आरमार घेऊन महाराज चालले होते कुणीकडे ?

“ बसनूर ! बसनूर ! बेदनूरवाल्यांचं बसनूर ! ” दर्यासारंगानें पुकारा केला आणि दक्षिणेकडे बोट टवकारलें.

नौकांचीं तोंडें दक्षिणेकडे वळलीं. सर्रसर्र पाणी कापीत नौका पुढें सरकूं लागल्या. तीन मोठ्या नौका व पंचायशी गलबतें चाललीं होतीं. त्या तीन नौका नागिणीसारख्या सळसळत चालल्या होत्या व ती छोटीं गलबतें त्यांच्या पिल्लांसारखीं आजूबाजूनें धावत होतीं. महाराजांचा हा पहिलाच जलप्रवास.

वर आकाश, खालीं समुद्र व मध्यें महाराज होते. दिवस संपला तरी प्रवास चालूच होता.

रात्र झाली. गलबतांवरचे कंदील पेटले. वाऱ्यावर कंदील हेलकावत होते. नाखवे गात होते. हंसत होते. आरोळ्या देत होते. हा महिना माघाचा होता. शुद्धांतील चंद्र आकाशांत रांगत होता. समिंदर रुप्याच्या रसासारखा चमकत होता. महाराज बसनूरवर चालले होते. बसनूर अगदीं शांतपणें दौलत उशाशीं घेऊन झोपलं होतं.

मराठी आरमार बसनूरच्या जवळ पोहोंचलं. समुद्रांत वावरणाऱ्या लहान-मोठ्या मचव्यांची भीतीनें धांदल उडाली. किनाऱ्यावरील लोकहि सैरावैरा

धावत सुटले. मराठी आरमारावरचे भगवे झेंडे पाहून अनेकांनीं ओळखलं : मराठे आले. शिवाजी आला.

मराठी नौका बसनूरच्या किनाऱ्याला लागल्या. तरवारी उपसून मराठे किनाऱ्याकडे धांवत सुटले. आरडाओरडा भयंकर सुरू झाला. महाराज किनाऱ्यावर उतरले. बसनूरची लूट सुरू झाली.

सबंध दिवसभर मराठ्यांनीं लूट गोळा करून आरमारावर चढविली आणि जितक्या झपाट्यानें ते आले, तितक्याच झपाट्यानें लूट घेऊन माघारी फिरले. परत फिरतांना महाशिवरात्रीच्या दिवशीं महाराज गोकर्ण महाबळेश्वराला उतरले. यथासांग सबंध दिवस शिव-आराधनेंत महाराजांनीं घालविला. तेथून ते कारवारास आले. विजापूरचा सरदार शेरखान हा महाराजांवर चालून आला. पण उरसांतल्या कोंबड्यासारखी शेरखानाची दैना महाराजांनीं उडविली.

ता. १४ मार्च १६६५ ह्या दिवशीं पायमार्गानें महाराज भीमगडास पोहोंचले व तेथून राजगडावर आले.

याच वेळीं मिर्झा राजे दिलेरखानासह पुण्यांत येऊन दाखल झाले होते.

* * *

मिर्झा राजे व दिलेरखान पुण्यांत येऊन दाखल झाले. ब्ऱ्हाणपूर, अहमदनगर, औरंगाबाद व गुलशनाबादच्या मोंगली फौजा त्यांनीं पुण्यांत आपणांपाशीं आणवल्या. ह्या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत फौजच फौज पसरली. महाराजांची सर्व बाजूंनीं कोंडी करण्याकरितां दोघेहि सरदार प्रत्येक मुद्द्यावर डोकीं घासूं लागले. त्यांना शिवाजीचे किल्ले जिंकायचे होते. शिवाजीचीं माणसें जिंकायचीं होतीं. शिवाजीची धनदौलत जिंकायची होती. आणि खुद्द शिवाजीच जिंकायचा होता. अहोरात्र छावणींत खलबतं चालू होतीं. राहु आणि केतु दख्खनच्या खग्रास ग्रहणाची तयारी करीत होते.

स्वराज्याला वेध लागले होते.

मोगलांच्या छावणींत, महाराजांचा सूड घ्यायला अनेक दिवस टपलेले एक एक असंतुष्ट आत्मे जमा होऊं लागले. जावळीचे बाजी मोरे व अंबाजी मोरे, बेदनूरचा नाईक, अफझुलखानाचा मुलगा फाझलखान वगैरे भुतावळ आपण होऊन दाखल झाली.

स्वराज्याच्या मुलखांत पुनः मोंगली फौजा धुमाकूळ घालूं लागल्या. मोक्याच्या जागीं पांच-पांच सात-सात हजार स्वारांचे तळ पडले. अत्यंत जागरुकतेनें दोघेहि सरदार पावलें टाकीत होते.

मिर्झा राजांचा व खानाचा मनसुबा मुकर्रर झाला. राजांनीं आपली मोठी थोरली फौज आपल्या वाकबगार सरदारांच्या हातीं देऊन किल्ले कोंडाण्यास वेढा घालण्यासाठीं रवाना केली. स्वतः राजे व खान अफाट फौज घेऊन किल्ले पुरंधरच्या रोखानें पुण्याच्या वेशींतून बाहेर पडले. या दिवशीं तारीख होती १४ मार्च १६६५.

स्वराज्यांत ह्या नव्या व अतिप्रचंड संकटानें जनता कावरीबावरी झाली. कोंडाण्यावर फौज चालून येत असल्याची बातमी येऊन पोहोंचली. ह्या वेळीं खुद्द आईसाहेब व महाराजांचे कबिले कोंडाण्यावर होते. केवढी जोखीम किल्लेदारावर येऊन पडली! पण तो तिळमात्रहि, तसूभरहि, अणुमात्रहि

बावरला नाहीं. घाबरला नाहीं. गडावर शिबंदी, उलफाउलाफत आणि बारुदगोळी टंच होती. आईसाहेब गडावर असल्यामुळें प्रत्येक मावळ्याच्या काळजीचा कोट किल्ल्याभोंवतीं उभा राहिला होता. महाराजांच्या एक राणीसाहेब गडावर होत्या. त्यामुळें अधिकच जबाबदारी होती. किल्लेदार समजत होता कीं, स्वराज्याच्या कुंकवाचा करंडा माझ्या हातीं महाराजांनीं दिला आहे. जपला पाहिजे.

हें अगदीं ठाम भविष्य होतं कीं, मिर्झा राजाचे सरदारच काय पण सबंध मोंगल साम्राज्याची फौज जरी कोंडाण्याला बिलगली असती तरीहि ह्या वेळीं त्यांना कोंडाणा मिळणं अशक्य होतं.

राजे व खान कऱ्हे पठारांत घुसले. प्रांत सासवड ओस पडला. सारा मुलूख बेचिराख केलेला राजांनीं व खानानें पाहिला. जिकडे तिकडे काळा कोळसा ! गवताची काडी सुद्धां शिल्लक नव्हती. खेडेगांवं ओस पडलीं होतीं. कणग्यांत धान्याचा कण नव्हता. गायी, गुरं, शेळ्या, बकऱ्या तर दूर राहो, पण कोंबडीचं अंडं सुद्धां खानाला खायला मिळेना. दिलेरखानाचे डोळे आश्चर्यानें मोठे झाले. पुरंधरच्या भोंवतालचा हा मुलूख इतका उजाड ! कोणीं केला ?

दुसरं कोण करणार ? पुरंधरच्या किल्लेदारानं केला. शत्रूच्या हातीं एकाहि गायीची मान व एकाहि बाईचा हात सांपडूं नये म्हणून पुरंधरच्या किल्लेदारानं आधींच सारा प्रदेश उजाड करून टाकला. आपापली धनदौलत घेऊन डोंगर-दऱ्यांत निघून जाण्याची दवंडी त्यानें आधींच पिटविली होती.

मोंगल फौज पुरंधरच्या पायथ्याशीं येऊन दाखल झाली. खुद्द मिर्झा राजांनीं मात्र गडाच्या पायथ्यापासून दीड कोस अलीकडे आपला तळ ठोकला त्यांचे पेशखाने उभे राहिले. गडाच्या पायथ्याशीं मोंगलांच्या वैरणीच्या गंजी, तंबू, हत्ती, उंटांचे तांडे, घोडेस्वारांचे रिसाले, तोफखाना, आमदरफतीचे बैल आणि हिरवे झेंडे यांनीं गर्दी केली. दिलेरखानाचा शामियाना उभा राहिला. घोडयावरून मोठमोठ्यानें हुकूम देत खानाचे सरदार दौडूं लागले. घणांच्या घावांनीं खण्खण् आवाज करीत गुलाम तंबूंच्या मेखा ठोकूं लागले. पाणी वाहणारे पखालवाले भिस्ती व धान्याच्या गोण्या वाहणारे हबशी, खजिन्याचे पेटारे दोरखंडांनीं बांबूला टांगून डोलीप्रमाणें वाहून नेणारे धिप्पाड

मजूर आणि तेलांचे मोठमोठे बुधले घेऊन जाणारे नोकर छावणींत दिसूं लागले.

मोगलांच्या छावणींतला प्रत्येक माणूस तोंडावर हात ठेवून आणि भुंवया उंच करून, पुढें उभ्या असलेल्या अजस्र गड पुरंधराकडे चिंतेनें पाहत होता. पुरंधरच्याच लगत, त्याच डोंगराच्या एका शिखरावर दुसरा एक जबरदस्त किल्ला दिसत होता. ह्याचं नांव वज्रगड. दोन्ही गडांवर भगवे झेंडे फडफडत होते.

मोगलांची फौज गडाकडे येऊं लागल्यावर गडावर मावळ्यांची धांवपळ सुरू झाली होती. दरवाजे बंद झाले होते. गडाचे तटणीस, कारखानीस, सबनीस जातीनें घोड्यांवरून हिंडून हुकूम देत होते. तोफांचे मोर्चे चढत होते. प्रत्येक जण वरून टवकारून गनिमांची हालचाल टेहळीत होता. आजपर्यंत आलेल्या संकटांहून हें आजचं संकट फार जबर होतं. जिकडे पाहावं तिकडे घोडेस्वारांच्या फौजा दौडताहेत, सांडणिस्वारांचे उंट माना खालींवर करीत छावणींत येताहेत, बैलांच्या पांच-पांच दहा-दहा जोड्या लावून मोठमोठ्या तोफांच्या रांगा गडाखालीं दाखल होताहेत—कांहीं तोफा तर इतक्या मोठ्या होत्या कीं, त्या हत्तींकडूनच ओढण्यांत येताहेत, तंबू, राहुट्या, शामियाने उभारले जाताहेत,–शेंकडों तंबूंचा तो पसारा, कोंबडीच्या–अंड्यांचीं टरफलें टाकावीं तसा गडावरून दिसत होता.

गडावरून सारं कांहीं दिसत होतं, पण अगदीं बारीक. एवढे मोटे हत्ती, पण ते गडावरून बागुर्ड्यांसारखे दिसत होते. खानाच्या छावणींतून उठणारे शिंगाकण्यांचे आवाज रातकिड्यांच्या किरकिरीसारखे उगीच मधूनअधून पुसट ऐकूं येत होते. एवढं अफाट बळ घेऊन खान आला होता तरी गडावरच्या एकाहि गड्याच्या चेहऱ्यावर भीतीची रेघ दिसत नव्हती. ते धिप्पाड बुरूज, ते उंच उंच तट, ते उंच उंच दरवाजे आणि तीं साधीं बावळीं पण महा इब्लीस माणसं आपल्याच तोऱ्यांत गडावरून गंमत पाहत होतीं.

पुरंधराचे दोन भाग होते. पहिला भाग म्हणजे माची पुरंधर ; ह्या माचींतून दुसरा डोंगर चढत गेला होता, त्याचं नांव बालेकिल्ला. बालेकिल्ला तर फारच बळकट. सर्व बाजूंनीं ताशीव कडे. वर जायला फक्त एकच वाट. त्याशिवाय इतर बाजूंनीं कुणी चढूं शकत नव्हतं, कुणी उतरूं शकत नव्हतं. छातीच

नव्हती. पावसाळ्याचं पाणीच फक्त त्या कड्यावरून बिनधोक खालीं उडी घ्यायचं.

गडाच्या माचींत जायला बिनीचा दरवाजा उभा होता. तर बालेकिल्ल्यांत जायला सरदरवाजा होता. पण एकदां हे दरवाजे बंद झाले कीं, गडाची दांतखीळ उचकटणं कठीण. फार बळकट किल्ला. गडासारखा गड पुरंधरच.

बालेकिल्ल्याच्या सरदरवाजावर उंचच उंच अन् खूपच मोठा भगवा झेंडा फडकत होता. ह्या दरवाजावर शेंपन्नास काळींकुट्ट माणसं उघड्या अंगावर घोंगडी टाकून आणि हातीं भाले-कुऱ्हाडी घेऊन गडाखालच्या गनिमाकडे रेड्यासारखीं रोखून पाहत होतीं. अंगाबांध्यानें तीं लोखंडाचीं होतीं. गड, गडावरचा झेंडा आणि गडाच्या गडकऱ्याबद्दल ह्या मंडळींच्या काळजांत अपार पिर्ती, भक्ति भरलेली होती. ही मंडळी जातीनें महार होती. पुरंधर स्वराज्यांत दाखल झाल्यापासून हा दरवाजा आणि हा झेंडा सवाष्णीच्या कुंकवासारखा ते सांभाळीत होते. जातीनें महार होते, म्हणून त्यांना कुणी हेटाळीत नसे, कुणी फेटाळीत नसे. महाराज गडावर आले कीं पहिला जोहार मुजरा त्यांना या मंडळींचा झडत असे. महाराजहि त्यांचा मान ठेवीत. त्यांना कधीं कुणीं ' का रे महारा ,' म्हणून हिणवलं नाहीं. सारे म्हणत, ' या नाईक ', ' बसा नाईक ', ' जेवा नाईक '.

तटातटावर असेच काळेशार पोलादी पुतळे गस्त घालतांना दिसत होते. त्यांत सगळे होते,कोळी आणि रामोशी. पुरंधराचीं हीं लेणीं, भूषणं. गड कोळ्यांचा, रामोशांचा आणि महारांचाच. मग गडकरी कोणी का असेना ! ह्या तिघांच्या मांडीवर मान ठेवून गडानें खुशाल झोपावं – स्वप्नांतहि दगा नाहीं व्हायचा.

गड असा दणकट. आणि गडकरी? काय सांगूं त्याची कीर्त ? जणुं समशेरीच्या पोटींच जन्माला आला होता.

चंद्रराव मोऱ्यांशीं लढतांना जावळींत महाराजांच्या हातीं हें समशेरीचं पातं आलं. महाराजांनीं हातीं घेतलं. दुधारी ! वाकणार नाहीं कीं मोडणार नाहीं, अशी याची अबनाल तह्नाल. मोऱ्यांच्या नादीं लागून हा अर्जुन धर्माच्या विरुद्ध लढत होता. महाराजांनीं मायेनं त्याचा हात धरला. त्याचं शौर्य पाहून महाराजांनाहि अंधेरी आली होती. महाराज खूष झाले अन्

त्याला म्हणाले, "शाब्बास ! तुझ्या समशेरीला तुलना नाहीं. पण हत्यार कांटेरी निवडुंगावर चालवायचं; तुळशीच्या रोपट्यावर नाहीं. हें कार्य एका शिवाजीच्या ऐषारामाकरितां चाललं आहे का ? हें काम विश्वेश्वराचं,— रामवरदायिनीचं. ह्यासाठीं आम्हांला तूं हवास. तूं आम्हांला मिळावास एवढ्यासाठीं,--तुझ्यासाठीं कोणापुढेंहि शेला पसरून जोगवा मागूं कीं, 'एवढा भाऊ आमच्या पदरांत टाका !' हें श्रीभवानीचं कार्य ! येणार ना ?" महाराजांनीं हसून आर्जवी शब्दांत विचारलं.

—आणि त्यानें एकदम आपलं मस्तक महाराजांच्या पायावर ठेवलं, वाहिलं ! महाराज प्रसन्न हंसले आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, "तुझी कीर्ति डंक्यावर चढवूं !"

त्याचं नांव मुरारबाजी देशपांडे. मोऱ्यांची जाळी सोडून तो स्वराज्यांत दाखल झाला. महाराजांनीं हा हिरा कोंदणांत बसविला. पुरंधरच्या किल्लेदारीची शेला-समशेर मुरारबाजीच्या कमरेस महाराजांनीं बांधली. त्याच्या जीवनाचा ओघ शिवगंगेंत सामील झाला.

—मुरारबाजी ह्या वेळीं किल्ल्यावर उभा होता. दरडीवरती दरड, कड्यावरती कडे, त्याच्यावरती कपार, कपारीला धार, धारेवरती कोट, कोटाच्या आंत माची, माचीच्या आंत बालेकिल्ला, बालेकिल्ल्याला चोवीस बुरूज, चोवीस बुरुजांत शेंदऱ्या बुरुज, बुरुज टेकला होता आभाळाला, आभाळांत भिरभिरत होती करडी घार अन् त्या बुरुजावर उभा होता किल्लेदार ! घारीच्याइतक्याच करड्या नजरेनें तो गडाच्या पायथ्याशीं पसरलेली दिलेरखानाची फौज निरखीत होता. त्याच्या पायाखालीं तोफ अन् हाताखालीं बुरुजाचा तट दबत होता. सबंध दिवसभर खानाच्या छावणीची मांडामांड चाललीं होती. आतां ह्याच्याशीं कसा कसा झुंजूं, याचा विचार मुरारबाजीच्या डोक्यांत खेळत होता. बुद्धिबळाचा डाव त्याच्यापुढें पसरला होता. उंट, हत्ती, घोडे, प्यादे सरकत होते. तो दिवस तसाच मावळला.

रात्रीं गडावरून खानाची छावणी दिसत नव्हती. फक्त पेटलेल्या मशाली लुकलुकतांना दिसत होत्या. ते तेजाचे ठिपके इकडून तिकडे हलतांनाहि दिसत होते. गडद अंधारांत ही मशालींची चमचम कार्तिकी पौर्णिमेच्या रात्रीं द्रोणांत घालून नदींत सोडलेल्या दिव्यांसारखी दिसत होती. गड मात्र काळी

घोंगडी पांघरून बसला होता. पुरंधरच्या सांगातीं पुरंधरचा धाकटा भाऊ बसला होता. त्याचं नांव वज्रगड. पुरंधरपेक्षां वज्रगडाची उंची थोडी कमी होती. म्हणजे असं कीं, वज्रगडाचं डोकं पुरंधरच्या कानाला लागत होतं. पण वज्रगडहि पुरंधराइतकाच पिळाचा. पुरंधरावर मुरारबाजी होता, तसेच वज्रगडावर दोन सख्खे भाऊ किल्ल्याची राखण करीत होते. थोरल्याचं नांव यशवंतराव ब्रुवाजी प्रभु अन् धाकट्याचं नांव बाबाजी ब्रुवाजी प्रभु. पुरंधरच्या कंद कड्यावरून तोंडांत बोटं घालून फुंकलेली शीळ वज्रगडच्या दरवाजावर ऐकूं जात होती. बस्स ! इतकंच दोघांतील अंतर. रात्रीं एकमेक गड एकमेकांस चुडी पेटवून खुणा करीत.

दुसरा दिवस उजाडला. खानाच्या छावणींत गडाला वेढा घालण्याची तयारी जोरांत चाललेली होती. खान स्वतः हत्तीवर बसून हिंडत होता.

मिर्झा राजे पायथ्यापासून दीड कोस लांब होते. ते तिथून राजकारण करीत होते. कोंडाण्याला वेढा पडलाच होता. राजे तसे फार धार्मिकहि होते. रोज जपजाप्य, व्रतवैकल्य आवर्जून करीत. शिवाजीविरुद्ध आपली स्वारी फत्ते व्हावी म्हणून राजांनीं कोटिलिंगार्चन सुरू केलं होतं. बगळा-मुखी देवीची आराधना मांडली होती. शंकरावर संतत धार धरली होती. शिवाचा विध्वंस करण्यासाठीं ते शिवाची आराधना करीत होते.

मुरारबाजीचे हेर मोंगल येण्याच्या आधींपासूनच गडाखालीं सर्वत्र पसरलेले होते.

दिव्याच्या घाटाखालून जवळजवळ हजार उंटांचा काफिला गडाकडे निघाला होता. तो दरमजल करीत खानाच्या छावणींत येऊन दाखल झाला. ह्या उंटांवर तोफखान्याची निख्खळ दारू लादली होती. छावणीच्या बाहेर हीं दारूचीं पोतीं रचण्यांत आलीं. ह्या बाजूस खानानें राबता बंद केला. पहारे बसविले. आणि मशाली वगैरे ह्या बाजूस अजीबात न आणण्याची ताकीद त्यानें दिली. एवढा मोठा प्रचंड दारूगोळा गडावर पाखडण्यासाठीं खानानें आणला.

खारीसारखे टक्मक् टक्मक् टुक्टुक् टेहळणारे मराठी हेर मिच्मिच् डोळे मिचकावीत तुरुतुरू, टुण्टुण् उड्या टाकीत गडाच्या चोरवाटेनें गडावर धावले. मुरारबाजी नव्या बातम्यांची वाट पहातच होता. अजून

त्यानें खानाला कांहींच पाहुणचार केला नव्हता. मुरारबाजी सदरेवर बसला होता.

मागें पहात पुढें पहात हेर गडावर आले. सबनीस, कारखानीस यांच्याशीं बोलत मुरारबाजी खलबत करतोय तोंच हेर आले. उत्सुकतेनं सर्वांच्या माना पुढें झुकल्या. हेरांनीं कुचकुच कुजबुज कानांत केली. मुरारबाजी उठला. भराभरा शेंदऱ्या बुरुजावर आला. सबनीस वगैरे हेरांसह लगबगा मागोमाग गेले. तटावरून रोखून साऱ्यांनीं पाहिलं. हेरांनीं बोट दाखविलं. लांब लांब लांब, काळ्या काळ्या उंच ढिगाभोंवतीं नखानखाएवढीं मोंगलांचीं माणसं पहारा करीत होतीं. मुरारबाजीच्या डोक्यांत चकमक उडाली. ठिणगी उतरली. तडक माघारा सदरेवर आला. सांज व्हायला दोन घटका धीर होता. त्यानें माचीवरल्या चार तगड्या ताठ पोरांना बोलावून घेतलं. पोरं उड्या मारीत आलीं. किल्लेदाराला मुजरा करूं लागलीं. किल्लेदारानं हळूहळू म्हटलं, घाईघाईत म्हटलं, " या या पोरांनो, कानांतली गोष्ट ! जवळ या."

अन् किल्लेदारानं पोरांच्या कानांत मंत्र टाकला. कानमंत्रानं खोडकर पोरं फुरफुरलीं. आधींच उल्हास अन् त्यांतून होळीचा हा फाल्गुन मास.

" कानांतली गोष्ट काळजांत ठेवा. आजची रात तुमची." किल्लेदार बोलला.

" धनी तुम्ही न्याहार बगा. शेंदऱ्या बुरुजावरून खानाची चिलीम अक्षीं अलगद शिलगावून येतों."

" शाबास रे माझ्या गडाच्या गडकऱ्यांनो ! घ्या खंडोबाचं नांव अन् झाडा चकमक ! न बोलतां न दिसतां काम करा ! "

" धनी, त्याची चिंता नगा करूं. कानांतली गोष्ट नि कानांत बोटं ! तोंड न उघडतां चावा घेतों खानाचा ! "

" जय मल्हार ! "

पोरं वानरांसारखीं उड्या मारीत तयारी करायला गेलीं. रात्र झाली. मध्यरात्र झाली. मध्यरात्र उलटली. अन् पोरं मुरारबाजीपुढें येऊन उभीं राहिलीं. काळीं काळीं शार अंगं त्यांचीं. अंधारांत मिसळून गेलीं होतीं. किल्लेदारानं पाठी थोपटल्या. बिनीच्या दरवाजाची दिंडी उघडली. आणि हीं ऊदमांजरं बाहेर पडलीं. क्षणांत दिसेनाशीं झालीं.

मुरारबाजी बालेकिल्ल्यावर आला. तटावरून टक लावून पहात राहिला.

मराठी ... ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१००१ वि: ...
क्रमांक ...५२८... नों: दि: ...२८/११...

काळ्याभोर अंधारांत फक्त खालच्या छावणींतल्या दिवट्या काळ्या शेल्यावरच्या ठिपक्यांसारख्या चमकत होत्या.

जिकडे तिकडे सामसूम होती. गस्तीचे लोक छावणींत गस्त घालीत होते.

तास गेला. दीड तास गेला. मुरारबाजींची आणि गडाच्या कारभाऱ्याची आतुरता क्षणाक्षणाला वाढत गेली. एवढ्यांत लांब लांब, तिकडे दारूच्या ढिगाऱ्याच्या बाजूला, चिलीम फुंकावी तसा, अगदीं अर्ध्या करंगळीएवढा जाळ चमकला अन् एकदम तो जाळ जो सर्र्र्र्र्र्र्रकन् उडाला तो आकाशींचा तारा तुटल्यागत दारूच्या कोठारावर जाऊन पडला.... पडला... पडला... पडला...!

धडाड् धाड् धाड् धाड् धाड धाडडाडा!

आकाश फाटलें. जमीन फाटली. वज्रगड, पुरंधर गदगदा हादरले. दहा सूर्य एकदम उगवल्यासारखा लख्ख लखलखाट झाला. उभं कऱ्हेपठार एकच क्षण उजळून निघालं. कान फुटले. बहिऱ्यांच्याहि कानठळ्या बसल्या. डोळे दिपले. अंधारीं आली. सांदीसापटीला बसलेलीं पांखरं फडफडून उडालीं. खंडोगणती दारूगोळा एकदम पेटला. खानाचे असंख्य लोक कागदाच्या चिंध्या उडाव्यात तसे आकाशांत उडाले. भयंकर कल्लोळ उडाला. कोणाचें कोणाला ऐकूं येईना. उमजेना. छावणींतले लोक वेड्यासारखे सैरावैरा धावत सुटले. दारूचा खकाणा दाही दिशांत भरला. एवढा धडाका जन्मांत कुणीं पाहिला वा ऐकला नव्हता. पांच कोसांवरचे लोक दचकून जागे झाले. खान भयंकर भयंकर संतापला. दारूखान्यावरच्या गाफील पहारेकऱ्यांना खाऊं का गिळूं असं त्याला झालं. पण ते बिचारे केव्हांच त्यांच्या नकळतच चिंधड्या होऊन आकाशांत उडाले होते. आतां रागवायचं तरी कोणावर? तो ओरडत होता. पण कानठळ्या बसल्यामुळें शंख केला तरी कोणाला कांहीं ऐकूंच येत नव्हतं. जो तो तर्कानं ऐकत होता. खानाला कळून चुकलं कीं, हा सारा दगेबाज शिवाजीच्या मराठ्यांचा प्रताप! चिमूटभर सुद्धां दारू शिल्लक राहिली नाही. असंख्य लोक भरिताच्या वांग्यासारखे भाजून निघाले होते. तोंडें काळीं ठिक्कर पडलीं होतीं. ओळखणं मुश्कील. हजारों रुपयांचा दारूगोळा एकदम खलास झाला. मिर्झा राजांची छावणी दूर होती. तेथें कोणी मेलंबिलं नाहीं. फक्त सर्वांची झोंपमोड झाली.

खानाची चिलीम पेटली. पहिलंच मानाचं शेलापागोटं खानाला मुरारबाजीनं हें असं दिलं. पोरं हांसत खिदळत गडावर आलीं. गडावरून हा आगीचा भडका फारच रम्य दिसला. मुरारबाजी खूष होऊन गेला. हांसत हांसत त्यानें त्यांच्या पाठी थोपटल्या.

दुसऱ्या दिवशीं खान संतापून डोळे लाल करून किल्ल्याकडे पहात होता. एकदम मुठींत पकडून सबंध गड गिळून टाकावा, असं त्याला वाटत होतं. पण लहान तोंडीं हा फारच मोठा घांस होत होता ! !

* * *

## १२ : : वज्रगड

चिडलेल्या दिलेरखाँनें लगेच पुरंधरला आणि वज्रगडला कडक मोर्चे लावले. बांदलवाडी, बहिरवाडी, चिव्हेवाडी, काळदरी, केतकवळ वगैरे बाजूंनाहि फौजा रवाना केल्या. नवा दारूगोळा आणण्यासाठीं पुष्टर-पागा पाठविली.

महाराजांना राजगडावर मुरारबाजीनें खानाची सलामीलाच दाणादाण उडविल्याची हकीकत समजली. त्यांना मोठेंच कौतुक वाटलें. तरीहि मिर्झा राजांनीं व खानानें मांडलेला हा मोकाबला महाराजांना बेचैन करीत होता. कोंडाण्याला वेढा पडला होता. फैरी झडत होत्या. मिर्झा राजांशीं कोणतं राजकारण खेळावं, ह्या विचारांत महाराज अहोरात्र व्यग्र होते.

दिलेरखानाचे हशम धीर धरून दबत दबत गडावर सरकूं लागले. मुरारबाजी पुरंधरावर व यशवंतराव आणि बाबाजी वज्रगडावर अत्यंत सावध होते. गडाची शिबंदी किल्लेदारांहूनहि खबरदार होती. तटबुरुजांना असलेल्या जंग्यांतून बरकंदाज मावळे बंदुका घालून नेम धरून बसले होते. बंदुकांचीं तोंडें काळ्या जहर नागिणीसारखीं बाहेर डोकावत होतीं. तिरंदाज तटाआड लपलेले होते. बरकंदाजांच्या टप्प्यांत खानाची फौज आली आणि, आणि—एकदम सड् सड् सड् सड्–वरून गोळ्या सुटल्या. तटावर लोकांच्या

आरोळ्या उठत होत्या : ‘ हा बघ मारला ’, ‘ हा बघ टिपला ’, ‘ पठ्या शाबास ’, ‘ चल ठास दुसरा बार. ’ ‘ आतां हा रानडुक्कर माझाच’ ‘मुडदा’ ‘ लागलंच निशाण.’ ‘ तोफ डाग. ’

गोळी लागली कीं खानाचे हशम जखमी होऊन डोंगराच्या उतारावरून गडगडत होते. ‘ या खुदा ’ अशी आरोळी उमटे आणि तो सैनिक जखमेवर हात ठेवून खालीं कोसळे. अशी शेंकडोंची गत झाली. खानानें चौफेर चढविलेला पहिला हल्ला किल्लेवाल्यांनीं मारून काढला. खानानें संतापानें आपल्याच कानशिळांवर मुठी आपटल्या.

पुरंधरावर मुरारबाजी आणि वज्रगडावर यशवंतराव व बाबाजी आपल्या बरकंदाजांवर शाबासकी उधळीत होते. ‘ जय मल्हार ’चा घोष चालला होता. खानाच्या छावणींत नवा दारूगोळा येऊन दाखल झाला. त्याच्या तोफा-बंदुकांचीं पोटें भरलीं. कालपर्यंत उपासमार होती. आतां मात्र खालून गडावर धडाका सुरू झाला. वरूनहि तितकेच तोडीस तोड सवाल-जबाब सुरू झाले. दारूचा धूर हवेंत तरंगत होता. पुरंधरला चोरवाटा होत्या. दारूगोळा आणि रसद महाराजांकडून रात्रीं बेरात्रीं वर रवाना होत होती.

कोकणांतल्या पावसाळ्यासारखा अहोरात्र गोळ्यांचा पाऊस पडत होता. एक आठवडा उलटला, दोन आठवडे उलटले, सबंध महिना उलटला. तरीहि दोन्हीहि गडांना धक्कासुद्धां लागला नव्हता. दोन्हीहि गड गेंड्यासारखे शिंग रोखून खानापुढें उभे होते.

एप्रिल उजाडला. आतां मात्र खानाचें डोकें भडकलें. सर्व उपाय करूनहि गडाला वर्मीं घाव लागेना. दिल्लीहून औरंगजेबाचे खलिते यायला लागले. —काय काय जिंकलें ? शिवाजी कबजांत केव्हां येणार ?

शिवाजी राहिला मृगजळाच्या पैलतीरावर ! महिनाभर झुंजलों, डोंगरा-एवढा दारूगोळा ढगांत गेला. तरी ह्या किल्ल्याची माझ्या भीतीनें पापणीहि हलेना. काय करावं ? खानाची अक्कल गुंग झाली. फक्त समाधान एवढंच कीं, मिर्झा राजांच्या फौजेलाहि कोंडाण्यावर अद्याप काडीइतकंहि यश आलं नव्हतं !

एप्रिलचा दुसरा आठवडा सुरू झाला आणि चिडलेल्या खानानं पडेल ती किंमत देऊन निकराचा हल्ला चढविण्याचा निश्चय केला. खानानें आपले

सरदार शामियान्यांत बोलाविले. आणि तो खूपच आवेशानें चिडून त्यांच्यापुढें बोलला. आपण येथें काय नुसते तोफांचे भुईनळे उडवायला आलों आहोंत ? तवारीखनवीस आपल्याबद्दल काय लिहून ठेवतील ? किल्ला घेतला गेलाच पाहिजे......

इतकेंच नव्हे तर "किलेपर कबजा कियेबगैर मैं सरपर किमॉश न रखूँगा." अशी प्रतिज्ञा करून खानानें आपलें शिरोभूषणहि काढून टाकलें.

खानाच्या प्रतिज्ञेमुळें मोंगली फौज चेतली. मोंगलांच्या हल्ल्याची तयारी झाली. आणि एकदम सर्व बाजूंनीं मोंगल चालून गेले. जातीनें खान आघाडीवर होता. गनिमांचा आवेश आज खरोखर भयंकर होता.

वास्तविक खानाच्या फौजेच्या मानानें गडावरची फौज चिमूटभर होती. खानाची पंचवीस हजार – वज्रगडची तीनशें आणि पुरंधरची दीड हजार. हें विषम द्वंद्व होतें.

मोंगलांचा हल्ला गडावर येतांच गडवाल्यांनीं प्रतिकार केला तोहि भयंकरच होता. मोंगल ओरडत होते. खालून गोळ्या झाडीत होते असंख्य लोक मरत होते. जखमी होत होते. तरी कुणी हटत नव्हतं. निकराच्या निर्धारानं ते पडेल ती किंमत देऊन वर चढत होते. मराठ्यांना बंदुका आणि तोफांचे बार ठासायला जेवढा वेळ लागत होता तेवढेंच आपलें मरण पुढें ढकललेलें आहे ; तेवढ्यांत दहा बारा पावलं डोंगर आक्रमला पाहिजे, अशा निर्धारानं मोंगल लढत होते. गनीम इतक्या वेगानें, निश्चयानें आणि एकवटून चालून येत आहे, हें पाहून मुरारबाजीच्या जिवाची तगमग उडाली आपले लोक शर्थ करीत असूनहि खालच्या लोकांना साफ हुसकून लावायला संख्येनें अपुरे पडत आहेत, असं त्याला दिसलं. शत्रूपैकीं मरणारे मरत होते, पण जे जिवंत होते ते अफाट होते. हिरवा झेंडा वर वर चढत होता.

वज्रगडावरचीं तीं दोन भावंडं असंच जिवाचं रान करीत होतीं. त्यांचे लोक तर फारच कमी–फक्त तीनशें ! नव्या नव्या मोंगल तुकड्या खालून वर येत होत्या. मदतीच्या आशेनं दोघांनींहि तटावरून पुरंधराकडे पाहिलें. तों मुंगळ्यासारखी फौज पुरंधरला बिलगली होती. पुरंधरच्या रक्षणालाच पुरंधरची फौज कमी पडत होती. मग मदतीस कोठून येणार ? दोघाहि भावंडांचे चेहरे चिंताक्रांत झाले.

वज्रगडच्या दरवाजापासून अवघ्या शंभर पावलांवर गनीम येऊन ठेपला. हिरव्या झेंड्याची सावली गडावर पडूं लागली. वज्रगडाला पान लागलं. दरवाजावरचा भगवा झेंडा तगमगूं लागला. यशवंतराव व बाबाजी आपल्या लोकांना उधाण देत तटावरून धांवत होते. गडाच्या काळजीनं त्यांचीं निधडीं छाताडं धडधडत होतीं. कासावीस होऊन ते तटाखालीं डोकावीत. शत्रु जास्तच जवळ आलेला दिसे. ते ओरओरडून मावळ्यांना चेतवीत होते.

गनीम दरवाजाशीं भिडला. भयंकर ओरडा ऐकूं येत होता. दरवाजावर धडका बसूं लागल्या. बाहेरून बुरुजाला शिड्या लागल्या. भाले घेऊन दोघे भाऊ धांवले. शिड्यांवरून चढून येणाऱ्यांना त्यांनीं भोसकून मारलें. खालून गोळ्या सुटत होत्या. त्यांना पर्वा नव्हती. त्यांच्या कानाजवळून गोळ्या सूं सूं करीत जात होत्या. जणूं मृत्यूची फुंकर! एवढ्यांत दुसऱ्या बाजूला शिड्या लागल्या. लोक वर चढले. पहार कैचींत घालून धोंडा उलथावा तशा मरठ्यांनीं भाल्यानें शिड्या उलथविल्या. शेवटच्या पायरीपर्यंत येऊन पोहोंचलेले उंच शिड्यांवरचे पठाण शिडीसकट ढकलले गेले, आणि भयंकर किंकाळ्या फोडीत उंच कड्यावरून खोल दरींत कोसळले

मुरारबाजीला वज्रगडची ही स्थिति दिसत होती. पण तळमळण्याखेरीज त्याला कांहींच करतां येईना. कारण पुरंधरच्या माचीपर्यंत मोंगल येऊन ठेपले होते. जर वज्रगडच्या मदतीला जावें तर पुरंधरांत मोंगल घुसतील आणि मग वज्रगडहि वांचणार नाहीं अन् पुरंधरहि राखला जाणार नाहीं, हें स्पष्ट दिसत होतें. त्यानें दुःखी काळजानें आगींत सांपडलेल्या वज्रगडाकडे पाहून डोळे मिटून घेतले.

वज्रगडाच्या तटावर मोंगल चढले! महाराजांनीं विश्वासानें आपल्या हातीं दिलेली गडाची किल्ली आपल्या हातून जाते आहे, हें पाहून ते दोघे भाऊ करचळून गेले. मोंगलांचा विजयी आक्रोश, बंदुकांचे आवाज आणि बाहेर दिसणारें मोंगली निशाण त्या भावंडांचे प्राण पोखरीत होते. अनेक बाजूंनीं वैरी तटावर चढला.

दोघांनीं त्या धांवपळींत एकमेकांकडं पाहिलं. हृदयाचे निरोप डोळ्यांनीं सांगितले.

"जय मल्हार! हर हर हर हर—"

“महादेऽ ऽ व ऽ!” गडावरच्या सर्व मर्दांच्या तलवारी, भाले, पट्टे बेभान होऊन फिरूं लागले. आंतले तीनशें मराठे आणि एकाच आईच्या पोटचीं तीं दोन मुलं यज्ञकुंडाच्या स्थंडिलावर आंत उडी घेण्याकरितां उभीं होतीं. ज्वाळा भडकत होत्या. किल्ल्यांत धुमश्चक्री माजली. दरवाजा धडाडकन् उघडला गेला. मोंगल आंत घुसले. यशवंतराव व बाबाजी तोफेच्या गोळ्या-सारखे भयंकर गर्जत गनिमावर तुटून पडले. भयंकर लढाई पेटली. भगव्या झेंड्यावर दाटी उडाली. ‘मारा, कापा’ म्हणून ओरडत दोघेहि भाऊ मोंग-लांनाः उडवीत होते. एवढ्यांत खसकन् एका भावाच्या देखत दुसऱ्या भावाच्या छाताडांत हातभर हत्यार घुसलं. यमाचंहि काळीज हलविणारी किंकाळी यशवंतरावानें मारली. त्याची ढाल-तलवार गळून पडली.

कडाड्कन् भगव्या झेंड्याचा खांब मोडला. अखेरची तडफड करीत झेंडा कड्यावरून कोसळला. मोंगलांनीं विजयाच्या आरोळ्या मारल्या. बाबाजीला तें पहावेना. भाल्यांचे हजार फाळ सर्व शरीरांत एकदम घुसले असते तर तो हंसला असता, पण झेंडा गेलेला त्याला पहावेना. एवढ्यांत त्याच्या मानेवर खचकन् वार बसला आणि मृत्यूनें त्याला एकदम कुशींत घेतलें. ३० मार्च पासून १४ एप्रिलपर्यंत अहोरात्र वज्रगडच्या स्वातंत्र्यासाठीं राबलेलीं तीं दोन भावंडें आणि गडावरचे एकूणएक मराठे लढत लढत मृत्यूच्या स्वाधीन झाले. एकानंहि शरणागति पत्करली नाहीं. सगळे मेले. ह्या दिवशीं तारीख होती १४ एप्रिल १६६५.

वज्रगडावर हिरवा चांदतारा फडकूं लागला.

★ ★ ★

मोंगलांवर हल्ला करण्याचा आपला बेत जाहीर केला. बाकीच्यांना अन् सर्वांनाच तो म्हणाला, " माझ्या भावांनो, वज्रगड लढतां लढतां गेला. पडले ते अढळपदीं गेले. आपला पुरंधर आपल्या जिवंतपणीं खानाला मिळूं द्यायचा नाहीं आपण महाराजांचीं माणसं आहोंत. वज्रगड सगळे मरेपर्यंत लढला. पुरंधरहि लढेल! तुम्ही सगळेच किल्लेदार–" आणि मुरारबाजीनें प्रचंड रणगर्जना केली. 'हरहर महादेव!' ह्या घोषणेनें पुरंधरची काळदरी घुमली. माचीवरच्या मोंगलांवर बालेकिल्ल्यावरून बंदुकांच्या भयंकर फैरी सणाणूं लागल्या. मोंगल गाफीलपणें माचीवर लुटालूट करीत होते. हा आकस्मिक पाऊस सुरू होतांच त्यांची धांवपळ उडाली.

" दरवाजे उघडा! उतरा खालीं! कापून काढा सारी गनीम! सोडूं नका दुष्मनांना! जय मल्हार! जय मल्हार! जय मल्हार! मुरारबाजीनें भयंकर आवेशानें आपल्या लोकांस हुकूम सोडला. बालेकिल्ल्याचा सर दरवाजा धडाड्कन् उघडला गेला आणि 'जय मल्हार' चा जयघोष करीत मुरारबाजी दरवाजांतून चित्त्यासारख्या ताडताड उड्या टाकीत बाहेर पडला. त्याच्या मागोमाग पांचशें वीर तितक्याच आवेशानें गर्जत धांवत निघाले. पाण्याचा लोट जणुं खळाळून निघाला.

माचीवरच्या मोकाट मोंगलांवर मुरारबाजीनें राक्षसी हल्ला चढविला. भुकेलेल्या पांचशें एक सिंहांच्या तडाख्यांत मेंढरांचा कळप सांपडला. मुरारबाजी खचाखच कत्तल उडवीत होता. वज्रगडाच्या सूडानें तो भडकला होता. त्याच्या तडाख्यांत आला तो तो चिरफाकळ्या होऊन मेलाच. त्याचा अवतार महाभयंकर रुद्रासारखा दिसत होता. मोंगली माणूस दिसेल तेथें दांत-ओठ खात उड्या टाकीत टाकीत जाऊन तो त्याचे तुकडे तुकडे उडवीत होता. आणि इतर पांचशें सैनिकहि तसेच. एवढ्या भयंकर कष्टानें माचींत घुसलेले मोंगल मुरारबाजीचा तो भयानक अवतार पाहून भिऊन वाट फुटेल तिकडे मोकाट पळत सुटले. पळत्यांना मराठे पाठलाग कर करून बकऱ्यासारखे छाटीत होते. प्राणांतिक आरोळ्यांनीं माची थरथरली. जिवाच्या भयानें किंकाळ्या फोडीत मोंगल धांवत होते. आणि मुरारबाजी त्यांना गांठ-गांठून तोडीत होता. माची रिकामी झाली. चढलेला हिरवा झेंडा गडाखालीं भिरकावला गेला. बिनी दरवाजावर भगवा झेंडा फडफडूं लागला. भयंकर

ओरडत पठाण जीव घेऊन पळत सुटले होते. मुरारबाजीच्या अंगांत महिषासुरमर्दिनी आणि कालभैरव एकदमच जणुं संचरले होते. त्याला आवरणें आतां अशक्य होतें. यशवंतराव आणि बाबाजीला मारणारे हेच, हेच, हेच ते मोंगल! "कापा, तोडा, मुडदे पाडा, सोडूं नका हरामजाद्यांना" असें ओरडत मुरारबाजी मोंगलांचा पाठलाग करीत बिनी दरवाजांतून तरवार उगारून धांवत सुटला. मागोमाग त्याचे पांचशें मराठे. 'हरहर महादेव! जय भवानी! जय मल्हार!'

पांचशें तरवार दुष्मनांच्या मानेचा वेध घेत घेत गडावरून धांवत सुटली. मोंगल पुढें आणि मुरारबाजी मागें! शिवाय पांचशें! गडाच्या उतारावरून धांवतांना मोंगल ठेंचाळत, टकरा खात पडत होते. कोलांट्या खात गडगडत होते. मरणाच्या भयानें किंकाळ्या फोडीत होते. तेवढ्यांत मागून पाठलाग करीत येणाऱ्या तरवारींचीं पातीं खचाखच मानेवर आदळत होतीं मुंडकीं गडगडत डोंगरावरून पळत होतीं. जास्वंदीच्या फुलांसारखीं पुरंधरच्या डोंगरावर रक्ताळलेलीं प्रेतें पडलीं होतीं.

अशी तुफानी कत्तल करीत मुरारबाजी डोंगराववरून उड्या टाकीत टाकीत गडाच्या पायथ्याशीं आला. तो बेभान होऊन धांवतच होता. भुवया वर चढल्या होत्या. तरवार रक्तानें निथळत होती दांत-ओठ खात धांवता धांवता तो बळी शोधीत होता. दिसेल तो गनीम मारीत होता. खानाच्या प्रचंड छावणींत तो बेधडक, बिनदिक्कत, बेफाम, बेहाय, बेहोश होऊन बाणासारखा घुसला. त्याच्यामागोमाग पांचशें मराठे घुसले. छावणींत त्यानें सपाट्यानें मोंगलांची चौफेर कापाकाप सुरू केली. मोंगल बेसावध होते. जो तो आपापल्या तंद्रींत छावणींत वावरत होता आरडाओरड व जीव बचावण्यासाठीं धांवाधांव सुरू झाली. ज्यांना ज्यांना मुरारबाजी दिसला त्यांना मरण दिसलं. तो दिसतच होता भयंकर उग्र! रक्तानें तो भिजला होता. त्याचे लालबुंद डोळे विस्फारलेले होते. संतापानें विलगलेल्या ओठांच्या फटींतून कडकडून आवळलेले दांत दिसत होते. जणुं त्यांतून अग्नीच्या ज्वाळा बाहेर पडत होत्या. त्याच्या तडाख्यांत सांपडलेल्यांना एका घावांत मरण येत होतें. तो मोठ्यानें ओरडत होता. त्याचे डोळे

भिरभिरत होते. तेथे भक्ष्यांना तोटा नव्हता. लोक घाबरून जीव बचावण्यासाठीं पिसाटासारखे धांवत सुटले होते.

नरसिंहावतार ! आयाळ पिंजारून जीभ ललाळीत पंजे विस्फारून गर्जना करीत हा नरसिंह खानाच्या खास छावणींत थैमान घालीत होता. शेंकडों माणसें मेलीं. प्रत्येक क्षणाला शेंकड्यांनीं मुडदे पडत होते. त्यांच्या किंकाळ्या भयंकर होत्या. गडावरून कोसळलेला हा कडा बळी घेत घेत, तांडव करीत करीत दिलेरखानाच्या खास तंबूकडे धांवत सुटला. खानाच्या कानांवर छावणींतला भीषण ओरडा गेला. 'मुरारबाजी आला, किल्लेदार आला, मराठे आले, आले ! पळा ! दौडा !' ह्याहि आरोळ्या गेल्या. खानाच्या भोंवतीं हजारों हशम उभे होते. खानाचा हत्ती नजीक तयार होता. लोकांच्या किंकाळ्या ज्यांनीं ऐकल्या त्यांच्या जिभा भीतीनें टाळ्याला चिकटल्या. पाय लटलट कांपूं लागले. हा अकस्मात् उडालेला गोंधळ पाहून खान बावचळून गेला. लोक तंबूतंबूंतून सैरावैरा धांवत ओरडत होते. खान लगेच हत्तीवर चढला. त्यानें आपल्या फौजेला मराठ्यांना घेरण्याचा हुकूम केला. एवढ्यांत—

लांबून रक्ताळलेली तलवार उंच उंच पाजळीत चवताळलेला मुरारबाजी ताडताड झेप टाकीत येतांना दिलेरला दिसला. त्याच्या मागोमाग तंबूच्या आगून-मागून चित्त्याप्रमाणें बेफाम झालेले शेंकडों मराठे धांवत येतांना त्याला दिसले. त्याची छाती भयानें उडूं लागली. मुठी आवळून तो मोठ्यानें ओरडला.

"अमीऽऽऽर! शैतान आ गया ! काटो, मारो, कत्ले आम करो !"

एकदम हजारों पठाण आणि अरब तरवारी उपसून मुरारबाजीवर धांवले. तरीहि तो धांवत येतच होता. मुरारबाजी अक्षरशः देहभान विसरला होता. वज्रगडचा सूड मुरारबाजीच्या रूपानें तांडव करीत होता. सपासप तरवार फिरवीत तो पठाणांत घुसला. मुरार एकटा–त्याच्यावर तुटून पडले शेंकडों. इतर पांचशें मराठे आणि पठाणी फौज ह्यांचीहि 'न भूतो न भविष्यति' अशी रणधुमाळी माजली. मुरारबाजीची तलवार कोणाच्या छातींत, कोणाच्या मानेंत, तर कोणाच्या पोटांत घुसत होती. एकदां घुसलेलें तें दुधारी पातें जीव वसूल करूनच बाहेर पडत होतें. मराठे पांचशेंच होते; पण त्यांनीं मोंगलांची

अनुक्रमांक ... वि. ... ग्रंथांक ... नोंद दिः ...

दाणादाण उडवून दिली. पहिल्या दिवशीं उडालेला दारूचा भडका खानाला मुरारबाजीच्या या ज्वालामुखीपुढें फिका वाटला.

मराठ्यांचींहि मुंडकीं उडत होतीं. शक्तिसर्वस्व पणाला लावून पठाण मराठ्यांवर हल्ला चढवीत होते. कमाल होती मुरारबाजीची. शत्रूच्या प्रचंड गराड्यांत एकटा लढतो! तीनशेंच्यावर मराठे ठार झाले होते. तरीहि बाकीचे लढत होते. तीनशांनीं मरेमरेतों पुरेपूर वसुली केली होती.

मुरारबाजीचें तें अद्वितीय शौर्य पाहून खानानें अक्षरशः तोंडांत बोटें घातलीं. तोबा! हा केवळ सैतान! हीं शिवाजीचीं माणसं अशीं, तर मग शिवाजी कसा? वज्रगडावरचे ते दोघेहि भाई भाई असेच. खान मुरारबाजीची बहादुरी पाहून दिपला. तो हत्तीवरून आतांपर्यंत मराठ्यांवर बाण सोडीत होता व आपल्या लोकांनाहि जोश देत होता. एवढ्यांत त्याच्या मनांत काय आलं कोण जाणे! तो हत्तीवरच हौद्याच्या कठड्यावर पाय ठेवून उभा राहिला व खूप मोठ्यानें ओरडला, " ठैरो ऽ! पीछे हटो! हट् जाओ पीछे!"

तोच पुकार सर्वत्र उठला. मुरारबाजीवर तुटलेले मोंगल भराभरा मागें हटले, तरी मुरारबाजी लढतच राहिला! " ठैरो ऽ ठैरो ऽ ऽ अय् बहाद्दूर कायुमर्स, अय् रस्तुमेजंग, रोक दो तुम्हारी समशेर! तुम्हारी यह सफेजंगी सिकंदरसे भी बढ़कर है! शाबाश है तुम्हारी! मैं तुम्हारी बहादुरी देखकर तुमपर निहायत खुश हुआ हूँ! अय् किलेदार, शाबाश शाबाश!"

मुरारबाजी नागासारखा फुसफुसत खानाकडे रोखून पहात उभा राहिला. त्याच्या शिरा ताडताड उडत होत्या. रक्ताच्या धारा गळत होत्या. त्याच्या आंवतीं भोंवतीं त्यानें घेतलेले बळी पडले होते. अन् त्यांत तो निथळत्या तरवारीनें उभा होता.

" शाबाश है तुम्हारी! इतनी समशेर की करामत आजतक न तो सुनी न देखी थी! वह आज देख पाया! किलेदार, तुम्हारा इन् जंगलोंमें रहना तुम्हारे सफेजंगी के लिये बेइन्साफी है! तुम हमारे साथ चलो! हम तुम्हारी शान रखेंगे-" खान गोड हंसून बोलत असतांना मुरारबाजीचे डोळे जास्तच भडकले. त्याची छाती जास्तच फुसफुसूं लागली. तरवार थरथरूं लागली.

" तुम हमारे बादशाह शहेनशाह आलमगीर से मिलो! देहली चलो! किलेदार, देहली के दिवान-इ-खास में शहेनशाह के सामने तुम्हारी करमबक्षी

होगी और तुम्हारी नंगनामोशी दुनियामें रोशन हो जायगी ! बादशहा तुम्हें मनसब देंगे, जागीर देंगे, सरदारे आझम बनायें गे, सुभेदार बनायेंगे ! चलो ! तुम्हारे शिवाजीसे तुम पौबाराह लो ! "

" महाराऽ ऽ ऽज ! हा तुमचा दुष्मन मला फितुरी शिकवतोय् ? थूः थूः तुझ्या जहागिरीवर ! आम्ही महाराजांचीं माणसं तुझ्यासारख्या नोडग्याचा कौल घेऊं ? तुझी जहागीर नको, मला तुझं मुंडकं हवंय्, मुंडकं हवंय, मुंडकं हवंय् ! " दांत-ओठ खाऊन मुरारबाजी ओरडला, ओरडत राहिला, आणि ओरडत ओरडत सूं सूं करीत थेट खानावरच धांवत सुटला.

अय् खुदा ! तोबा ! खानाची तारांबळ उडाली.

" काटो, काटो शैतानको ! " खान ओरडला.

अगदीं असाच प्रसंग शाएस्ताखानाच्या चाकणवरच्या हल्ल्याच्या वेळीं घडला होता. शाएस्ताखानानें फिरंगोजी नरसाळ्यापुढें असंच पक्वान्नाचं ताट केलं होत. त्यानेंहि तें त्या वेळीं उडवून दिलं होतं. मुरारबाजीनेंहि या वेळीं तें लाथेनें उधळून दिलं. तो खानाचें मुंडकें उडविण्यासाठीं धांवला. मोंगलांनीं पुन्हा त्याच्याभोंवतीं गर्दी केली. पुन्हा झुंबड उडाली. मुरारबाजीची समशेर फिरूं लागली.

खानाचा नाटकी उदारपणा संपला. त्यानें धनुष्य उचललें. हौद्याला लटकत असलेल्या भात्यांतून त्यानें बाण उपसून धनुष्याला लावला. व एक डोळा बारीक करून त्यानें मुरारबाजीच्या कंठाचा वेध घेतला. खानानें दोरी कानापर्यंत खेचली. शिवचैतन्य समोर तांडव करीत होतें. सर्रर्रर सुंईऽऽऽऽ करीत बाण सुटला. एकदम मुरारबाजीच्या कंठांत बाण घुसला ! कंठ छेदला गेला ! ! प्राण निघून गेले ! ! ! भयंकर गतीनें फिरत असलेला तो देह एक क्षणभर मरणानंतरहि फिरत राहिला. आणि धाडकन् भुईवर पडला.

मुरारबाजीचे तीनशें मराठे ठार झाले होते. बाकीच्यांनीं किल्लेदार पडलेला पाहिल्याबरोबर एकदम मुसंडी मारली व मोंगलांच्या कोंडाळ्यांतून मुरारबाजीचें प्रेत उचलून घेऊन ते छावणीबाहेर पळत सुटले.

पुरंधरचा किल्लेदार पडला ! त्याची कीर्ति शाहिरांच्या डफामागें आणि बखरकारांच्या लेखणीमागें जाऊन उभी राहिली. त्याची कीर्ति —' डंक्यावर चढली.'

गडावरच्या मराठ्यांनीं मुरारबाजीचें प्रेत दऱ्याखोऱ्यांतून पळवीत राजगडावर महाराजांकडे नेलें.

महाराजांचें दुःख कोणच्या शब्दांत सांगूं ? आईसारखा शोक महाराजांनीं केला.

मुरारबाजी पडला. एका मुठीनें तीनशें माणसं त्याच्याबरोबर खर्चीं पडली. पुरंधर अनाथ झाला.

किल्लेदार पडला तरी किल्ला पडलेला नव्हता. किल्ल्यावरचीं माणसं ताठ होतीं. पुरंधरच्या सरदरवाजावरचा भगवा झेंडा पहिल्याइतक्याच आवेशानें फडकत होता. झेंड्याखालच्या दरवाजांतील महारांची छाती फुगलेली होती. ते तेथूनच मुरारबाजीला मुजरा करीत होते, अन् म्हणत होते, "जोहार किल्लेदार, जोहार ! जावा, सुखी देवाघरीं जावा ! गडाची चिंता नगा करूं ! आमच्या छातीच्या ढाला हायेत तंवर इथल्ल्या झेंड्याला हात घालायला अजून कुनाचीबी माय व्याली न्हाई. आम्ही महाराचीं मानसं म्हंजी महाराजांचीं मानसं ! आमचा जोहार घ्या ! किल्लेदारा ! आमचा जोहार घ्या ! ! जोहार ! ! !"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: .......
लेखन सीमा
......... नों: दि: .........

# अवघड फारसी वाक्यांचा मराठी अनुवाद

**पृष्ठांक २८ :** ( तळाचें वाक्य ) :— ' घाबरट कुठले ! भ्यायला काय झालं ! तुम्हीच लोक जर असे शहर सोडून पळूं लागलात, तर इतर लोकांना कशाला हसायला पाहिजे ? '

**पृष्ठांक ३७ :** : १ : सुरतेचे सुभेदार इनायनखानसाहेब यांनीं मला आपला वकील म्हणून शिवाजी राजांच्या भेटीसाठीं पाठविलें असून तहाच्या अटी समजावून घेऊन खानसाहेबांचं म्हणणंहि राजेसाहेब मेहरबानी करून ऐकतील तर खानसाहेब फार उपकृत होतील. : २ : शिवाजी राजेसाहेबांची मुलाखत हवी आहे. माझी विनंती जर राजेसाहेबांच्या पायाशीं रुजूं होईल तर मेहेर-बानी होईल. : ३ : खानसाहेबांनीं आपणांकडे कांहीं अटी सांगून पाठविल्या आहेत. त्या आपणांस जर कबूल असतील तर खानसाहेब तह करण्यास तयार आहेत. : ४ : मला महाराजांच्या कानांत कांहीं एक कानगोष्ट सांगायची आहे. फार महत्त्वाची.

**पृष्ठांक ४४ व ४५ :** : १ . तुमच्या व्यापारी कंपनीसाठीं मी काय करूं ? : २ : व्यापारी जकातीची माफी ! परंतु हें माझ्या अधिकाराबाहेर आहे. हा अधिकार विशेषतः आलमगीर बादशहांचा आहे. परंतु मी तुम्हांला वचन देतों कीं, जकात माफ व्हावी म्हणून मी स्वतः शहेनशहांकडे तुमच्यासाठीं प्रयत्न करीन.

**पृष्ठांक ६३ :** : १ : या मिर्झा राजे ! राज्यकारभाराची क्षुल्लक बाब-देखील आपल्यासारख्या अगदीं विश्वासू सेनापतीशिवाय अडून राहिली आहे. तुमच्यासारख्या वृद्ध सरदारास त्रास देणें म्हणजे परमेश्वराचा अपराध करण्यासारखें आहे. : २ : आलम्‌पन्हाह चिरायु होवोत. मी वृद्ध झालों हें खरें आहे. परंतु शहेनशहांच्या सेवेचा प्रश्न आला तर मी जवानांहूनहि जवान होतों. आपण माझ्यासारख्या क्षुल्लक माणसाला सेवेची आज्ञा द्या. हा सेवक तयार आहे. : ३ : मिर्झा राजे, आतांपावेतों तुम्हांस त्रास देणें योग्य होणार

# प्रकरणांचे आधार

**प्रकरण १ व २ :**

( १ ) मराठी रियासत–२ : पृ. ८७-८८ ( २ ) सरकारकृत शिवाजी : पृ. ८९-९० ( ३ ) चिटणीस बखर : पृ. २१४ ते २१६.

**प्रकरण ३,४,५,६ ( सुरत ...... ) :**

( १ ) शिव० पत्रसार संग्रह : ले. ९६६ ते ९७९ ( २ ) सरकारकृत शिवाजी : पृ. ९० ते १०१ ( ३ ) मराठी रियासत–२ : पृ. ८९ ते ९५.

**प्रकरण ७ ( अपघात ) :**

( १ ) सभासद बखर : पृ. ६६-६७ ( २ ) चिटणीस बखर : पृ. २१६.

**प्रकरण ८ ( मुधोळ ) :**

( १ ) सभासद बखर : पृ. ६९ ( २ ) शि. च. प्र. ( जेधे शकावली ) : पृ. २३ ( ३ ) मुधोळ संस्थानचा इतिहास ( बखर ) : पृ. २३९-४०.

**प्रकरण ९ ( सूर्यग्रहण ) :**

( १ ) शि. च. प्र. ( जेधे शकावली ) : पृ. २३ ( २ ) सरकारकृत शिवाजी : पृ. १०२ ( ३ ) चिटणीस बखर : पृ. २१६-२१७ ( ४ ) सभासद बखर : पृ. ३८-३९.

**प्रकरण १० ( आरमारी स्वारी ) :**

( १ ) शि. च. प्र. ( जेधे शकावली ) : पृ. २३. ( २ ) सभासद बखर : पृ. ७०-७१.

**प्रकरण ११,१२,१३ :**

( १ ) सभासद : पृ. ३९ ते ४४ ( २ ) आलमगीरनामा ........... ( ३ ) सरकारकृत शिवाजी : पृ. १०२ ते ११९ ( ४ ) स्टोरी ओडो मोबोर ........... ( ५ ) शि. च. प्र. ( जेधे शकावली ) : पृ. २३ ( ६ ) पुरुषोत्तम कविकृत शिवकाव्य : चमत्कार ५ : ( मुरारबाजीच्या पराक्रमाच्या वर्णनासाठीं पहा ).

* * *

# अवघड फारसी वाक्यांचा मराठी अनुवाद

**पृष्ठांक २८ :** ( तळाचें वाक्य ) :— ‘ घाबरट कुठले ! भ्यायला काय झालं ! तुम्हीच लोक जर असे शहर सोडून पळूं लागलात, तर इतर लोकांना कशाला हसायला पाहिजे ? ’

**पृष्ठांक ३७ :** : १ : सुरतेचे सुभेदार इनायतखानसाहेब यांनीं मला आपला वकील म्हणून शिवाजी राजांच्या भेटीसाठीं पाठविलें असून तहाच्या अटी समजावून घेऊन खानसाहेबांचं म्हणणंहि राजेसाहेब मेहरबानी करून ऐकतील तर खानसाहेब फार उपकृत होतील. : २ : शिवाजी राजेसाहेबांची मुलाखत हवी आहे. माझी विनंती जर राजेसाहेबांच्या पायाशीं रुजूं होईल तर मेहेरबानी होईल. : ३ : खानसाहेबांनीं आपणांकडे कांहीं अटी सांगून पाठविल्या आहेत. त्या आपणांस जर कबूल असतील तर खानसाहेब तह करण्यास तयार आहेत. : ४ : मला महाराजांच्या कानांत कांही एक कानगोष्ट सांगायची आहे. फार महत्त्वाची.

**पृष्ठांक ४४ व ४५ :** : १ : तुमच्या व्यापारी कंपनीसाठीं मी काय करूं ? : २ : व्यापारी जकातीची माफी ! परंतु हें माझ्या अधिकाराबाहेर आहे. हा अधिकार विशेषतः आलमगीर बादशहांचा आहे. परंतु मी तुम्हांला वचन देतों कीं, जकात माफ व्हावी म्हणून मी स्वतः शहेनशहांकडे तुमच्यासाठीं प्रयत्न करीन.

**पृष्ठांक ६३ :** : १ : या मिर्झा राजे ! राज्यकारभाराची क्षुल्लक बाबदेखील आपल्यासारख्या अगदीं विश्वासू सेनापतीशिवाय अडून राहिली आहे. तुमच्यासारख्या वृद्ध सरदारास त्रास देणें म्हणजे परमेश्वराचा अपराध करण्यासारखें आहे. : २ : आलमूपन्हाह चिरायु होवोत. मी वृद्ध झालों हें खरें आहे. परंतु शहेनशहांच्या सेवेचा प्रश्न आला तर मी जवानांहूनहि जवान होतों. आपण माझ्यासारख्या क्षुल्लक माणसाला सेवेची आज्ञा द्या. हा सेवक तयार आहे. : ३ : मिर्झा राजे, आतांपावेतों तुम्हांस त्रास देणें योग्य होणार

नाहीं म्हणून आम्ही इतर शूर वीर सरदारांची या कामावर नेमणूक करीत आलों आहोंत. ही गोष्ट क्षुल्लक आहे यांत शंकाच नाहीं. पण तरीहि सर्वांनीं हार कबूल केली आहे. :४: गोष्ट क्षुल्लक असो वा मोठी असो, हा बंदा सेवक ती जरूर पार पाडील. :५: आम्हांला पूर्ण खात्री आहे. :६: दख्खनचा चुव्वा शिवाजी भोसला आपल्या पायदळीं तुडवला जावो. :७: माझ्यासारख्या क्षुल्लक माणसावर आपण जो विश्वास दाखविलांत, त्याबद्दल बार बार धन्यवाद

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .. ........ वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..........
१००४

शिव-चरित्र-मालेचीं पहिलीं चार पुष्पें

लाल महाल :
REFBK-0008904
प्रतापगड : ाचा वध )
पन्हाळगड : ( पावनखिंड )
राजगड : ( शाएस्ताखानावर छापा )